मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:९७ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

आज उपराष्ट्रपती पदासाठी मतदान

नवी दिल्ली, दि. ८ प्रतिनिधी

उपराष्ट्रपती पदासाठी आज मंगळवारी मतदान होणार आहे. संध्याकाळपर्यंत निकाल जाहीर होतील. यासोबतच देशाला ५० दिवसांनंतर जगदीप धनखड यांच्या जागी नवे उपराष्ट्रपती मिळणार आहेत. २१ जुलै रोजी धनखड यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे हे निवडणूक होत आहे. एनडीएने महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना उमेदवार केले आहे, तर विरोधी आघाडी 'इंडिया'ने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती सुदर्शन रेड्डी यांना उमेदवार म्हणून मैदानात उतरवले आहे. आकडेवारीनुसार एनडीएला स्पष्ट आघाडी आहे. मात्र संसदेत विरोधकांची ताकद लक्षात घेता गेल्या दोन दशकांत पहिल्यांदाच सामना चुरशीचा होऊ शकतो.

दरम्यान, केसीआरची पक्ष बीआरएस आणि ओडिशाचे माजी मुख्यमंत्री नवीन पटनायक यांचा पक्ष बीजेडी उपराष्ट्रपती निवडणुकीत कोणत्याही आघाडीला समर्थन देणार नाहीत. राज्यसभेत बीआरएसचे ४ आणि बीजेडीचे ७ सदस्य आहेत.

विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसचा दावा

विधान परिषदेसाठी काँग्रेस नेत्यांची थेट मातोश्रीवर उद्धव ठाकरेंसोबत बैठक

मुंबई, दि. ८ प्रतिनिधी

राज्यात एकीकडे आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा-ओबीसीमध्ये वादंग उभं राहिले असताना 'हैद्राबाद गॅझेटीयर'वरून सरकारच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. तर सध्या सुरु असलेल्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा- ओबीसीसह बंजारा समाजानेही बैठकीचं सत्र सुरु केल्याचे चित्र आहे. अशातच आता मातोश्रीवर देखील काँग्रेस नेत्यांची शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत बैठक होते आहे. विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेते पदावर काँग्रेस दावा सांगणार असून सतेज पाटील यांच्या नावाची विधान परिषद विरोधी पक्ष नेते पदासाठी वर्णी लागण्याची चर्चा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबादास दानवे यांचे विरोधी पक्षनेते पदाचा कार्यकाळ २९ ऑगस्टला पूर्ण झाला. त्यानंतर विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेस आग्रही आहे. सध्या विधान परिषदेत विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसचे आठ आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे सहा आमदार आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीत विधानस परिषद विरोधी पक्षनेते पदासाठी कॉंग्रेसने दावा केला असल्याची सूत्रांची माहिती आहे. या सगळ्या संदर्भात उद्धव ठाकरे यांच्यासोबत काँग्रेस नेते चर्चा करत असल्याचीही माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

विधानस परिषद पक्षीय बलाबल
शिवसेना (उबाठा) : - ६
काँग्रेस - ८
राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) - २

अग्राग्रलेख
खरीखरी

नितीनजी तुम आगे बढो!

न्यायालयाने इथेनॉलच्या बाबतीत केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या बाजूने कौल दिला. त्यामुळेच की काय नितीनजी गडकरी यांना आता विनाकारण बदनाम करणाऱ्या शत्रूंना चांगलीच चपराक बसली असावी. एखाद्या मंत्री जिथे हात लावतो तिथे सोने करतो. या गोष्टीमुळेच नितीनजी गडकरी सध्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळात सर्वाधिक लोकप्रिय मंत्री आहेत. त्यांच्या हातात खाते आल्यावर प्रत्येक खात्यावर यशाची मोहर त्यांनी उमटवलेली आहे आणि विरोधकांना चिडीचूप केलेले आहे. या ठिकाणी एक गोष्ट अत्यंत स्पष्टपणे नमूद करणे गरजेचे आहे ते म्हणजे इथेनॉलच्या बाबतीत जो निर्णय घेतला गेला तो नितीनजी गडकरी यांचा नव्हता तर, त्यावेळच्या पेट्रोलियम आणि प्राकृतिक वायू मंत्रालयाचा होता. पेट्रोलमध्ये इथेनॉलचा वापर करण्याचे लक्ष्य 2030 सालामधले होते मात्र हे लक्ष्य 2025 सालीच पूर्ण करण्यात आले. नितीन गडकरी यांच्या पुत्राची एक कंपनी आहे ती कंपनी इथेनॉलचा व्यवसाय करते. खरंतर संपूर्ण देशभरात अशा जवळपास 200 कंपन्या आहेत. त्या सर्वच कंपन्यांनी चांगलाच नफा काढलेला आहे आणि वाढवलेला आहे. मग केवळ गडकरी पुत्रावर हल्ले करून विनाकारणच गडकरींना बदनाम करायचे होते की काय अशी शंका येते. नितीनजी 2013 सालामध्ये भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष असताना त्यांच्या विरुद्ध असेच बालंट आणले गेले. त्यावेळी अध्यक्ष असलेल्या गडकरी यांना पुन्हा अध्यक्ष करण्यात आले नाही आणि त्यांना विनाकारण मनस्ताप सोसावा लागला. आताही नेमके तेच होत आहे म्हणजेच काही चांगले होण्याच्या वेळी त्यांच्या बदनामीची प्रचंड मोठी मोहीम चालू करण्यात आली होती, आताही त्याच पद्धतीने चालू होत आहे. या मंडळींनी इथेनॉलमुळे गाडीचे अवरेज बरोबर मिळत नाही असा जावईशोध लावला होता, तोही खोटा निघाला. आता देशात अनेक लोकप्रिय आणि अप्रिय प्रकारच्या घटना घडत असून राजकीय वातावरण बेभरवशाचे झालेले आहे. या परिस्थितीतही गडकरी सर्व देशामध्ये लोकप्रिय आहेत, अगदी विरोधकांमध्ये सुद्धा त्यांचे चाहते आहेत. इतर कुणाबद्दल काय बोलले जाते हे सांगण्याची गरज नाही पण गडकरींच्या कामाबद्दल आणि त्यांच्या नवनवीन कल्पनांबद्दल तसेच शेती आणि शेतकरी यांच्यासाठीच्या त्यांच्या मनातल्या कळवळ्याबद्दल कुणालाही शंका नाही. सरकारी पैसा खर्च न करता प्रचंड मोठ्या प्रमाणात महामार्गाची निर्मिती केल्यानंतर गाड्यांचे जे इंधन वाचते त्यापेक्षा कितीतरी कमी टोल आकारणे त्यामध्ये गाडी धारकांचा नफा आहे की तोटा आहे, याचा विचार ज्याचा त्यांनीच करायला पाहिजे. त्यामुळेच या बदनामीच्या सर्व घटनाक्रमाच्या मागे कोण आहे आणि कोण नाही हे आम्हाला अजिबात ठाऊक नाही. पण हा एकच मंत्री इतका लोकप्रियता मिळवत आहे त्यामुळे जळणारी लॉबी त्यांच्याविरुद्ध अनेक खोट्या बाबी विनाकारण उभ्या करून दाबादाबी करण्याचा प्रयत्न करीत आहेत हे जवळपास सर्वांना समजू लागले आहे. गडकरी बहादर आहेत आणि दिलदारही आहेत, असे अनेक बाण निष्प्रभ करण्याचे कसब आणि सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे. त्यामुळे अशा कितीही बाजारगप्पा सुरू असल्या तरीही भारतीय जनतेचा एकच नारा आहे तो म्हणजे, नितीनजी तुम आगे बढो! हम तुम्हारे साथ है.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

नेपाळमध्ये सोशल मीडियावर बंदी; तरुणाई आक्रमक, २० ठार

काठमांडू, दि. ८ वृत्तसंस्था

नेपाळचे पंतप्रधान केपी ओली यांनी ४ सप्टेंबरपासून देशात सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घातल्यामुळे देशभरात मोठा गोंधळ उडाला आहे. या बंदीविरोधात राजधानी काठमांडूसह अनेक शहरांमध्ये हजारो Gen-Z तरुणांनी हिंसक निदर्शने केली. यादरम्यान शेकडो तरुण नेपाळच्या संसदेत घुसले. त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा आणि गोळीबाराचा वापर करावा लागला. परिस्थिती पाहता काठमांडूमध्ये कर्फ्यू लागू करण्यात आला आहे.

नेपाळमध्ये भ्रष्टाचार आणि सोशल मीडिया बंदीमुळे तरुणांत मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. तेथील सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्याने तरुण चांगलेच आक्रमक झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार संतापलेले तरुण थेट संसदेवर चालून गेले आहेत. काही तरुणांनी तर थेट संसदेत घुसून तोडफोड केली आहे. या आंदोलकांना थांबवण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केल्याचेही समोर आले आहे. यात आतापर्यंत एकूण २० जणांचा मृत्यू झाला आहे. तर ३०० हून अधिक जखमी झाले आहेत. नेपाळमधील काठमांडूमधील रस्ते आता रक्ताने लाल झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार नेपाळ सरकारने एकूण २६ सोशल मीडियावर बंदी घातली आहे. आजघडीला प्रत्येक तरुण सोशल मीडियाचा वापरतो. सोशल मीडियाच्या माध्यमातूनच तरुण आज व्यक्त होतात. मात्र नेपाळमध्ये तब्बल २६ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर बंदी घातल्याने तिथल्या तरुणांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. सोबतच नेपाळमधील भ्रष्टाचाराबाबत तरुणांत मोठा राग निर्माण झाला आहे. यामुळेच हजारो तरुण थेट संसदेवर चालून गेले. काही तरुण थेट संसदेत घुसले. संसदेत जाऊन तरुणांनी तोडफोड केली. संसद परिसरात काही ठिकाणी जाळपोळ केल्याचेही समोर आले आहे. याच संतप्त तरुणांना पांगवण्यासाठी नेपाळमधील सुरक्षा दलांनी थेट गोळीबार केला आहे. तसेच पाण्याचा मारा करून आंदोलकांना पांगवण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांच्या या गोळीबारात आतापर्यंत एकूण २० जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तर ३०० पेक्षा जास्त तरुण जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार केले जात आहेत. काही संतप्त तरुणांनी तर नेपाळच्या पंतप्रधानांचे पोस्टरदेखील फाडून टाकले आहेत. विद्यार्थी, तरुणांच्या या आक्रमक आंदोलनामुळे सध्या नेपाळच्या काठमांडू शहरात अशांतता निर्माण झाली आहे.

दरम्यान, तरुणांच्या या आक्रमक आंदोलनाला हिंसक वळण लागल्याने आता नेपाळच्या सरकारने खबरदारी म्हणून काठमांडूमध्ये कर्फ्यू लागू केला आहे. तसेच नेपाळ सरकारने आपत्कालीन बैठक बोलावली आहे. त्यामुळे आता नेमके काय होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

१७ सप्टेंबरच्या आत कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करा - जरांगे पाटलांचा इशारा

अंतरवाली सराटी, दि.८ प्रतिनिधी

१७ सप्टेंबरपूर्वी दाखले देण्यास सुरू करा अन्यथा सरकार विरोधात भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलाय. येवल्याच्या सांगण्यावरून काही बदल केल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतील, गावागावात तुम्हाला आम्ही येऊ देणार नाही. आम्ही मुंबईत येऊन मोठं काम करून घेतल्याने अनेक जणांना रात्री झोप येईना. काही जण न्यायालयात जाण्याची तयारी करीत आहेत. पण आम्ही जसाच तसे उत्तर देऊ, १९९४ मध्ये काढलेला अध्यादेश रद्द करायला लावू, असा इशारादेखील मनोज जरांगे पाटील यांनी नाव न घेता ओबीसी नेते छगन भुजबळांना दिला आहे.

उपचार घेऊन जरांगे पाटील गावी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची आंदोलनादरम्यान प्रकृती बिघडल्याने शहरातील खासगी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते. सोमवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास त्यांना घरी जाण्याची परवानगी देण्यात आली. डॉक्टरांनी एक महिना आराम करण्यास सांगितल्याचं जरांगे पाटील यांनी माध्यमांना सांगितले. रुग्णालयातून आधी अंतरवाली सराटी येथे जाईन, ४ वाजता नारायण गडावर जाऊन त्यानंतर घरी जाणार असल्याचं जरांगे पाटील म्हणाले.

१७ सप्टेंबर या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी सरकारने कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी सुरुवात करावी. परिपत्रक काढले, मात्र आता अंमलबजावणी देखील तातडीने झाली पाहिजे. ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांना गावागावात यंत्रणा लावून कामाला सुरुवात करावी. पूर्ण काम होण्यास वेळ लागणार आहे हे आम्हाला माहीत आहे. मात्र किमान कामाला सुरुवात करा, काही लोकांना प्रमाणपत्र वाटप केले पाहिजेत. सरकारने यामध्ये आता बदल करू नये, नाहीतर मला पुन्हा नाईलाजाने मोठा निर्णय घ्यावा लागेल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. दसरा मेळावा नारायण गड येथे होईल, तयारीला अधिक वेळ मिळाला नाही, तरी छोट्या प्रमाणात आम्ही कार्यक्रम घेऊ, ज्यांना शक्य होईल त्यांनी यावे. अंमलबजावणी सुरू झाली नाही तर त्याच दिवशी सरकार विरोधी भूमिका जाहीर करू, असं जरांगे पाटील यांनी सांगितलंय.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ओबीसीचे नुकसान होऊ देणार नाही, असे सांगितले. तर ते बरोबर आहे, कारण आम्हीदेखील ओबीसी आहोत, सरसकट झाला नाही हे म्हणत आहे, पण मराठवाडा १०० टक्के आरक्षणात जाईल, तुम्ही अर्थ समजून घ्या, पक्का अध्यादेश आहे, असं स्पष्टीकरण जरांगे पाटील यांनी दिलेत. ओबीसी नेते लक्ष्मण हाके आंदोलन करणार असल्याचं सांगत आहेत, मात्र त्याच्यावर बोलत नाही, मी त्याला ओळखत नाही, त्याला मोजत पण नाही, अशी टीका त्यांनी केली.

शिवभोजन थाळीवरुन केंद्रचालकांचा सरकारवर आरोप

नागपूर, दि. ८ प्रतिनिधी

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पुढाकारातून सुरु झालेली शिवभोजन थाळी योजना आता राजकारणाच्या नव्या वादात सापडली आहे. सध्याच्या महायुती सरकारच्या काळात ही थाळी विसरली गेल्याचा आरोप केंद्रचालकांकडून केला जात आहे.

शिवभोजन केंद्राचे संचालक म्हणतात की, योजना सुरु झाल्यापासून मिळणारी अनुदाने आता तब्बल कोट्यवधी रुपये थकले आहेत. मागील सहा महिन्यांपासून नागपूर जिल्ह्यातील केंद्रकांना त्यांच्या अनुदानाचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. वार्षिक २७० कोटी रुपयांच्या तरतुदीतून फक्त ७० कोटी रुपये पुरवले जात आहेत, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यामुळे केंद्रचालकांनी नागपूरच्या संविधान चौकात आंदोलन सुरु केले आहे.

केंद्रचालकांचा असा दावा आहे की, मागील काही दिवसांतील शासकीय बिलांच्या थकव्यामुळे दोन सरकारी कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचे उदाहरण आहे. "आमच्यावरही अशी वेळ येऊ नये, सरकार का हे पहात आहे?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

गरिबांना स्वस्त दरात जेवण मिळावे, यासाठी सुरू झालेल्या या योजनेची सद्यस्थिती केंद्रकांसाठी धोकादायक ठरत आहे. सरकारकडून अनुदान मिळत नसल्यामुळे शिवभोजन थाळीची कामगिरी अडचणीत आली आहे, आणि या थकव्यातून सुरू झालेला राजकारणी वाद आता उग्र स्वरूप घेत आहे. शेवटी, नागपूरमधील शिवभोजन केंद्रचालकांच्या आरोपानुसार, महायुती सरकारच्या काळात अनुदानाची थकबाकी ही योजना सुरु असलेल्या गरिबांच्या हितासाठी मोठा प्रश्न बनली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का
भारताचा इस्रायलबरोबर करार

नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था

गेल्या काही दिवसांपासून भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध कमालीचा ताणले गेले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफमुळे भारत आता अन्य देशांशी आपले संबंध दृढ करून पाहात आहे. त्याचाच एक भाग म्हणून चीन देशाशी पुन्हा एकदा व्यापार वृद्धींगत करण्यासाठी भारताची चीनसोबत चर्चा चालू आहे. असे असतानाच आता डोनाल्ड ट्रम्प यांच्या जवळच्या मानल्या जाणाऱ्या इस्रायलने भारतासोबत महत्त्वाचा करार केला आहे. या करारामुळे आता भारत आणि इस्रायल यांच्यातील व्यापार वाढणार आहे. ट्रम्प यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार भारत आणि इस्त्रायल यांच्यात एक महत्त्वाचा द्विपक्षीय करार झाला आहे. इस्रायलचे अर्थमंत्री बेझालेल स्मॉटरीच आणि भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या द्विपक्षीय परस्पर गुंतवणूक करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारामुळे आता दोन्ही देशांची एकमेकांसोबतची गुंतवणूक अधिक सुलभ होणार आहे. भारताच्या गुंतवणूकविषयक नव्या धोरणानुसार इस्रायल हा भारतासोबत करार करणारा पहिला OECD सदस्य देश ठरला आहे.

उरणधील ओएनजीसी प्रकल्पाला भीषण आग

उरण, दि. ८ प्रतिनिधी

उरणमधील महत्त्वाच्या आणि संवेदनशील अशा ओनजीसी प्रकल्पाला भीषण आग लागली आहे. या दुर्घटनेचे काही व्हिडीओ समोर आले असून सगळीकडे धुराचे आणि आगीचे लोट दिसत आहेत. ही आग विझविण्यासाठी सीआयएसएफ आमि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आहेत. दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणावर लागलेली आग पाहून लोकांमध्ये घबराट पसरलेली असून ही आग आणखी रौद्ररूप धारण करणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

उरणधील ओनजीसी प्रकल्पात मोठी आग लागली आहे. ही आग लागल्याचे समजताच प्रकल्पाच्या प्रशासनाने अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलानेही कोणताही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. सध्या ही आग विझविण्याचा युद्धपातळीवर प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी अग्निशमन दलाची पूर्ण यंत्रणा कामाला लागली आहे. ही आग लागल्यामुळे संपूर्ण उरण परिसरात भीतीचे वातावरण आहे. या प्रकल्पात नैसर्गिक वायू आणि तेल शुद्धीकरण केंद्र आहे. याच प्रकल्पात नैसर्गिक वायू आणि तेलाचे वितरणही केले जाते. त्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात विलंब लागला तर ही आग आणखी रौद्ररुप धारण करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

गोंदियात आभाळ फाटले
सहा बळी, जनावरांचेही मोठे नुकसान!

गोंदिया, दि. ८ प्रतिनिधी

गोंदिया जिल्ह्यावर पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. सलग बरसणाऱ्या ढगांनी शेतकरी, मजूर, सर्वसामान्य नागरिकांना चांगलेच हैराण केले आहे. रस्ते चिखलाने चकचकीत, अनेक गावांमध्ये पाण्याचे तळे तयार झाले आहेत. काही भागात घरात शिरलेलं पाणी अजूनही ओसरण्याची चिन्हे नाहीत.

गावोगावी पूरस्थिती, ढासळलेली घरे, पाण्यात अडकलेला शेतमाल

या सगळ्यामुळे लोकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. गावकऱ्यांच्या डोळ्यांसमोर त्यांचा संसार वाहून जाताना दिसतोय. जनावरं बांधून ठेवण्याची सोय नाही, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या डोळ्यात हताशा दाटली आहे.

दरम्यान, या नैसर्गिक आपत्तीने किती जीव घेतले, किती नुकसान झाले याविषयी प्रशासनाकडून अखेर अधिकृत माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील सहा नागरिकांचा पावसामुळे बळी गेला आहे. १४ जनावरांचा मृत्यू झाला असून अनेकांची घरे वाहून गेली आहेत. बाधितांना सावरण्यासाठी प्रशासनाने मदतीचा हात पुढे केला असून एकूण ३८ लाख १९ हजार रुपयांचा मदतनिधी वाटप करण्यात आला आहे. गोंदियातील नागरिक मात्र अजूनही भीतीच्या सावटाखालीच आहेत. आभाळ फाटल्यासारखा झालेला पाऊस, ओढे-नद्या तुडुंब भरून वाहणारी स्थिती आणि होत्याचं नव्हतं करणारा पूर या सगळ्यामुळे जिल्हा संकटात सापडला आहे. पुढील काही दिवसांचा अंदाजही नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकवणारा ठरत आहे.

कोल्हापूरच्या प्रियांका खोत यांची लेफ्टनंटपदी नियुक्ती

कोल्हापूर, दि. ८ प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात तीन वर्षांपूर्वी पतीचे निधन झाल्यानंतर अत्यंत धैर्याने, नियोजनबद्ध तयारी करून तारदाळ येथील प्रियांका निलेश खोत यांची सैन्य दलात नियुक्ती झाली आहे. चेन्नईमध्ये झालेल्या ऑफिसर ट्रेनिंग अकादमीमध्ये पासिंग आऊट परेडमध्ये प्रियांका यांची लेफ्टनंटपदी नियुक्ती करण्यात आली. प्रियंका खोत यांनी अत्यंत समर्थपणे केलेली ही कामगिरी उल्लेखनीय ठरलेली आहे.

७ नोव्हेंबर २०२२ रोजी निलेश खोत यांचे सैन्य दलात असताना हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यानंतर प्रियांका खचल्या होत्या. निराशेच्या गर्तेत गेलेल्या प्रियंका यांना कुटुंबीयांनी सावरण्यास मदत केली. निलेश खोत हे सैन्य दलात असल्याने सैन्य दलाविषयी प्रियांका खोत यांना बरीच माहिती होती. त्यांनी सुरुवातीला बँकिंग स्पर्धा परीक्षा देण्याची तयारी केली होती. परंतु, सैन्य दलातील काही अधिकाऱ्यांनी सैन्य दलात सहभागी होण्याची संधी कशी आहे याविषयी मार्गदर्शन केले. त्यासाठी तुमच्याकडे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता असल्याचेही जाणवून दिले. त्यानुसार प्रियांका यांनी सैन्य दलात भरती होण्यासाठी तयारी सुरू केली. त्यासाठी त्यांनी नोएडात चार महिने विशेष प्रशिक्षण घेतले. सैन्य दलात सहभागी होण्यासाठी

आवश्यक असणारी प्रवेश परीक्षा त्या यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर त्या ११ महिन्याच्या प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाल्या. आणि आता त्या उत्तीर्ण झाल्यानंतर सैन्य दलात सहभागी होण्याचा त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. २६ सप्टेंबरपासून त्या सैन्य दलात प्रत्यक्ष सेवा बजावणार आहेत.

प्रियांका खोत यांच्या अभिमानास्पद कामगिरीनंतर तारदाळ गावच्या ग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढत त्यांचा सन्मान केला. गावकऱ्यांनी केलेल्या सन्मानानंतर प्रियांका भारावरून गेल्या. आपल्या यशात कुटुंबाने दिलेल्या पाठिंब्याचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. जंगी सत्कारानंतर प्रियांका यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना प्रियांका गेल्या ११ महिन्यातील खडतर प्रशिक्षणाची माहिती दिली. विपरीत परिस्थिती असतानाही यशस्वी ठरल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कांदिवलीत प्रॉपर्टीच्या वादातून फ्री स्टाईल हाणामारी
एका वृद्धाचा मृत्यू, आठ गंभीर जखमी

मुंबई, दि. ८ प्रतिनिधी

मुंबईतील कांदिवली पश्चिम परिसरात प्रॉपर्टीच्या वादातून दोन कुटुंबांमध्ये तुफान हाणामारी झाली. लालजीपाडा (येथील यादव आणि चव्हाण कुटुंबीयांमध्ये जागेच्या ताब्यासंदर्भातील वाद इतका वाढला की, त्याचे पर्यवसान हिंसक संघर्षात झाले. या मारामारीत एक 65 वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला असून, आठ जण गंभीर जखमी झाले आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार यादव आणि चव्हाण कुटुंबीयांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून प्रॉपर्टीवरून वाद सुरू होता. या वादातूनच दोन्ही कुटुंबात तुंबळ हाणामारी झाली. या हाणामारीमध्ये बॅट, हॉकी स्टिक, लाकडी काठ्या, विटा आणि दगडांचा वापर करण्यात आला.

या हिंसाचारात आठ जण गंभीर जखमी झाले. सर्व जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान राम लखन यादव (वय ६५) यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी कांदिवली पोलीस ठाण्यात दोन्ही गटांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून, इतर आरोपी फरार आहेत. पोलिसांकडून फरार आरोपींचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

घटनेनंतर लालजीपाडा परिसरात भीतीचे वातावरण पसरलं आहे. नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता या घटनेतील फरार आरोपींना जेरबंद करण्यात पोलिसांना यश कधी मिळणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

आनंदी जीवनासाठी संकल्प, हीच शक्ती सृष्टीची!

आज १८ ते ३० वर्षाची युवा पिढी तणावात आहे. आजचे सत्य त्यांच्यात हार्टअटॅकचे प्रमाण वाढले आहे. जेव्हा हे तरुण डॉक्टरांकडे जातात तेव्हा त्यांची तपासणी करताना असे कळते की, त्यांचे शारीरिक वय १८ ते ३० चे आहे. पण त्यांचे जेनेटिक वय ६० ते ९० वर्षाचे दिसते ही बाब अत्यंत गंभीर आहे. आपल्याला मिळालेले आयुष्य असे समजून जगावे की रोज मृत्यू समोर आहे.

आपले जीवन परिस्थितीनुसार आव्हानात्मक बनवा आणि तुफान विचारांना साखरेसारखे गोड बनवा. आपला प्रत्येक विचार नवीन ऊर्जेचा स्त्रोत बनवा, जो दुसऱ्याच्या आयुष्यासाठी प्रेरणादायी असेल. आनंद हेच जीवनाचे नाव असावे, आपली प्रसन्नता रेगिस्तान सारख्या जीवनात निसर्ग फुलवणारी असावी, हेच जीवनाचे खरे रूप दर्शन आहे. आपल्या मनातील संकल्प जीवनाला आकार देत असतो. संकल्प हीच शक्ती असते, जी जीवनात चमत्कार घडवून आणते. जीवन जगताना वेगवेगळ्या परिस्थितीचा सामना करतांना मनाची प्रसन्नता, शांत भाव अत्यंत महत्त्वाचा असतो. आपल्या विचारांवर पुढील कृती घडत असते. आपल्या दृष्टीवर कृती बदलत असते. मानवी विचारांची दृष्टी बदलली तर कृती बदलते, कृतीतून शब्दसुमणे बदलतात, त्यातूनच पुढे संस्कृती बदलते, संस्कृती बदलली का दृष्टी बदलते हीच जगण्याची कला आहे. आपले भविष्य निर्माण करण्यासाठी स्वतःलाच प्रयत्न करावयाचे आहे. स्वतःची जबाबदारी ओळखून, समजून भविष्यासाठी निर्णय घ्यावा. आपले जीवन सुखी समाधानी कसे बनवायचे हे आपल्याच हातात आहे. आपण स्वतःची कोणतीही जबाबदारी दुसऱ्यावर ढकलू शकत नाही. भविष्यात काय निर्माण करावयाचे, भविष्य कसे घडवायचे हे आधी ठरवावे म्हणजे नियोजनपूर्वक जीवनात निर्णय घेता येतील, जेणेकरून दुसऱ्याचेही आयुष्य आनंदी होईल. एक हुशार कुंभार मातीला आकार देत चिलम बनवत असताना अचानक तो मातीचा आकार बदलतो आणि माठ बनवायला सुरुवात करतो. त्यावेळी माती कुंभाराला विचारते, की कुंभारदादा असं का करतो, तर कुंभार उत्तर देतो, ही माती माझे विचार बदलले आहेत. मनाने ठरवले की आता चिलम नाही तर

माठ तयार करायचा. तेव्हा माती म्हणते, 'हे कुंभारा तुझे तर विचार बदलले, आता माझे नशीबच बदलले. कारण मी जेव्हा चिलम होते, तेव्हा स्वतः जळत होते आणि इतरांचे जीवन जाळत होते. आता मी स्वतः शितल राहणार आणि दुसऱ्यांचे जीवन शितल करणार. आयुष्याचे असेच निर्णय घ्यावे की, जेणेकरून दुसऱ्याचे आयुष्य आपल्यामुळे आनंदी, समाधानी होईल. आज माहिती तंत्रज्ञानाच्या दुनियेत अर्थात आयटीमध्ये काम करणारे २४ ते ३० वयोगटातील युवक-युवती आहे. त्यांना हार्टअटॅक येण्याचे प्रमाण वाढले आहे. पती-पत्नी लाखो रुपयांचे पॅकेज घेत आहे. एक उदाहरण २८ वर्षाचा सीए डॉक्टरांकडे आणला जातो. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर कळते की, याला कुठलाही आजार नाही. नियमित कोणतेही औषध सुरू नाही. हार्टअटॅक येण्याची कोणतेही लक्षण दिसत नाही, तरी याला हार्टअटॅक का आला? जेव्हा डॉक्टरांनी सर्व कुटुंबियांबरोबर चर्चा केली तेव्हा त्याचे लग्न झालेले असून त्याला चार महिन्याची मुलगी आहे हे कळाले. डॉक्टरांनी पत्नीला बोलवा असे कुटुंबाला सांगितले. त्यावेळेस मुलाच्या वडिलांनी एकांतात डॉक्टरांना सांगितले की, दोघांची घटस्फोटाची केस सुरू आहे. पुढील महिन्यात दोघे रीतसर वेगळे होतील. ही बाब जेव्हा डॉक्टरांना कळाली तेव्हा डॉक्टरांनी आयटी इंजिनियर असलेल्या या मुलाच्या पत्नीला बोलवण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांनी आयटी इंजिनियर असलेल्या आणि भला मोठा पगार घेणाऱ्या पत्नीला माझ्याकडे एकदा घेऊनच या असे बजावले जेव्हा युवकाची पत्नी डॉक्टरांकडे आली. तिच्यासोबत डॉक्टरांनी चर्चा केली. डॉक्टरांनी तिला सांगितले की जोपर्यंत पती नीट होत नाही तोपर्यंत आठवड्यातून एकदा हॉस्पिटलला तपासणीसाठी आणताना तू त्याचा हात धरून घेऊन येण्याची विनंती केली. पत्नीने ते मान्य केले. सलग तीन महिने ती आपल्या पतीला नियमित डॉक्टरांकडे घेऊन येत होती. त्यानंतर हे दोघेही पती-पत्नी आपल्या विचाराने जे दुरावलेले होते ते पुन्हा एकत्र आले. आज त्यांची मुलगी चार वर्षाची आहे आणि सुखाने संसार सुरू आहे. दोघांच्या मोठ्या पॅकेजमुळे अवास्तव खर्च भौतिक जीवनशैली करता पूर्ण करण्यासाठी काम करून आल्यावर संवाद थांबला होता. फ्लॅट, गाडी आली, शान सुख सुविधा वाढल्या, पण मनामध्ये दुरावा निर्माण झाला. छोट्या छोट्या गोष्टींमधला आनंद घेण्यासाठी वेळ संपला. थोड्याफार नातेवाईकांच्या हस्तक्षेपाने वैचारिक उंची वाढू नये, पैसा कमावण्यामागे जगणे म्हणजे काय हेच विसरून गेले. जीवनात आनंद कशामध्ये आहे, समाधानासाठी नेमके काय करायला हवे, पती-पत्नी मुले यांच्या गरजा पूर्ण करत वेळेचा अभाव निर्माण होतो, नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो, यावर सर्वात चांगला उपाय म्हणजे मन शांती दररोज असणारी ध्यानधारणा होय. ध्यानधारणामुळे कामाचा ताण कमी होतो. आपण समाजात नियमित मिसळतो दैनंदिन घटना सुखदुःख सांगण्यासाठी निश्चित वेळ मिळतो मन हलके होते. मार्ग मिळतो जो जीवनाला आकार देतो. जीवन जगण्यासाठी आनंद महत्त्वाचा आहे. दैनंदिन जीवनात अपेक्षांची उंची वाढतच आहे आणि अंतर सुखासाठी प्रत्येकाला पुढे जायचे आहे. यासाठी तारेवरची कसरत होते. काहींना सर्व सुखे असूनही आनंदी जीवन जगता येत नाही. आनंद हा छोट्या छोट्या गोष्टीत, घटनांमध्ये मानला तर जीवन सुखकर होईल आणि जगणे सोपे होईल. नवी दिल्ली येथील डॉक्टरांनी स्वतःची कहाणी सांगत त्यांच्याकडील अनेक रुग्णांचे उदाहरणे देत जीवन जगण्यासाठी तसेच जीवनातील अनेक समस्या सोडवण्यासाठी ध्यानधारणेत किती ताकद आहे हे स्वतःचे उदाहरण देऊन स्पष्ट केले. सृष्टीची पावर ध्यानधारणेत आहे, असे नवी दिल्ली येथील हृदयरोगतज्ज्ञ डॉ. मोहित यांनी आपला जीवन प्रवास असंख्य अनुभवानी भरलेला मांडला. डॉक्टर रुग्णासाठी देव आहेत. पण त्यांच्याच आयुष्यात जेव्हा अचानक अनेक समस्या येतात, तेव्हा त्या समस्यांवर मात करण्यासाठी ताकद काय असते हे मोहित सरांनी सांगितले. त्यांचा प्रवास २० मार्च २००३ रोजी सलग ३८ तास ऑपरेशन करून घरी आले. आई म्हणाली. 'जेवण कर' पण जेवणासाठी ही ताकद नव्हती. तेव्हा आईने आईस्क्रीम खाण्यासाठी दिले. आईस्क्रीम हातात घेत अवघ्या दहा सेकंदात डॉक्टर जमिनीवर कोसळणे. पुढे त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. अनेक तपासण्यात केल्या तेव्हा कळाले की त्यांच्या ब्रेन मध्ये गाठ आहे. अमेरिकेत उपचार केले. ऑपरेशन यशस्वी होऊन दररोज १६ ते १८ गोळ्या आणि इंजेक्शन घेत २० जून २००५ मध्ये रुग्ण सेवा सुरू केली. जीवनात जे पाहिजे जसे हवे तसे सर्व मिळते. पण जेव्हा मृत्यू समोर दिसतो तेव्हा.... कारण पुन्हा जानेवारी २००६ मध्ये ब्रेनच्या स्कॅनमध्ये ब्रेन टी.बी..... निदान.. औषध उपचार सुरू होते. पण विचार मात्र स्वस्थ बसू देत नव्हते. तरुण वयात निर्माण झालेली ही समस्या त्यांना बेचैन करत होती. पुढील आयुष्याचे काय? यावर उत्तर शोधत होते आणि अचानक लहानपणीचे ध्यानधारणा कसे करत होतो हे आठवले. डॉक्टरांनी एक वर्ष राजयोग अभ्यास केला. पहाटे उठून तीन ते चार वाजता ध्यानधारणा करून ब्रेनला ताकद दिली. संकल्प हीच शक्ती... जीवनात चमत्कार घडवून आणते. अध्यात्मिक ताकदीमध्ये सायन्स आणि अध्यात्म एकत्र करून जीवनातील कोणतीही मोठी समस्या दूर करण्याची ताकद आहे. विचारांमधील ताकदीने डॉक्टरांच्या समस्यांवर विजय मिळवला. एप्रिल २००७ मध्ये ब्रेन समस्या पूर्ण बरी झाली आपल्या दैनंदिन कामकाजाला सुरुवात केली. डॉक्टर म्हणतात पन्नास ट्रिलियन पेशी (सेल) आपल्या शरीरात क्रिया घडवत असतात. प्रत्येक पेशी म्हणजे एक सुंदर धुन असते. संगीतामध्ये जी ताकद आहे त्याचप्रमाणे आपल्या शरीरातील पेशी शरीरात सुंदर धून वाजवत असतात. आपल्या मनावर ताबा ठेवा. शरीर शक्तिशाली बनवण्यासाठी जीम मध्ये जातात तसेच मनासाठी ध्यानधारणा अत्यावश्यक आहे. आपण आयुष्यात खरोखर आनंदी व्हायचं ठरवलं, तर तो संकल्पच आपल्याला तिथपर्यंत पोहोचवू शकतो सगळ्या समस्यांवर मात करण्यासाठी अंतःकरणातील संकल्पाची ताकद हीच खरी शक्ती ठरते. संकल्प शक्ती माणसाला आत्मविश्वास देते आणि संकटांवर मात करण्याची ताकद देते यासाठी नियमित ध्यानधारणा अत्यावश्यक आहे.

– प्रा. डॉ. जयश्री जाधव– कदम
के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक
मो.न. ९८८१९३८८५८

महत्त्वाचे

मनोज जरांगे पाटीलांची मुधोजीराजे भोसले, शिवाजीराजे जाधव यांनी घेतली भेट

संभाजीनगर । मनोज जरांगे पाटील यांची रविवारी (दि ७) संभाजी नगर गॅलेक्सी हॉस्पिटल येथे नागपूरचे मुधोजी राजे भोसले, शिवाजी राजे

जाधव शिंदखेडा, छावा मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा छावा भारत क्रांती मिशन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विलासभाऊ पांगारकर आदींनी भेट घेत तब्येतीची विचारपूस करत चर्चा केली. यावेळी मधोजीराजेंनी जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस करत नागपूर येथील पारंपारिक गणेश उत्सवाचे आमंत्रण दिले. त्याच बरोबर आम्ही जरांगे यांच्या सोबत आहोत आणि राहू असे सांगितले. आपण काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांना पत्र दिले होते. यामध्ये सर्वच मराठा समाजाला आरक्षण मिळावे, असे पत्र दिले होते. मात्र माध्यमांमध्ये तिची मांडणी चुकीच्या पद्धतीने आली. मात्र ज्याच्या कडे कुठलीही नोंद नाही, जे फक्त मराठा आहे, त्यांनाही आरक्षण मिळावे अशी मागणी होती. यावेळी किशोर चव्हाण, विजय काकडे पाटील, परमेश्वर नलावडे, दत्ता कदम, ॲड. अमित दोंदे, अक्षय राजे ताठे, छबुराव थोरात, संपत पगार, केतन जगताप, अतुल पांगरकर आदी नाशिक से संभाजीनगर येथील पदाधिकारी उपस्थित होते.

आदर्श शिशू विहार शाळेत पर्यावरणपूरक गणेश विसर्जन

नाशिक । मविप्र समाज संचलित आदर्श शिशू विहार व अभिनव बाल विकास मंदिर गंगापूर रोड या शाळेत पर्यावरणपूरक गणेश विसर्जन व

सत्यनारायण पूजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक रमेश पिंगळे आणि त्यांच्या पत्नी शोभा पिंगळे यांच्या हस्ते शाळेतील गणेशमूर्तीचे सत्यनारायण पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका मीनाक्षी गायधनी होत्या. पर्यावरणपूरक गणेश विसर्जन करण्यासाठी शाळेच्या मैदानावर विशेष तयारी करण्यात आली होती. विसर्जन मिरवणुकीत ढोल-ताशा, लेझीम पथक, विद्यार्थ्यांचे गणपती बाप्पा मोरया, "पुढच्या वर्षी लवकर या" अशा घोषणांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. या वेळी शिक्षणाधिकारी दौलत जाधव, कैलास शिंदे , रवी देशमुख, शालेय समिती सदस्य हेमलता पाटील, दीपक शिर्के, सरोज धुमणे, अर्चना ठाकरे, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारंपरिक वाद्य, ढोल-ताशांच्या ठेक्यावर बाप्पाला भावपूर्ण निरोप

नाशिक । गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, अशी भावनिक साद घालत, पारंपरिक वाद्य, ढोल ताशांच्या ठेक्यावर आणि गुलालाची उधळण करीत लाडक्या गणपती बाप्पाला भरपावसात भावपूर्ण निरोप देण्यात आला.

वाकडी बारव, फाळके रोड येथून जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून तसेच भक्ती चरणदास महाराज यांच्या हस्ते मानाच्या महापालिकेच्या गणपतीची विधिवत पूजा करून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री, आ. देवयानी फरांदे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, शहर अभियंता संजय अग्रवाल, गणेश महामंडळचे अध्यक्ष समीर शेटे यावेळी उपस्थितीत होते. विधिवत पूजेनंतर महापालिकेचा गणपती, रविवार कारंजा मित्रमंडळाचा चांदीचा गणपती, गुलालवाडी व्यायामशाळा मित्रमंडळाचा तिसरा गणपती, साक्षी गणेश (मानाचा चौथा) श्रीमान सत्यवादी मित्रमंडळाचा पाचवा गणपती

तसेच इतर मंडळांचे गणपती एकामागून एक मार्गस्थ करण्यात आले. सकाळपासूनच शहरात पावसाची रिमझिम सुरु होती. असे असले तरी, देखील भक्तांचा आणि ढोल ताशे वादकांचा उत्साह किंचीतसाही कमी झालेला नव्हता. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर अशी भावनिक साद यावेळी घालण्यात येत होती. गुलालाची उधळण करीत बाप्पाला निरोप देण्यासाठी हजारो नाशिककर रस्त्यावर उतरले होते. मिरवणूक सोहळ्यातील लाडक्या बाप्पाचा थाट डोळ्यात साठविण्यासाठी रस्त्यांवर उसळलेली अलोट

गर्दी रात्री उशिरापर्यंत पाहायला मिळाली.

मंत्री,आयुक्तांनी वाढविला उत्साह

मंत्री गिरीश महाजन, मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी मिरवणुकीत सहभाग घेऊन मंडळे आणि गणेश भक्तांचा उत्साह वाढविला. यावेळी महाजन यांनी स्वतः ढोल वाजविण्याचा आनंद लुटला, तर आयुक्त खत्री यांनी ढोल पथकातील झेंडा हातात घेऊन ढोल वाजवून उत्साह पूर्ण वातावरण तयार केले.

ढोल ताशांचा दणदणाट विसर्जन

मिरवणुकीचे वैशिष्ट्य ठरले. ताशांच्या कडकडाटात, ढोलपथकाच्या दमदार ठेक्यात संपूर्ण वातावरण भक्तिमय होऊन उपस्थितीत प्रत्येक जण भारावून गेला होता. गणपती बाप्पा मोरयाच्या घोषानेसोबतच ढोलपथकाचा नाद थेट हृदयाला भिडत होता.याशिवाय मिरवणुकीत शिवतांडवाच्या तालावर नृत्य सादर करण्यात आले, या नृत्याने सगळ्यांचेच लक्ष वेधले. याच मिरवणुकीत अघोरी वेषभूषाही मोठ्या चर्चेत राहिली. तसेच अन्य देव देवतांचे जिवंत देखावे, देखील मिरवणुकीत सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.त्यामुळे अनेकजण या कलाकारांसोबत फोटो काढताना दिसून आले.

सलग १५ तास मिरवणूक सुरु

यंदा गणेश विसर्जन मिरवणुकीत २५ मंडळे सहभागी झाले होते. सकाळी १० वा.३० मि.मिरवणूक सुरु करण्याचे नियोजन होते. परंतु सकाळच्या सत्रात पावसाचा जोर अधिक होता. त्यात मंत्री महाजन यांना देखील मिरवणूक स्थळी येण्यास काहीसा उशीर झाला. परिणामी मिरवणूक दुपारी १२ वाजता सुरु होऊन मिरवणुकीतील शेवटच्या गणपतीचे विसर्जन पहाटे ३ वाजून ३० मिनीटांनी करण्यात आले.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी संयुक्त पेन्शन अदालत घेण्याची मागणी

नाशिक । महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांना निवेदन सादर करण्यात आले असून, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रत्येक महिन्याला संयुक्त पेन्शन अदालत आयोजित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सेवानिवृत्त कर्मचारी हे जिल्हा परिषदेच्या विकासातील महत्त्वाचे आधारस्तंभ असून, त्यांच्या सेवेनंतर मिळणारे पेन्शन, गट विमा, रजा रोखीकरण, जीपीएफ, आश्वासित प्रगती योजनेनुसार पदोन्नती लाभ आदी हक्काचे प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित आहेत. अनेक विभाग प्रमुख आणि गटविकास अधिकाऱ्यांकडून विलंब होत असल्याने वृद्धापकाळात अनेक सेवानिवृत्त

कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारांसाठी व सन्मानाने जीवन जगणे कठीण झाले आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या आरोग्य विभागात दरमहा दुसऱ्या मंगळवारी पेन्शन अदालत घेतली जाते. मागील १२ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या अदालतित शेकडो महिला कर्मचाऱ्यांचे निवृत्तीनंतरचे लाभ न मिळाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे आरोग्य विभागाच्या धर्तीवर ग्रामपंचायत, महिला व बालकल्याण, बांधकाम, पशुसंवर्धन, शिक्षण, प्रशासन अशा सर्व विभागांमध्ये संयुक्त पेन्शन अदालत घेण्यात यावी, अशी मागणी महासंघाने केली आहे. तसेच शासन निर्णयानुसार सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ओळखपत्र वितरित करणे, सेवा विषयक प्रलंबित प्रश्न निवारणासाठी दर तीन महिन्यांनी तक्रार निवारण सभा आयोजित करणे, तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी जिल्हा सेवा प्रवेशोत्तर परीक्षेचा दिनांक सेवाजेष्ठता यादीसाठी ग्राह्य धरावा, अशा मागण्या देखील निवेदनातून करण्यात आल्या आहेत. ही माहिती महासंघाचे अध्यक्ष अरुण आहेर, कार्याध्यक्ष डॉ. भगवान पाटील, सरचिटणीस विक्रम पिंगळे यांनी दिली. यावेळी प्रमोद निरगुडे, महेंद्र पवार, यासीन सैय्यद, सागर गांगोडे, किशोर अहिरे, यतिन पगार, स्वाती बेंडकोळी, स्वाती महाजन, डॉ. निकम आदी पदाधिकारी उपस्थित होते.

'विनोदाचा बोनस' घेऊन येतेय 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'

नाशिक । सोनी मराठी वाहिनीवरच्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमानं महाराष्ट्रातल्याच नाही तर जगभरातल्या प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. या कार्यक्रमाचे अनेक चाहते झाले आहेत, ज्यामध्ये अनेक दिग्गज नामवंत कलाकारही सामील आहेत. आता महाराष्ट्राची हास्यजत्रा 'विनोदाचा बोनस' घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

२०१८ पासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' सोनी मराठी वाहिनीवर अविरत चालू आहे. विषयांचं नावीन्य, आपल्या मातीतला विनोद आणि मराठीमधल्या सर्व लहेजांचा गोडवा जपत हास्यजत्रेनं प्रत्येक वयोगटातल्या प्रेक्षकांना आपलंसं केलं आहे. एकवीसहून अधिक कलाकारांच्या संचानं नऊशेहून अधिक एपिसोड्स आणि सत्तावीसशेहून अधिक स्किट्सचं सादरीकरण करून विनोदी कार्यक्रमांच्या यादीत हास्यजत्रेला वरचं स्थान मिळवून दिलं आहे. प्रत्येक सिझनमध्ये प्रेक्षकांसाठी काहीतरी नवीन घेऊन येण्याचा प्रयत्न महाराष्ट्राची हास्यजत्राच्या संपूर्ण टीमचा असतो. या नवीन सिझनमध्येसुद्धा प्रेक्षकांचा ताण कमी करून विनोदाची हमी देणारे नावीन्यपूर्ण विषय घेऊन टीम सज्ज आहे. हा नवीन सिझन ७ सप्टेंबरपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार

आहे. समीर चौघुले, प्रियदर्शनी इंदलकर, शिवाली परब, प्रसाद खांडेकर, निखिल बने, मंदार मांडवकर, चेतना भट, ईशा डे, दत्तू मोरे, नम्रता संभेराव, प्रभाकर मोरे, श्याम राजपूत, विराज जगताप, वनीता खरात, अरुण कदम, रसिका वेंगुर्लेकर, प्रथमेश शिवलकर, श्रमेश बेटकर, ओंकार राऊत आणि पृथ्वीक प्रताप या तुफान कलाकारांनी रंगवलेल्या विविध पात्रांवर प्रेक्षकांनी आजवर प्रेम केलं आहे. सचिन गोस्वामी आणि सचिन मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे कलाकार नव्या जोमानं प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहेत. महाराष्ट्राची लाडकी निवेदिका प्राजक्ता माळी नि हास्यरसिक सई ताम्हणकर आणि प्रसाद ओक यांचीसुद्धा साथ आहेच. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा - विनोदाचा बोनस' हा नवा सिझन प्रेक्षकांच्या पसंतीस नक्कीच उतरेल. हा सिझन प्रेक्षकांचा ताण कमी करण्याची येत आहे.

ईद मिलाद निमित्ताने दिव्यांगांना शिधा वाटप

सुन्नी पंथीय श्रीजी सेंट्रलचा स्तुत्य उपक्रम

नाशिक । सामाजिक एकता व शांततेचा संदेश देणारे इस्लाम धर्मातील हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या 1500 व्या जयंती निमित्त भारत नगर येथील श्रीजी सेंट्रल सोसायटीतील सुफी सुन्नी पंथीय मुस्लिम समाजाच्या वतीने परिसरातील दिव्यांगांना शिधा वाटप करण्यात आले, प्रेषित मुहम्मद पैगंबर साहेबांचे विचार प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते इमरान शेख यांनी सांगितले.

याप्रसंगी दिव्यांग कल्याण संघटनेचे अध्यक्ष बबलु मिर्झा, रिजवान खान, शेफाली शर्मा,सिंधी सेवा समितीचे हरीश तलरेजा , समाज सेवक टीपु रजा, आदी उपस्थित होते. या स्तुत्य उपक्रमात इमरान शेख, याकुब खान, इदरीस काजी,अमन सैय्यद, शाहिद शेख यांनी सहभाग घेतला.

महत्त्वाचे

पंचाळा येथे बिबट्याचा हल्ला; दहा वर्षीय मुलाचा मृत्यू

सिन्नर । सिन्नर तालुक्यातील पंचाळा गावात सोमवार (दि.७) रोजी सायंकाळी घडलेल्या भीषण घटनेत बिबट्याच्या हल्ल्यात एका दहा वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे पंचाळा व परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पंचाळा गावातील डांबरनाला परिसरात घराजवळ लपाछपी खेळत असताना मक्याच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने सारंग गणेश थोरात (वय १०) याच्यावर झडप घालून प्राणघातक हल्ला केला. मानेला गंभीर जखम झाल्याने कुटुंबीयांनी तातडीने त्याची सुटका करून प्रथम पंचाळा येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र पुढील उपचारासाठी सिन्नर ग्रामीण रुग्णालयात नेत असताना त्याचा मृत्यू झाला. मृत सारंग हा पंचाळे येथील स्व. सूर्यभानजी गडाख विद्यालयात पाचवीत शिकत होता. सारंग व त्याची बहीण घराजवळ खेळत असताना हा प्रकार घडला. बिबट्याने सारंगला मान पकडून शेतात ओढून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र कुटुंबीयांच्या आरडाओरडीनंतर त्यांनी पाठलाग करून मुलाची सुटका केली. तरीही गंभीर जखमी झाल्याने उपचाराआधीच त्याचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे थोरात कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. घटनास्थळी नाशिकचे वनक्षेत्रपाल हर्षल पालेकर व सहाय्यक संरक्षक कल्पना वाघेरे यांनी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. पंचाळा व परिसरात बिबट्यांचा वावर वाढल्याने वनविभागाने तातडीने उपाययोजना करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. सिन्नर तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सलग पावसामुळे कालवे, तलाव व पाझर तलावांमध्ये पाणी साचल्याने परिसरातील मका पिके भरभराटली आहेत. दुधाच्या व्यवसायामुळे गुरेढोरे मुबलक असून, बिबट्यांना भक्ष सहज मिळत असल्याने त्यांचा वावर गावाजवळ वाढला आहे.तालुक्यात सध्या वनविभागाकडे केवळ सातच पिंजरा उपलब्ध आहेत. नागरिकांच्या वारंवार मागणीनंतरही सर्व गावांत पिंजरे पोहोचत नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांना शिक्षणाचा प्रकाश!

नाशिक । "जिथे कमी, तिथे आम्ही" या ब्रीदवाक्यानुसार नमस्ते नाशिक फाउंडेशनतर्फे सप्रे वाडी, शिरसाटे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, जीवनावश्यक वस्तू आणि भेटवस्तूंचे वाटप करून गणेश चतुर्थी साजरी करण्यात आली. फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात शालेय दप्तर, पेन्सिल, खोडरबर, रंगीत पेन्सिल, पाटी, शार्पनर, हायलाईटर आदी साहित्य देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार थंड पाण्याच्या बाटल्या देऊन करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय टाटिया होते. यावेळी वनपाल राजेंद्र आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी महावीर इंटरनॅशनलचे अनिल नाहर आणि दक्ष पोलीस टाईमचे विजय टाटिया यांचे सहकार्य लाभले. शाळेच्या वतीने आभार - शाळेचे सहाय्यक शिक्षक एल. एम. लोहारे, सोनाली ठाकरे प्रशिक्षणार्थी,तसेच मुख्याध्यापक आर. जी. शिंदे यांनी कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. कार्यक्रमास फुलचंद सप्रे शाळा व्यवस्थापन समिती, सुनीता दत्तू सदगीर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सरगम म्युझिक अकॅडमीतर्फे ६३ भक्तीगीतांचा स्वराभिषेक

नाशिक । ज्येष्ठ गायक, मार्गदर्शक नंदकुमार देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ६० गायक विद्यार्थ्यांनी भक्तिगीते सादर करून गणरायाची आणि बालाजीची आराधना केली. सर्वत्र रिमझिम पाऊस पडत असताना हा स्वराभिषेक झाला. गणेशोस्तवानिमित्ताने सरगम म्युझिक अकॅडमीतर्फे काल शुक्रवारी (दि.५)' तुज मागतो मी आता ' या सुरेल भक्तीगीतांच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले. गंगापूर धबधब्याजवळ शंकराचार्य न्यास संचलित बालाजी मंदिरात दुपारी २ वाजता ही मैफल रंगली. गायक, संगीतकार नंदकुमार देशपांडे यांच्यासह ६३ विद्यार्थी, विद्यार्थीनींनी गणराया व बालाजीच्या चरणी स्वरसेवा अर्पण केली. यावेळी अनेक भाविकांनी व बालाजीभक्तांनी उपस्थित राहून भक्तिगीतांचा आनंद घेतला. वरदा अमृतकर, देवश्री कुवर, डॉ. मधुरा धारणे, मोहिनी पाखले,स्वप्ना बिर्ला, प्रवीण मुर्डेश्वर, विनोद वैद्य, स्वाती कवीश्वर, मानसी गायधनी, गौरी वेढणे, सरिता जोशी , स्मिता प्रभू , योगिता कुमावत, मनिषा शिरोळे, कैलास पाटील, सोनाली लोणकर, अनिता पाटील, राजश्री पाटील, सुयोग वाघमारे, भालचंद्र कुलकर्णी, प्रज्ञा कुलकर्णी, प्रणव एकबोटे, अपर्णा डोंगरे, वृंदा लवाटे, सायली जोशी, मधुरा फाटक, शितल नेर, सुभाष सावरेकर, चेतना पवार, शुभांगी कुलकर्णी, वैशाली पवार, शैलजा डुबेरकर, मंगला भयाणी, मीरा भोये, विजया डुबेरकर, वेदिका जाधव, सीमा पाठक, रत्ना पाचारणे, सुवर्णा गायधनी, श्रुती जोशी, इंद्रायणी मुर्डेश्वर, प्रकाश रत्नाकर, शुभांगी जगदाळे, संतोष कराळे, सानिका जैन पूजाधिकारी, मयुरी मुरुडेश्वर, अजय पाटील, जयदीप जाधव, भानुदास पिंगळे, अमित गुरव, गीताली भट, कृष्णाली जोशी, अन्वी डुबेरकर, श्री जोशी, वेदिका जाधव, सायुरी कुलकर्णी, वल्लभा कुलकर्णी आदींसह या ६३ जणांनी स्वराभिषेक केला.

धक्कादायक : विंचूर-लासलगाव परिसरात रेशन धान्याचा काळा बाजार

गरिबांच्या ताटातील घास परराज्यात, नागरिकांत संताप

नाशिक । विंचूर-लासलगाव परिसरात रेशनच्या धान्याची थेट काळ्या बाजारात विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. पोलीस यंत्रणेच्या नाकावर टिच्चून सुरू असलेल्या या बेकायदेशीर धंद्यामागे स्थानिक व्यापारी, स्वस्त धान्य दुकानदार तसेच महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

लासलगाव विंचूर परिसरातील अनेक गावांमधून मरळगोई, येवला, कोपरगाव, नगर, सायखेडा, निफाड, चांदोरी, मनमाड येथून रेशन धान्य गोळा केले जाते. हे धान्य विंचूरमध्ये जमा करून मालवाहतूक वाहनांमधून उमराणा मार्गे थेट गुजरात राज्यात पोहोचवले जात असल्याचे वृत्त आहे. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर गहू व तांदळाचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात असून, गरीबांच्या हक्काचा माल बाहेरच्या बाजारपेठेत विक्रीस काढून काही भामटे कोट्यवधींचा काळा पैसा कमावत आहेत. शासनाच्या नियमांनुसार बीपीएल कार्डधारकांना दरमहा सुमारे ३९ किलो धान्य दिले जाते. यात प्रती किलो गहू दोन रुपये व तांदूळ तीन रुपये या दराने देण्याची तरतूद आहे. मात्र वास्तवात नागरिकांना या दरात धान्य मिळत नसून, काही भामटे किलोमागे एक रुपया अधिक आकारणी करतात.हे भामटे एवढ्यावरच थांबत नाहीत तर या धान्याचेच पोते व्यापाऱ्यांकडे वळवून ते अधिक किंमतीत काळ्या बाजारात विकले जात असल्याचा आरोप आहे. या प्रक्रियेमुळे गरीबांना हक्काचे धान्य वेळेवर व पुरेशा प्रमाणात मिळत नाही. या काळाबाजारासाठी परिसरात पिकअप आणि मालवाहतूक वाहनांचा सर्रास वापर होत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात धान्य बाहेरच्या राज्यात नेले जात असताना पोलीस व महसूल प्रशासनाच्या नजरेतून हा प्रकार सुटतोच कसा, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विंचूरमधील रेशन माफियाकडे प्रशासनाने डोळेझाक केली आहे का, असा संशय निर्माण होत आहे. या संपूर्ण प्रकारामुळे सामान्य जनतेमध्ये संताप व्यक्त केला जात असून या माफियांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. काळाबाजारात सामील दुकानदार व व्यापाऱ्यांवर देखील गुन्हे दाखल करण्याबरोबरच संबंधित महसूल अधिकाऱ्यांची देखील सखोल चौकशीची मागणी केली जात आहे. त्याचबरोबर स्वस्त धान्य दुकानांची तपासणी वाढवावी, तसेच रेशन धान्य वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर नियंत्रण ठेवावे, अशीही अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. शासनाने गरीबांच्या अन्नसुरक्षेसाठी राबविलेली योजना प्रत्यक्षात काळ्या बाजाराच्या विळख्यात सापडली असून, या गंभीर गैरप्रकाराला आळा बसवणे अत्यावश्यक आहे. विंचूर-लासलगाव परिसरातील रेशन काळाबाजार उघड झाल्यानंतर प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

रेशनच्या धान्याची काळाबाजारी याबाबत कुठलीही तक्रार असल्यास पुढील नंबरवर संपर्क साधावा. मो. ८६०५३८४९२५

तिसरीत शिकणाऱ्या रोहितचा संशयास्पद मृत्यू; ग्रामस्थांचा प्रशासनावर संताप

कळवण आश्रमशाळेतील धक्कादायक प्रकार

नाशिक । कळवण तालुक्यातील चणकापूर येथील आदिवासी विकास आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत आज एक हृदयद्रावक घटना घडली आहे. इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या रोहित विलास बागुल (वय १०, रा. सरले दिगर) या निरागस बालकाचा प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे, या घटनेने आदिवासी बांधवांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. रोहित सकाळी शाळेत असताना अचानक आजारी पडला. त्यावेळी शाळेतील शिक्षकांनी त्याला योग्य वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याऐवजी थेट घरी पाठवून दिले. काही तासांतच त्याची प्रकृती अधिकच बिघडली आणि अखेर त्याचा मृत्यू झाला. "वेळीच उपचार केले असते तर आमच्या लेकराचा जीव वाचला असता," असा जळजळीत आरोप रोहितच्या पालकांनी केला आहे. मुलाचा मृत्यू झाल्यानंतर संतप्त पालक आणि ग्रामस्थ शाळेत धावून गेले. रोहितचे पार्थिव थेट मुख्याध्यापकांच्या केबिनमध्ये आणून टेबलावर ठेवण्यात आले. या वेळी पालकांनी आक्रोश करत शाळा प्रशासनाला जबाबदार धरले. उपस्थित ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत निषेध नोंदवला. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, मुलाचा मृतदेह शाळेत तब्बल तीन तास ठेवलेला असताना प्रकल्प अधिकारी किंवा वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी आलेच नाहीत. विशेष म्हणजे, त्याच दिवशी आदिवासी विकास अप्पर आयुक्त पावरा कळवण तालुक्यातील कनाशी आश्रमशाळेत तपासणीसाठी उपस्थित होते. परंतु काही किलोमीटरवरच चणकापूरमध्ये दुर्दैवी घटना घडूनही ते घटनास्थळी दाखल झाले नाहीत. हा संवेदनाहीनपणा प्रशासनाच्या बेफिकीरीचा ज्वलंत पुरावा असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षण, निवास आणि आरोग्याच्या नावाने कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. तरीदेखील शाळेत आजारी पडलेल्या विद्यार्थ्याला तात्काळ वैद्यकीय मदत मिळू शकली नाही, ही गंभीर बाब आहे. शाळेतील आरोग्य यंत्रणा केवळ कागदोपत्री आहे का? प्रशासनाची देखरेख नेमकी कुठे आहे? आणि अशा आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात घालून शासन आपले कर्तव्य पूर्ण करत आहे का? असे ज्वलंत प्रश्न उपस्थित झाले आहेत.या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी शाळा प्रशासनावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. "आमच्या लेकरांच्या भविष्यासाठी आश्रमशाळा आहेत, पण इथे जीवाशी खेळ केला जातो. जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे," अशी संतप्त प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केली. एका निष्पाप बालकाचा जीव गेला, परंतु प्रशासन मात्र बेफिकीरपणे शांत बसले आहे. प्रशासनाची ही भूमिका संतापजनक असून, आदिवासी विभाग व जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले नाही तर नागरिकांचा आक्रोश आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. मुलांच्या जिवाशी खेळ करणाऱ्यां विरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जात आहे.

मोबाईल स्नॅचिंग प्रकरणात मुंबईनाका पोलीस ठाण्याची धडक कारवाई; आरोपी जेरबंद

नाशिक । शहरात वाढत्या मोबाईल स्नॅचिंगच्या घटनांना आळा घालण्यासाठी मुंबईनाका पोलीस ठाणे गुन्हे शोध पथकाने उल्लेखनीय कारवाई करत एका सराईत आरोपीस बेड्या ठोकल्या आहेत. ११ ऑगस्ट रोजी रात्री फिर्यादी कृष्णा श्याम सोनवणे यांचा मोबाईल हिसकावून नेण्याची घटना घडली होती. या गुन्ह्याचा तपास करताना गुन्हे शोध पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीचा शोध लावला. ४ सप्टेंबर रोजी महामार्ग बसस्थानक परिसरात मोबाईल विक्रीसाठी आलेल्या संशयितास पोलिसांनी सापळा रचून पकडले. तपासाअंती त्याने स्वत:चे नाव गणेश रमेश पाटील (वय २१, रा. बिडीकामगार नगर, पंचवटी) असे सांगितले. त्याच्या ताब्यातून तब्बल १,१७,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यात तीन वेगवेगळ्या कंपन्यांचे मोबाईल फोन तसेच चोरीसाठी वापरलेली नंबर प्लेट नसलेली पल्सर मोटारसायकल यांचा समावेश आहे. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून न्यायालयाने त्यास पोलिस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास मुंबईनाका पोलीस ठाणे गुन्हे शोध पथक करीत आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त संदिप कर्णिक, उपआयुक्त मोनिका राऊत, सहा. पोलीस आयुक्त नितीन जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष नरूटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. नाशिक शहर पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, सार्वजनिक ठिकाणी मोबाईल वापरताना काळजी घेण्याचे आवाहनही केले आहे.

सटाणा-ताहाराबाद रस्त्यावर भीषण अपघात; दोघा सख्ख्या भावांसह एकाचा जागीच मृत्यू

सटाणा । साक्री-शिर्डी राष्ट्रीय महामार्गावर वनोली फाट्याजवळ बस व मोटरसायकलचा भीषण अपघात झाला असून या भीषण अपघातात गोविंदा काळू पवार (38), विकास दयाराम माळी (19), रोशन दयाराम माळी (२८) राहणार सुकडनाला, सटाणा या तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे.

सटाण्याकडून मोटरसायकल क्रमांक एम एच ४१ बी एस ४१२४ ने ताहाराबादच्या दिशेने जात असलेल्या तिघा तरुणांचा आणि सटाणा दिशेने येणारी नंदुरबार-वसई एस.टी.बस क्रमांक एम एच १४ एल एक्स ८८४९ यांच्यात वनोली फाट्याजवळ भीषण अपघात झाला. या भीषण अपघातात मोटर सायकल वरील दोघा संख्याभावांसह एकाचा तरुणाचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच सटाणा पोलीस घटनास्थळी दाखल होत अपघाताचा पंचनामा करत अपघातग्रस्त वाहने पोलीस स्थानकात आणण्यात आली. पोलीस निरीक्षक योगेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी निंबा खैरनार, योगेश पवार, नितीन जगताप, बाळासाहेब टिळेकर, सिकंदर कोळी पुढील तपास करीत आहेत.

पंचवटीत ९०,२६९ मूर्तींचे तर ४५.९४५ मे टन निर्माल्य संकलन

नाशिक । पंचवटी विभागात "गणपती बाप्पा मोरया..मंगलमूर्ती मोरया..पुढच्या वर्षी लवकर या.." या नामघोषात गणपती बाप्पांना श्रध्दापूर्वक वातावरणात निरोप देण्यात आला.

पंचवटीत गोदावरी नदीच्या काठावर, रामतीर्थ(रामकुंड) व श्री म्हसोबा महाराज, गौरी पटांगणात मोठ्या प्रमाणात पाणी असतांना सुद्धा या ठिकाणी सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत बाळगोपाळ ते वयोवृद्धांपर्यंत गणेश भक्तांची मोठी गर्दी होती. नाशिक मनपाच्या पंचवटी विभागीय कार्यालय स्वागत-मूर्ती संकलन केंद्र व्यासपीठावरून भाविकांसाठी सूचना आणि मदत करण्यात आली. दरम्यान, पंचवटी विभागात "प्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरण राखण्यासाठी" महापालिकेच्यावतीने गोदावरी नदीच्या काठावर तसेच म्हसरूळ, मखमलाबाद, आडगांव, नांदूर-मानूर, हिरावाडी, गणेशवाडी, रामवाडी- गोदापार्क, हनुमानवाडी, मखमलाबरोड, पेठरोड, दिंडोरीरोड आदी विविध आवश्यक भागात मूर्ती व निर्माल्य संकलनासाठी सर्वतोपरी चोखपणे व्यवस्था करण्यात आली होती. सुमारे ९० हजार २६९ संख्येने श्री गणेश मूर्तींचे आणि ४५,९४५ मे टन निर्माल्य संकलन झाले. मनपाच्यावतीने पंचवटी विभागात श्रीगणेश विसर्जनासाठी एकूण-सहा ठिकाणी नैसर्गिक आणि १४ ठिकाणी कृत्रिम तलाव व्यवस्था करण्यात आलेली होती. पंचवटी गोदावरी नदीच्या काठावर रामकुंड व म्हसोबा गौरी पाटांगण या ठिकाणी तसेच इतर ठिकाणी मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्या आदेशाने पंचवटी विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र यांच्या नेतृत्वाखाली विविध विभागांचे खातेप्रमुख यांच्या देखरेखी खाली "श्री" विसर्जन सुरळीत पार पडले. यावेळी गणेश विसर्जन मूर्ती संकलनासाठी पंचवटी विभागीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. रवींद्र कलगुंडे, प्रकाश उखाडे यांनी ध्वनी प्रक्षेपणाद्वारे सूचना दिल्या. मान्यवरांश भाविकांचे स्वागत केले. पंचवटीत गणेश विसर्जन मूर्ती संकलनासाठी संजय कानडे, नंदू गवळी, रवींद्र कळवंडे, प्रकाश उखाडे, विकास देवरे, सुनील जगताप,संदिप जाधव, रविकांत मोरे,चांद शेख, वसंत चव्हाण, प्रमोद शेवाळे, प्रकाश ढेपणे, आर.आर.कडाळे, विजय उन्हाळे,सचिन पगारे, अशोक मानेकर, किरण निकम, कैलास जाधव, भाऊसाहेब साळवे, संतोष जाधव, संजय दिंडे, विजय शेरताटे, रतन गुंजाळ, चंद्रकांत आढाव, विनोद साबळे, मनीष जाधव, अशोक गोसावी, शांताराम सोनवणे यांनी परिश्रम घेतले. एकूण ९९ हजार २६९ गणेश मूर्ती संकलन करण्यात आले. यासाठी मनपासह खासगीचे ४०० हून अधिक कर्मचारी नियुक्त केलेले होते. बांधकाम विभागामार्फत ट्रक व ट्रॅक्टर मिळून एकूण ३७ वाहन व्यवस्था करण्यात आली होती.

पंचवटी विभागात घरच्या घरी पर्यावरण पूरक गणेश विसर्जन करण्यासाठी नागरिकांना ४००हून अधिक किलो अमोनिअम बायोकार्बोनेट पावडरचे स्वच्छता विभागाकडून विनामूल्य वाटप करण्यात आले. म्हसरूळ, आडगाव, पंचवटी पोलीस ठाण्याकडून सर्वत्र चोखपणे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मातोश्री पाटील विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

नाशिक । महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त लिपिक बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते. यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका स्वीकारत अध्यापनाची धुरा सांभाळली. तसेच यावेळी गुरुजनांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

आशा भोसले यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला सुरेल स्वरांमधून मानवंदना

नाशिक । काल लोकप्रिय गायिका आशा भोसले यांचा ९२ वा वाढदिवस होता. या चिरतरुण स्वरांच्या सम्राज्ञीला तिच्याच गाजलेल्या गाण्यांतून मानवंदना देण्यात आली. त्यातील सूरांची विविधता व गाण्यांची निवड थक्क करणारी होती. रसिक श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे ताल धरत गाण्यांना दाद दिली.

येथील एएन कराओके क्लबतर्फे पूर्वसंध्येला लोकप्रिय गायिका आशा भोसले यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्याच गाजलेल्या सुमधुर गाण्यांची मैफल आयोजित करण्यात आली. यावेळी नाशिकमधील अनेक गायक, गायिकांनी सहभागी होऊन आशाताईंना मानवंदना दिली. संयोजक नितीनकुमार चव्हाण यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. सायंकाळी ६ वाजता परशुराम साईखेडकर नाट्यगृहात झालेल्या 'दम मारो दम' या विनामूल्य मैफलीत उमा अग्रवाल, स्वराली चव्हाण, सोनल पडाया, अनिता खर्डे, संध्या चोपडे, शुभांगी महिरे या गायिकांनी आशाताईंनी गाऊन अजरामर केलेली लोकप्रिय गाणी सादर केली.

त्यांना युगुल गीतांमध्ये अविनाश येवलेकर, के.डी.पाटील, मुकेश पंडित, डी.डी.मोरे, चंद्रशेखर कोतकर, विजय पोळ, दिलीप चोपडे, सुनील कोचर, अरुण आव्हाड, अशोक महिरे या गुणी कलाकारांनी स्वरसाथ केली. बहूत शुक्रिया बडी मेहरबानी..., दिवाना हुआ बादल...,ले गई ले गई..., इशारो इशारो मे...,रात के हमसफर...,एक मै और एक तू..., जीवन के हर मोड पर..., झुमका गिरा रे... सपने में मिलती है..., पिया तू अब तो आजा... आणि दम मारो दम... या गाण्यांना रसिकांची विशेष पसंती लाभली. क्लबच्या संचालिका अंजली नितीनकुमार यांनी आशाताईंच्या मैफलींचे, पार्श्वगायनाचे किस्से सांगत दमदार सूत्रसंचालन केले. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून गाण्यांचा आनंद घेतला व कलाकारांना प्रोत्साहन दिले.

राजीनामा किंवा अविश्वास प्रस्ताव?

नवीन उपराष्ट्रपतीची निवडणूक ९ सप्टेंबर रोजी होणार आहे. यामध्ये एनडीएचे महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी. सुदर्शन रेड्डी यांच्या विरोधात उभे आहेत. या निवडणुकीविषयी फारशी उत्सुकता आणि चर्चा दिसत नाही. तथापि, सर्व काही सुरळीत सुरू असताना जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा का दिला? मंगळवारच्या निवडणकीनंतर नवीन उपराष्ट्रपती मिळतील. त्यानंतर धनखड त्यांच्या राजीनाम्याचे कारण स्पष्ट करतील का?

---

२१ जुलै रोजी संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले. जगदीप धनखड यांनी दिवसभर राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून सभागृहाचे कामकाज चालवले. त्यानंतर त्याच रात्री अचानक उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिल्याची बातमी आली. त्यांनी पद सोडण्याचे कारण प्रकृती अस्वास्थ्याचे दिले.

या राजीनाम्याबद्दल माध्यमांमध्ये अनेक तर्कवितर्क सुरू झाले. तथापि, ४८ दिवसांनंतरही धनखड यांनी या प्रकरणावर मौन बाळगले आहे. धनखड यांच्या जवळच्या सूत्रांचे म्हणणे आहे की, ९ सप्टेंबरपूर्वी हे मौन तुटणार नाही. योग्य वेळ आल्यावर ते पुढे येतील आणि परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी स्वतःचा निर्णय घेतील.

प्रत्यक्षात, धनखड यांच्या जवळच्या लोकांनी असाही दावा केला की धनखड यांनी स्वतःहून राजीनामा दिला नाही. त्यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले. सूत्रांच्या माहितीनुसार, त्यांच्याकडे दोन पर्याय होते, पहिला, स्वतःहून राजीनामा देणे. दुसरा, अविश्वास प्रस्तावाला सामोरे जाणे. उपराष्ट्रपती भवनातील विश्वसनीय सूत्रांनी पुष्टी केली आहे की धनखड यांना एक दिवस आधी माहित नव्हते की त्यांना राजीनामा द्यावा लागू शकतो. उपराष्ट्रपती धनखड २१ जुलै रोजी राज्यसभेच्या कामकाजाला उपस्थित राहिले. नंतर त्यांनी संध्याकाळी राजीनामा दिला.

जगदीप धनखड यांच्या जवळच्या एका सूत्राचा दावा आहे की, 'धनखड यांना दोन जणांमार्फत राजीनामा देण्याचा संदेश पाठवण्यात आला होता. यामागील खरे कारण काय होते हे फक्त धनखडच सांगू शकतात. २१ जुलै रोजीच धनखड यांना राजीनामा देण्याचा संदेश पाठवण्यात आला होता याची पुष्टी झाली आहे.

माजी उपराष्ट्रपतींकडे दोन पर्याय होते. पहिला, ते स्वतः राजीनामा देऊ शकत होते. दुसरा, त्यांना अविश्वास प्रस्तावाला सामोरे जावे लागू शकते. त्यांनी पहिला पर्याय निवडला कारण त्यांना दुसरा पर्याय निवडून अपमानित व्हायचे नव्हते.'

घटनात्मकदृष्ट्या, उपराष्ट्रपती हे पद राष्ट्रपतींच्या खाली आणि पंतप्रधानांच्या वर आहे. माजी उपराष्ट्रपती सतत त्यांच्या पदानुसार प्रोटोकॉलची मागणी करत होते, असे वृत्त देखील आले होते. जे त्यांना सरकारकडून मिळत नव्हते.

या सिद्धांतावर, सूत्र म्हणाले, 'यात काय चूक होती? माजी उपराष्ट्रपतींनी एकदा एका बैठकीत गृहमंत्र्यांच्या कडक स्वरात हसण्यावर आक्षेप घेतला होता. अशा अनेक कथा आहेत. माहितीनुसार, आतापर्यंत कोणतीही वेळ निश्चित केलेली नाही, पण, ते नक्कीच कधीतरी येतील.'

सूत्रानुसार, 'धनखड संघाच्या जवळ जाऊ इच्छित होते. ते संघाच्या अनेक वरिष्ठ नेत्यांनाही भेटले. संघाकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल आणि त्यांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल त्यांनी तक्रार केली. गेल्या एका वर्षात त्यांनी संघाच्या बाजूने अनेक मोठी विधाने केली. याच वेळी संघ आणि भाजपमधील मतभेदांबद्दल माध्यमांमध्ये बातम्या आल्या होत्या.'

धनखड यांना वाटले की संघ त्यांच्या बाजूने उभा राहील. तथापि, संघाने स्पष्ट केले की ते या प्रकरणात 'तटस्थ' राहतील.

सूत्रांनी सांगितले की, त्याऐवजी संघाने धनखड यांना सांगितले की, 'त्यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून संघाचे कौतुक करू नये कारण यामुळे दोन संदेश जातील. पहिले, असे दिसून येईल की हे सर्व संघाच्या इशाऱ्यावर घडत आहे. दुसरे, पक्ष आणि संघटनेत गैरसमज वाढू शकतात.'

धनखड यांनी संघाच्या समर्थनार्थ काही विधाने केली होती.

१. संघराज्याची टीका ही संविधानाच्या विरुद्ध

३१ जुलै २०२४ रोजी समाजवादी पक्षाचे खासदार रामजीलाल सुमन यांनी राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या (एनटीए) अध्यक्षांच्या नियुक्तीवर प्रश्न उपस्थित केले होते. प्रत्यक्षात यामध्ये संघाचे नाव पुढे आले होते. यावर धनखड म्हणाले होते, 'आरएसएसवर टीका करणे संविधानाच्या विरुद्ध आहे. देशाला आरएसएसचा अभिमान असला पाहिजे.'

'राष्ट्राची निःस्वार्थपणे सेवा करण्यास वचनबद्ध असलेले लोक संघात आहेत.

संघ आपल्या संस्कृती, समाज आणि राष्ट्रीय हिताच्या विकासासाठी काम करत आहे. संघ हा एका जागतिक दर्जाच्या थिंक टँकसारखा आहे, त्याचे स्वयंसेवक अनेक कलांनी समृद्ध आहेत.'

२. माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी २ जुलै २०२४ रोजी राज्यसभेत सांगितले होते की ते गेल्या २५ वर्षांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) चाहते आहेत. एकलव्यशी स्वतःची तुलना करताना त्यांनी म्हटले होते की त्यांना आरएसएसशी औपचारिकपणे जोडले जात नसल्याबद्दल पश्चात्ताप होतो.

धनखड म्हणाले होते, 'मी आरएसएसच्या एकलव्यासारखाच राहिलो. माझ्या मनात नेहमीच एक खंत असायची की मी पहिले वर्ष का केले नाही, दुसरे वर्ष का केले नाही, तिसरे वर्ष का केले नाही?'

३. संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसाबळे यांनी संविधानाच्या प्रस्तावनेचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी त्यातून धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे शब्द काढून टाकण्याबाबत बोलले होते. धनखड यांनी २८ जून २०२५ रोजी यावर आपले मत मांडले होते. त्यांनी म्हटले होते की, 'प्रस्तावना पालकांसारखी आहे, जी बदलता येत नाही.'

हे विधान आरएसएसच्या मागणीपेक्षा वेगळे होते. तथापि, पुढच्याच ओळीत त्यांनी आणीबाणीच्या काळात संविधानाच्या प्रस्तावनेत धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे दोन शब्द जोडल्याबद्दल टीका केली होती. प्रत्यक्षात, भागवत यांनी त्यांच्या विधानाद्वारे स्पष्ट केले होते की हे दोन्ही शब्द मूळतः संविधानात नव्हते. हे काँग्रेसच्या काळात जोडले गेले होते.

उपराष्ट्रपती भवनातील एका सूत्रानुसार, 'जेव्हा कोणी आपल्या पदाचा राजीनामा देतो तेव्हा ते निश्चितच काही दिवस आधी त्याबद्दल विचार करतात. तथापि, धनखड यांना एक दिवस आधीपर्यंत माहित नव्हते की ते राजीनामा देणार आहेत. त्यांनी राजीनामा देण्याच्या एक दिवस आधी ४० किलो जिलेबी मागवली होती. ते हे अनेकदा करायचे. ते संपूर्ण कर्मचाऱ्यांमध्ये वाटून टाकायचे. जर त्यांना असे काही अपेक्षित असते तर त्यांनी कदाचित हे केले नसते.'

सूत्राने दावा केला की, धनखड यांना त्यांच्या राजीनाम्याची माहिती एक दिवस आधीपर्यंत नव्हती. त्यांच्या देहबोलीवरूनही ते कोणत्याही गोष्टीमुळे नाराज असल्याचे दिसून आले नाही. सूत्राने असेही म्हटले आहे की आमच्यापर्यंत पोहोचलेल्या काही बातम्यांवरून असे दिसून आले आहे की माजी उपराष्ट्रपती आणि सरकारमध्ये काहीतरी सुरू आहे.

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी २ सप्टेंबरच्या रात्री सरकारी इमारत सोडली. ते दिल्लीतील छतरपूर येथील एका फार्म हाऊसमध्ये स्थलांतरित झाले आहेत. हे फार्म हाऊस हरियाणाचे दिग्गज नेते अभय सिंह चौटाला यांचे आहे. त्यांना टाइप-८ सरकारी बंगला मिळेपर्यंत ते येथे राहू शकतात, जो त्यांना माजी उपराष्ट्रपती म्हणून हक्काचा आहे.

खरंतर, धनखड आणि आयएनएलडी प्रमुख अभय चौटाला यांच्यातील संबंध खूप जुने आहेत. जुलै २०१९ मध्येही जेव्हा धनखड यांनी बंगालचे राज्यपाल म्हणून पदभार स्वीकारला तेव्हा त्यांनी अभय सिंह चौटाला यांचे आजोबा देवीलाल यांच्याशी असलेल्या त्यांच्या संबंधांचा उल्लेख केला होता. त्यांनी म्हटले होते की देवीलाल यांनी त्यांना निवडणूक लढवण्यासाठी प्रोत्साहित केले होते. ते त्यांचे मार्गदर्शक आहेत.

१९८९ मध्ये जेव्हा देवीलाल उपपंतप्रधान झाले तेव्हा धनखड यांना कॅबिनेट मंत्री बनवण्यात आले. तथापि, १९९० मध्येच पंतप्रधान व्हीपी सिंह यांनी देवीलाल यांचे सरकार बरखास्त केले. धनखड देवीलाल यांच्या समर्थनार्थ उभे राहिले. त्यांनी ताबडतोब कॅबिनेट मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

धनखड छतरपूर येथील फार्म हाऊसमध्ये शिफ्ट झाल्यावर, अभय सिंग चौटाला यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले होते, धनखड आणि त्यांच्या कुटुंबातील नाते खूप जुने आणि खोल आहे. धनखड या फार्महाऊसमध्ये त्यांना हवे तितके दिवस राहू शकतात. हे त्यांचे घर आहे. तथापि, ते या फार्महाऊसमध्ये किमान ४-५ महिने राहतील.

खरं तर, माजी उपराष्ट्रपतींच्या जवळच्या सूत्रांनुसार, धनखड यांनी सरकारी बंगल्यासाठी अर्ज केला आहे, परंतु तो मिळण्यासाठी त्यांना किमान ४ ते ५ महिने लागतील. धनखड यांच्या पदानुसार, त्यांना टाइप-८ बंगला मिळेल. देवीलाल यांचे नातू अजय चौटाला यांनी आतापर्यंत धनखड यांना फार्म हाऊसवर भेट घेतली आहे. आयएनएलडीच्या सूत्रांनी सांगितले की, 'अजय चौटाला आणि धनखड यांचे चांगले जमते. ते ६ सप्टेंबरच्या संध्याकाळी धनखड यांना भेटायला गेले होते.'

धनखड आता जाट राजकारण करतील का?

चौटाला कुटुंब हरियाणात वर्षानुवर्षे सत्तेपासून दूर असेल, पण ते अजूनही जाट राजकारणात आघाडीवर आहेत. धनखड हे देखील जाट आहेत. अशा परिस्थितीत, प्रश्न असा निर्माण होतो की धनखड आता चौटाला कुटुंबासोबत जाट राजकारण करतील का?

सूत्रांनी सांगितले की, 'धनखड आणि चौटाला कुटुंब नेहमीच जवळचे होते, परंतु धनखड यांची धारा वेगळी झाली होती. आता धनखड यांनी फार्महाऊसवर राहण्याचा निर्णय घेतल्याने, धारा देखील भेटू शकतात. तथापि, धनखड किंवा चौटाला कुटुंबाने अद्याप याबद्दल काहीही सांगितलेले नाही.'

आता हे पाहायचे आहे की देवीलाल यांचा वाढदिवस २५ सप्टेंबर रोजी आहे. चौटाला कुटुंब दरवर्षी या निमित्ताने मोठा कार्यक्रम आयोजित करते. धनखड या कार्यक्रमाला उपस्थित राहतील का? त्याआधी अभय सिंह चौटाला रोहतकमध्ये मोठी रॅली काढणार आहेत, या रॅलीत धनखड यांचे नाव घेऊन ते भाजपवर निशाणा साधतील का?

साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

कालचा दिवस म्हणजे ८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला गेला. मानवी समाज सुसंस्कृत बनून समाजाचे शिक्षणाच्या जोरावर मानवी कल्याण होऊन सर्वांना विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात.

ज्ञानी लोकांपासून अज्ञानी लोकांची होणारी पिळवणूक, फसवणूक, शोषण आदीपासून मुक्तता व्हावी. निरक्षर लोकांना साक्षरतेची संधी मिळावी यासाठी राष्ट्रकुलच्या 'युनेस्को' या संघटनेने १९६५ साली जागतिक पातळीवर साक्षरता दिन साजरा करण्याची घोषणा केली व त्याच्या पुढच्या वर्षापासून ८ सप्टेंबरला जगभर ती प्रथा रूढ झाली. आज इतक्या वर्षांनंतरही युनेस्कोने सुरू केलेल्या जागतिक साक्षरता दिनाला जगभर प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

युनेस्कोच्या व्याख्येनुसार साक्षरता म्हणजे माणसाला दैनिक जीवनाशी निगडित बाबीविषयी लिहिता वाचता येणे, मानवी जीवनातील घडामोडींचे विश्लेषण करता येणे व वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून स्वतःच्या व समाजाच्या प्रगतीस हातभार लावणे. शिक्षणाचे महत्व कोणाला नाही? मानवी कल्याणासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे मात्र केवळ शिक्षण देणे म्हणजेच साक्षरता नव्हे तर मानवी प्रगतीच्या वाट्यात अडथळा बनण्याचा, गरिबीला नष्ट करण्याचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली मार्ग आहे.

जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाज बदलवण्यासाठी साक्षरता एक परिणामकारक साधन आहे म्हणूनच युनेस्कोने जगभर साक्षरता अभियान राबवले. युनेस्कोने सुरू केलेल्या या साक्षरता अभियानाला जगभर चांगला प्रतिसाद मिळाला.

भारतात सुद्धा या अभियानाचे चांगले फलित दिसून आले असून, एका आकडेवारीनुसार १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाला तेंव्हा भारताचा साक्षरता दर हा १२ टक्के इतकाच होता. १९९१ मध्ये साक्षरतेचे हे प्रमाण ५२ टक्क्यांवर आले तर २०११ मध्ये ते ७५.०६ वर पोहचले. पण आपला देश अजूनही १०० टक्के साक्षर नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी १०० टक्के साक्षरता आपण साध्य करु शकलो नाही.

उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, बिहार या उत्तरेकडील राज्यात अजूनही साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही त्यामानाने केरळसह दक्षिणेकडील सर्व राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जात आहेत.

श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान भोजन योजना, प्रौढ शिक्षण योजना, राजीव गांधी साक्षरता अभियान, नवभारत साक्षरता अभियान या सारखे उपक्रम राबवून सरकार देशातील साक्षरतेचा टक्का वाढवण्याचा प्रयत्न करत आहे.

या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसादही मिळत असल्याने लवकरच आपण १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करू. जागतिक साक्षरता दिनाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

■ ■ ■

अक्षरओळख नसलेल्यांच्या नावाने विद्यापीठ

जे कधीही प्राथमिक शाळेत सुद्धा गेले नाहीत साधी अक्षरओळख सुद्धा नाही पण ज्यांच्या नावाने विद्यापीठ आहे अशा दोन महान विभूती महाराष्ट्रात होऊन गेल्या त्या म्हणजे गाडगे बाबा आणि बहिणाबाई चौधरी. गाडगे बाबा यांच्या नावाने अमरावती येथे विद्यापीठ आहे तर बहिणाबाई चौधरी यांच्या नावे जळगाव येथे विद्यापीठ आहे आणि कित्येक विद्यालयात आणि महाविद्यालयाच्या पाठयक्रमात बहिणाबाई यांच्या कविता शिकविल्या जातात. त्यांच्या साहित्यावर कित्येकांनी पीएच. डी. मिळविल्या आहेत.

काल बहिणाबाई चौधरी यांची जयंती होती. जळगावजवळील एका खेड्यात त्यांचा जन्म झाला आणि त्या काळच्या परिस्थितीनुसार त्यांचे लग्न लवकरच म्हणजे त्याच्या वयाच्या १३ व्या वर्षी झाले. त्यांना तीन मुले झाली पण वयाच्या ३० व्या वर्षी त्या विधवा झाल्या. त्यांच्या ३ मुलांपैकी सोपानदेव चौधरी सुप्रसिद्ध कवी आहेत .बहिणाबाई यांनी आयुष्यभर शेतात काम केले आणि काम करताकरता कविता रचल्या. त्यातील फार थोड्या कविता आज उपलब्ध आहेत, त्या सोपानदेवांनी लिहून घेतल्यामुळे.

याबाबत सोपानदेव म्हणाले होते कि आई दिवसभर शेतात जाई आणि शेतात काम करता करता तिला कविता सुचत असत मग संध्याकाळी सर्वांची जेवणे झाली कि सोपानदेवांना त्या कविता सांगत त्या कविता सोपानदेव एका कागदावर लिहून ठेवत आणि तो कागद आईकडे देत. आई तो कागद तिच्या कमरेला एक चंची असे त्यात ती ठेवून देत आणि ती चंची कागदाने भरली कि त्याच्या घरात जे आढे असे (आढे म्हणजे आडवे लाकूड असे ज्यावर छप्पर असते), त्या आढ्यावर खोचून ठेवीत. अशा अनेक चंची तिथे खोचून ठेवल्या होत्या.

मग सोपानदेव एम. ए. झाले आणी मुंबईला नोकरीला लागले. ते सुद्धा कविता करत आणि त्या कविता त्यावेळी आचार्य अत्रे यांच्या" दैनिक मराठा " मध्ये प्रसिद्ध होत. एक दिवस त्यांना मुबईला निरोप मिळाला कि घराच्या व शेतीच्या वाटण्या होणार आहेत तेव्हा तुम्ही गावी या. ते गावाकडे आले. गावचे पंच जमले होते आणि ते घराबाहेर खुर्च्या टाकून बसले होते.

सोपानदेव आले. नंतर त्यांनी वाटणी करायला सुरवात करावी म्हणून त्यांच्या भावाने घरात जे काही असेल ते बाहेर आणायला सुरवात केली म्हणजे भांडी कुंडी वगैरे. त्यात एक चंची होती. तेव्हा सोपानदेव म्हणाले कि तेवढी चंची मला द्या, मला बाकी काही नको. पंचांना वाटले कि त्या चंचीत काही सोने वगैरे आहे काय? पण फक्त कागद निघाले ते सगळे जीर्ण झाले होते.

मग ते ती चंची घेऊन मुंबईला आले आणि त्यांनी एका वहीत त्या कविता लिहून ठेवल्या आणि त्या कविता नेहमी त्यांच्याबरोबर त्यांच्या शबनम पिशवीत असत. नेहमीप्रमाणे ते आचार्य अत्रे यांच्याकडे गेले पण ते "दैनिक मराठा" याचा अग्रलेख लिहीत होते. म्हणून ते परत यायला निघाले. वाटेत त्यांना आठवण झाली कि शबनम अत्रे यांच्या ऑफिस मध्येच राहिली आहे. ती घेण्यासाठी म्हणून परत आले तेव्हा अत्रे त्या कविता वाचत होते आणि सोपानदेव आल्यानंतर त्यांना म्हणाले कि तुम्ही सोने लपवून ठेवले. हा एक मोहरांचा हंडा आहे. मग त्यांनी त्या प्रसिद्ध केल्या. अत्रे यांनी बहिणाबाईंच्या कवितांवर दोन अग्रलेख दैनिक मराठ्यांत लिहिले.

सोपानदेव म्हणतात कि पाऊस आला की त्यांच्या आईला फार आनंद होत असे. त्यात श्रावण महिना आला कि तिला आनंद होत असे. सकाळी जात्यावर दळताना, तसेच धान्य पाखडताना, घरात केरवारे करताना ती स्वरचित कविता म्हणे .

तिला एकदा विचारले कि तुला कविता सुचते कशी? तर तिने सांगितले

"माझी माय सरस्वती , मला शिकविते बोली!
एका बहिणीच्या मनी, किती गुपिते पेरली!!
अरे घरोटा घरोटा, तुझ्यातून पडे पिठी!
तसे तसे माझे गाणे , पोटातून येते ओठी !!

बहिणाबाईंना माहेरचे खूप प्रेम असे. त्यांचेकडे नेहमी एक योगी येत असे. नेहमी माहेर माहेर करणाऱ्या त्या बहिणाबाईंना पाहून तो योगी त्यांना म्हणाला

माझे माहेर माहेर, सदा गाणे तुझ्या ओठी!
मग माहेरून आले मग सासरी कशापोटी !!

तेव्हा बहिणाबाई उत्तर देते

अरे एक हे रे योग्या, ऐक काय मी सांगते!
लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते!!

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने तर बहिणाबाईंची गाणी हा त्यांच्या पाठयक्रम याचा भागच बनवला आहे. माधुरी शानभाग यांनी फ्रॅग्रन्स ऑफ द अर्थ या नावाने बहिणाबाई चौधरी यांच्या कविता इंग्रजीमध्ये भाषांतरित केल्या आहेत. हे भाषांतरही बरेच प्रसिद्ध आहे. त्यातील बऱ्याच कविता या लोकांना माहित आहेत त्यांच्या कवितांच्या ओळीचे वर्णन म्हणीत झाले आहे

"अरे संसार संसार! जसा तवा चुल्ह्यावर!
आधी हाताला चटके तेव्हा मिळते भाकर !
"मन वढाळ, वढाळ! उभ्या पिकातलं ढोर!
किती हाकला हाकला! फिरून येते पिकावर!
"मन मोकाट मोकाट! याच्या ठाई ठाई वाटा!
जश्या वाऱ्याने चालल्या! पाण्यावरच्या रे लाटा!

त्यांच्या कमी प्रसिद्ध असलेल्या (अर्थात माझ्या मते) कविता खलिलप्रमाणे...

बिना कपाशीने उले त्याला बोड म्हणू नई!
हरिनामाविना बोले त्याले तोंड म्हणू नई !
नही वाऱ्याने हलले त्याले पान म्हणू नई !
नही ऐके हरिनाम त्याले कान म्हणू नई!
पाटा विहिरीवाचून त्याले मळा म्हणू नई !
नही देवाचे दर्शन त्याले डोळा म्हणू नई!
निजविते भुक्यापोटी तिले रात म्हणू नई !
आखडता दानासाठी त्याले हात म्हणू नई /
नाही वळखला कान्हा तिले गाय म्हणू नई /
जिते नही फुटे पान्हा तिले माय म्हणू नई /
अरे, वाटच्या दोरीले कधी साप म्हणूं नई !
इके पोटच्या पोरीले त्याले बाप म्हणूं नई !
इमानाले इसरला त्याले नेक म्हणूं नई !
जल्मदात्याले भोवला त्याले लेक म्हणूं नई !

दुसरी कविता

धरित्रीच्या कुशीमध्ये बियबियाणी निजली !
वर पसरली माती जशी शाल पांघरली !
बीज डरारे मातीत सर्व कोंब आले वर!
गहिवरले शेत जस अंगावरती शहार !
ऊनवाऱ्याशी खेळता एका एका कोंबातून !
प्रगटली दोन पान जशी हात ती जोडून !
टाळ्या वाजविती पान दंग देवाच्या भजनी !
जशी कार्टी करुणा होऊ दे रे आबादानी !
दिसामासा होय वाढ रोप झाली आता मोठी !
आला पिकाला बहर झाली शेतामध्ये दाटी !
कशी वाऱ्याने डोलती दाणे आले गाडी गाडी !
देव अजब गारुडी देव अजब गारुडी !

काल बहिणाबाई यांची जयंती होती. त्यानिमित्त या कवियत्रीला विनम्र अभिवादन!!

■ ■ ■

हे जगन्माते! राष्ट्राच्या रक्षणासाठी आम्हाला शक्ती दे

वाचक लिहितात

आई भवानी, तुझा नवरात्रीचा उत्सव म्हणजे केवळ नऊ दिवसांचा सण नाही, तर तो तुझ्या पराक्रमाचे, शौयार्चे आणि विजयाचे प्रतीक आहे. घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत, तुझ्या उदो उदो गजराने काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, आणि बंगालपासून महाराष्ट्रापर्यंत प्रत्येक दिशा दुमदुमून गेले आहे. प्रत्येक भक्ताच्या मनात तुझी भक्ती जागृत झाली आहे आणि तू दुर्बलांना शक्ती व लढवय्यांना प्रेरणा देत आहेस.

आई दुर्गे, तू अधर्माचानाश करण्यासाठी नऊ दिवस असुरांशी घनघोर युद्ध केलेस आणि महिषासुर व इतर दैत्यांचा वध करून या विश्वाला त्यांच्या क्रूरतेपासून मुक्त केलेस. त्याचप्रमाणे, मोगलांचे असुररूपी साम्राज्य उद्ध्वस्त करण्यासाठी हिंदूनृपती छत्रपती शिवाजी महाराजांनी महिषासुरमर्दिनी तुळजापूरवासिनी भवानी मातेची भक्तीभावाने उपासना करून हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधले. तोच पराक्रम आम्हाला पुन्हा एकदा आठवावा लागत आहे. कारण आज पुन्हा एकदा असुरी प्रवृत्तींनी या जगात थैमान घातले आहे. या असुरांविरुद्ध लढण्यासाठी आणि सत्याचा विजय मिळवण्यासाठी तुज्या लेकरांना तुज्यासारख्याच शौयार्ची गरज आहे. आम्हाला ती शक्ती दे.

आई महिषासुरमर्दिनी, तुझ्या मुकुटावर ज्या असुरांनी रक्तपात घडवला, त्यांनी धर्म विचारून निष्पाप जीवांचा बळी घेतला. पण तुज्या वीर जवानांनी त्यांच्या घरात घुसूनच त्यांना धडा शिकवला. त्यांनी तुझ्या मुकुटाचे रक्षण केले आणि तुझ्या चरणी त्या असुरांची मुंडमाळा अर्पण केली. आज प्रत्येक भारतीयाला तुझ्या वीर पुत्रांप्रमाणे राष्ट्रासाठी उभे राहण्याची प्रेरणा मिळत आहे.

माता महाकालीके, जेव्हा आमच्या वीर भारतीय सैन्याने दहशतवाद्यांचा खात्मा करून शौर्याची गाथा लिहिली, तेव्हा त्यांच्या त्यागावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याची हिंमत काही देशद्रोह्यांनी केली. आजही असे अनेक असुरी जीव समाजात वावरत आहेत. ते त्यांच्या वाईट कृत्यांनी पुन्हा एकदा धर्माला आणि राष्ट्राला आव्हान देत आहेत. आई, त्यांच्या षड्यंत्रांचे जाळे उलथून पाडण्याचे सामर्थ्य आम्हाला दे. आम्हाला खात्री आहे की त्यांचा हिशोब लवकरच लागेल.

माते रणचंडिके, आम्ही जंगलात लपलेल्या माओवादी नक्षलवाद्यांचा नायनाट करण्यात बऱ्याच प्रमाणात यश मिळवले. पण, आता भारत मातेचे अस्तित्व नाकारणाऱ्या अर्बन नक्षलवाद्यांचे एक नवे आव्हान उभे राहिले आहे. हे अर्बन नक्षलवादी राष्ट्रात अराजकता माजवण्याचा प्रयत्न करत आहेत. जातीवाद आणि प्रांतवादासारख्या समस्यांना खतपाणी घालून ते राष्ट्राला कमकुवत करत आहेत.

ज्या मायावी शक्तींना कित्येक दशकांपासून राष्ट्राचा विकास करता आला नाही, त्या आज समाजात जातीचे विष कालवत आहेत. अफजल आणि औरंग्याच्या कबरीवर फुले उधळणाऱ्या राष्ट्रद्रोही जमाती विरुद्ध संघर्ष करण्यासाठी आम्हाला बळ दे.

हे जगन्माते, या विचारांच्या सर्पांचे फडे ठेचून काढण्याची शक्ती दे. त्यांचे हे प्रयत्न निष्फळ करण्याचे सामर्थ्य आम्हाला दे आणि अशा विचारांवर मात करण्याची बुद्धी व विवेक दे.

आई जगदंबे, तुझ्या प्रत्येक भक्ताला तुज्यासारखीच लढण्याची शक्ती दे. हिंदुत्वाचे रक्षण म्हणजे स्वराज्याचे संरक्षण आहे. वाईटाचा नाश करण्याची आणि धर्माचे रक्षण करण्याची प्रेरणा दे. केवळ शत्रूंचा नाशच नाही, तर एक समृद्ध, एकसंध आणि बलशाली राष्ट्र निर्माण करण्याची शक्ती आम्हाला दे.

हे जगन्माते, आम्हाला आशीर्वाद दे!

■ अमोल तपासे
सिताबर्डी, नागपूर.
९९६०६७३७८९

■ ■ ■

रात्री हळदीचे दूध पिण्याचे फायदेच फायदे

प्रत्येक भारतीय घरात आजी-आजोबा झोपताना मुलांना दूध पिण्यास सांगतल आलेले असतात. आताही अनेकजण हा सल्ला पाळत असतात. परंतू तुम्हाला माहिती आहे का? लोक हळद घालून दूध का प्यायचे? आणि त्यातून शरीरास काय फायदे होतात?

रोगप्रतिकारक शक्ती वाढवते

हळदीचा मुख्य यौगिक करक्यूमिन तुमची रोगप्रतिकारक शक्तीला मजबूत करते. आणि त्याबरोबर काळासोबत आपली लवचिकता वाढवते. त्यामुळे तुमचे शरीर रोजच्या छोट्या छोट्या आजारांशी लढण्यास तयार होते. तुम्हाला खोकला, सर्दी, ताप असे मोसमी आजारापासून वाचवते.

त्वचेसाठी देखील फायदा

हळद घातलेले दूधाचे एंटीसेप्टीक गुण आणि एंटीऑक्सिडेंट्स पिंपल्स आणि त्वेचेच्या इतर समस्यांना दूर करण्यास मदत करते. हे तुमच्या त्वचेसाठी फायदेशीर होते.

गाढ झोपेसाठीचा शॉर्टकट

झोपण्यापूर्वी गरम हळदीचे दूध पिल्याने अनेक फायदे होतात. याच्या गरमपणा आणि हल्का मसाला शरीरास सिग्नल देतो की आता आराम करण्याची वेळ आली आहे. रात्री हळदीचे दूध प्यायल्याने मानसिक शांतता मिळते आणि त्यामुळे तुम्हाला चांगली झोप येते.

सूज कमी करते

हळदीत एंटी-इंफ्लेमेटरी प्रॉपर्टी असते. त्यामुळे शरीरातील सूज कमी करण्यासाठी मदत होते. आणि सांधे दुखी सारख्या आजार देखील हे फायदेशीर असते.

मेंदूसाठी चांगले..

गरम हळदीचे दूध मेंदूसाठी देखील फायदेमंद असते. कारण हळदीच्या दूधाने तुमची एकाग्रता वाढू शकते. आणि मूड चांगला राखण्यास मदत होऊ शकते.

अनेक आजारांना रोखते

खूप काळापर्यंत राहणारी सूज कॅन्सर, मेटाबोलिक सिंड्रोम, अल्झायमर आणि हृदय रोग सारख्या क्रॉनिक डिसीसना वाढवतात. त्यामुळे म्हणून, दाहक-विरोधी संयुगे समृद्ध आहार या आजारांचा धोका कमी करू शकतो.

आले, दालचिनी आणि करक्युमिन (हळदीतील सक्रीय तत्वे) वर केलेल्या संशोधनात कळले की या तिन्हीत शक्तीशाली सूजविरोधी गुण असतात. त्यामुळे रात्री हळदीचे दूध अवश्य प्या.

■ ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

महिमा गुरूंचा..!

लहान मुले आम्ही अजाण
क्षीर-निराची नाही जाण
देऊन आम्हा ज्ञान
गुरूवर्या बनवा वीर महान!

गुरूवर्या, तुमचे कार्य महान
महती गाती वेद पुराण
वर्णाया शब्द पडती सान
करितो आम्ही प्रणाम!

भौतिक सुखाने सीमा गाठली
परी अंतरीची शांती ढळली
करण्या दानवी वृत्तीचा संहार
रूजविता मानवतेचे संस्कार!

एमएमआरमध्ये १० जलवाहतूक मार्ग सुरु होणार; राज्य सरकारकडून चाचपणी

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

गेल्या ३० वर्षांत मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) अनेक जलवाहतूक बंद झाले आहेत. प्रवाशांची कमतरता आणि भरमसाठ भाडे यामुळे हे मार्ग बंद करण्यात आले होते. असे असले तरी राज्य सरकार मुंबई महानगर प्रदेशात १० नवीन जलवाहतूक मार्ग सुरू करणार आहे. यामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या चार मार्गांचा समावेश आहे. वाहतूक कोंडी कमी करणे, किनारी वाहतूकीतून महसूल वाढवणे असे या जलवाहतुकीचे मुख्य उद्देश आहे. कोची वॉटर मेट्रो, जी कोची परिसरात अंतर्गत जलवाहतूक सेवा चालवते, ती प्रस्तावित १० मार्गांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणार आहे.

या सल्लागार संस्थेला प्रवासी चढण-उतरण सर्वेक्षण, प्रस्तावित जेटीजवळील प्रभावक्षेत्राचा अभ्यास, त्या भागातील प्रवासी वापराचे सर्वेक्षण, घरगुती व प्राधान्य सर्वेक्षण, प्रवास मागणी विश्लेषण, टर्मिनल सुविधा नियोजन आणि टर्मिनल्सचे संकल्पनात्मक आराखडे तयार करणे अशा विविध अभ्यासांचे काम करावे लागणार आहे. सध्या एमएमआरमध्ये २१ मार्गांवर जलवाहतूक सेवा सुरू आहेत. हे सर्व मार्ग अनेक दशकांपासून चालू आहेत आणि प्रामुख्याने जेटीजवळील स्थानिक लोकांनाच सेवा देतात, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. १९९२-९३ मध्ये दमाणी शिपिंग कंपनीला गेटवे ऑफ इंडिया-नवी मुंबई तसेच पश्चिम किनाऱ्यावर जुहू ते गिरगाव चौपाटी यांदरम्यान होव्हरक्राफ्ट सेवा सुरू करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. मात्र जास्त भाड्यांमुळे हे दोन्ही मार्ग बंद करण्यात आले.

जलवाहतूक सेवा सुरूच झाली नाही

पुढील दशकांत जलवाहतूक सेवांसाठी अनेकदा निविदा काढल्या गेल्या, पण बहुतांश वेळा सेवा सुरूच झाल्या नाहीत. २००३ मध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सत्यगिरी शिपिंगला शहराच्या पश्चिम किनाऱ्यावर जलवाहतूक सेवा सुरू करण्याचे कंत्राट दिले होते. २०१० मध्ये नरिमन पॉईंट ते बोरीवली जलवाहतूक सेवा सुरू करण्याचे कंत्राट प्रतिभा इंडस्ट्रीजला देण्यात आले होते. २०१५ मध्ये बेलापूर-नेरुळ दरम्यान फेरी सेवेसाठी निविदा दिली गेली. मात्र सर्वच करार रद्द करण्यात आले कारण एकाही प्रकरणात फेरी सेवा सुरू झाली नाही.

"स्पेक्स २०३०" उपक्रमाद्वारे गडचिरोलीतील नागरिकांची होणार नेत्रसेवा - मुख्यमंत्री

सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटनेचा उपक्रम

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

गडचिरोलीसारख्या आदिवासी व मागास जिल्ह्यांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती व उपचार पोहोचविण्यासाठी तसेच तेथील नागरिकांना परवडणाऱ्या व गुणवत्तापूर्ण नेत्रसेवा उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात येत आहे. राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या "स्पेक्स २०३०" या प्रकल्पामुळे मुलांचे शिक्षण, तरुणांसाठी रोजगार व संपूर्ण समाजाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणारा हा उपक्रम महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात राबविण्यात यावा, असे आवाहन केले. जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुका आता डोळ्यांसंदर्भातील आरोग्यसेवेच्या दृष्टीने देशभरात आदर्श ठरणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा 'स्पेक्स २०३०- वन साईट कार्यक्रम" राज्य सरकारच्या आरोग्य विभाग आणि वन साईट एसीलॉर लक्सोटिका फाऊंडेशन यांच्या सहकार्याने गडचिरोलीसह देशातील पाच मागास जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम राष्ट्रीय अंधत्व निवारण व दृष्टिदोष नियंत्रण कार्यक्रम (NPCBVI) अंतर्गत राबविला जाणार आहे.

जगभरात २.२ अब्ज लोकांना दृष्टीदोषाचा त्रास असून, त्यातील किमान १ अब्ज प्रकरणे टाळता येऊ शकतात. भारतात जवळपास ५३ टक्के दृष्टीदोष हे अपूर्ण दृष्टीदोष दुरुस्तीमुळे (Refractive Errors) निर्माण होतात. यामध्ये प्रत्येक दहा शाळकरी मुलांपैकी एका मुलाला दृष्टीविषयक समस्या भेडसावते. या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेमार्फत "स्पेक्स २०३०" ही योजना सुरू करण्यात आली असून २०३० पर्यंत सर्वसामान्यांना स्वस्त व दर्जेदार चष्म्यांचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेमार्फत गडचिरोलीसह आसाम (धुब्री), ओडिशा (कलाहांडी), राजस्थान (अलवर) आणि उत्तर प्रदेश (प्रयागराज) या राज्यांतील निवडक भागांमध्ये "आशा किरण मॉडेल"च्या आधारे सेवा राबवली जाणार आहे. या मॉडेलमध्ये आशा सेविकांमार्फत घराघरात प्राथमिक नेत्रतपासणी, प्राथमिक आरोग्य केंद्रांवर रेफ्रॅक्शन व चष्म्यांचे वितरण तसेच शासकीय रुग्णालयांत मोतीबिंदू शस्त्रक्रिया अशा सर्व टप्प्यांवर नेत्रआरोग्यसेवा पुरवली जाणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व क्षमता वृद्धी, समुदायामध्ये जनजागृती मोहीम, शाळा व ग्रामपंचायत पातळीवर आरोग्यविषयक संवाद, स्थानिक स्वयंसेवी संस्था व माध्यमांद्वारे प्रचार-प्रसार तसेच कार्यक्षमता व परिणामकारकता मोजण्यासाठी डेटा संकलन व विश्लेषण अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

बाधित घर खरेदीदारांना महारेराचा दिलासा तब्बल ५२६७ तक्रारी निकाली

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

महारेराने ऑक्टोबर २०२४ ते जुलै २०२५ या दरम्यान घर खरेदीदार ग्राहकांच्या विविध तक्रारींबाबत तब्बल ५२६७ तक्रारी निकाली काढल्या आहेत . एवढेच नाही तर महारेराकडे जुलै अखेरपर्यंत दाखल झालेल्या घर खरेदीदारांच्या तक्रारींची पहिली सुनावणीही झाली किंवा त्यातल्या काहींच्या सुनावणीसाठीच्या तारखाही निश्चित करण्यात आल्या आहेत.

घरखरेदीदार आयुष्याची कमाई गुंतवून घर नोंदवतो. परंतु काही कारणाने त्याला आश्वासित वेळेत ताबा मिळाला नाही, गुणवत्ता बरोबर नाही , घर खरेदी करारात मान्य केलेल्या सोयी सवलती आणि इतरही काही बाबी नाहीत, अशा स्वरूपाच्या अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. या घरखरेदीदारांच्या हितांचे रक्षण करण्याची जबाबदारी महारेराची आहे. त्यामुळे महारेराकडे नोंदवल्या जाणाऱ्या तक्रारींची नोंद वेळच्यावेळी घेतल्या जावी. न्याय्य दिलासा दिला जावा. यासाठी महारेराचे अध्यक्ष मनोज सैनिक आणि त्यांचे सहकारी महारेरा सदस्य एक महेश पाठक आणि महारेरा सदस्य-दोन रविंद्र देशपांडे यांनी तक्रारींबाबत सुनावण्यांची गती वाढविण्याचे नियोजन केले. त्यांच्या या नियोजनाला यश येऊन इतके दिवस अनेक कालावधीसाठी प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्याचा सपाटा या तिघांनी लावला. ऑक्टोबर २०२४ ते जुलै २०२५ या काळात या तिघांनी तब्बल ५२६७ तक्रारींबाबत यथोचित निर्णय घेऊन घर खरेदीदारांना मोठ्या प्रमाणात दिलासा दिला. प्रत्यक्षात या काळात ३७४३ तक्रारी दाखल झालेल्या होत्या. तक्रारी दाखल झाल्यानंतर महिन्या दोन महिन्यात त्याची नोंद घेऊन सुनावणी होण्याची चांगली स्थिती महारेरामधे आता पहिल्यांदाच निर्माण झालेली आहे.

मे २०१७ ला महारेराची स्थापना झाली. तेव्हापासून महारेराकडे ३०,८३३ तक्रारी दाखल झालेल्या आहेत. त्यापैकी २३ हजार ७२६ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. यात महारेरा स्थापनेपूर्वीच्या ३५२३ प्रकल्पातील २३६६१ तक्रारी आहेत तर महारेराच्या स्थापनेनंतर २२६९ प्रकल्पांच्या अनुषंगाने ६ हजार २१८ तक्रारी दाखल झालेल्या आहेत. महारेराच्या स्थापनेनंतरच्या तक्रारींचे प्रमाण २१ टक्के आहे तर स्थापनेपूर्वी हे प्रमाण ७९ टक्के आहे. सद्या राज्यात ५१,४८१ प्रकल्प नोंदणीकृत असून यापैकी ५७९२ प्रकल्पात तक्रारी आलेल्या आहेत.

भविष्यात घरखरेदीदारांच्या तक्रारी उद्भवू नये. प्रकल्प आश्वासित वेळेत पूर्ण व्हावा. यासाठी प्रकल्प पूर्ततेतील संभाव्य अडथळे लक्षात घेऊन महारेराने अडथळ्यांच्या या शक्यतांची प्रकल्प नोंदणीच्या वेळीच कठोर छाननी करण्याची भूमिका घेतलेली आहे. कुठल्याही प्रकल्पाचे भविष्य ठरविण्यात प्रकल्पाची सर्वच बाबतीतील वैद्यता आर्थिक आणि तांत्रिक घटक महत्त्वाची भूमिका बजावत असतात. म्हणूनच महारेराने या त्रिस्तरीय पातळीवर प्रस्तावित प्रकल्पाची कठोर छाननी व्हावी यासाठी वैद्यता, आर्थिक आणि तांत्रिक बाबी सर्वंकषपणे आणि कठोरपणे तपासणारे, छाननी करणारे तीन स्वतंत्र गट निर्माण केले. यात विहित केलेल्या तरतुदींची पूर्तता झाल्याशिवाय प्रस्तावित प्रकल्पांना महारेरा नोंदणी क्रमांक दिला जात नाही. ग्राहकांची गुंतवणूक सुरक्षित आणि संरक्षित राहावी आणि भविष्यात तक्रारी उद्भवू नये, असा महारेराचा प्रयत्न आहे.

प्रदूषण संदर्भातील तक्रारींसाठी महापर्यावरण ॲप सुरु; थेट तक्रार करता येणार

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

औद्योगिक वसाहतींमध्ये होत असलेल्या जल, वायू आणि ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारीसाठी आता पर्यावरण विभागाने महापर्यावरण ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून प्रदूषण होणाऱ्या ठिकाणांची, घटनेची प्रत्यक्ष (लाइव्ह) तक्रार करता येणार आहे. त्यामुळे प्रदूषणाच्या समस्या या ॲपमुळे दूर होण्यास मदत होणार आहे.

थेट तक्रार करता येणार

औद्योगिक वसाहतींमध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रदूषणावर नियंत्रण ठेवले जाते. मात्र सद्यस्थितीत मंडळाकडे असलेले कमी मनुष्यबळ तसेच आलेल्या तक्रारींचा निपटारा करण्यात लागलेला वेळ आदी बाबी लक्षात घेता हे ॲप विकसित करण्यात आल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने म्हटले आहे. या ॲपद्वारे कारखान्यातून होणारे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण याची थेट तक्रार त्रास होणाऱ्या नागरिकांना किंवा सर्वसामान्य नागरिकांना वैयक्तिकरित्या करता येणार आहे.

प्रदूषणकारी कारखाने अधिसूचित

औद्योगिक वसाहतींमध्ये ग्रीन, रेड, ऑरेंज अशा श्रेणीत व टप्प्यांमध्ये प्रदूषणकारी कारखाने प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अधिसूचित करण्यात आले आहेत. ग्रीन प्रकारच्या अधिसूचनेत असलेल्या कारखान्यांकडून सहजा सहजी प्रदूषण होत नाही. ऑरेंज प्रकारच्या अधिसूचनेत मध्यम अर्थात वायू व जल प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांचा समावेश आहे, तर रेड प्रकारच्या श्रेणीमध्ये जल, ध्वनी व वायू अशा तीनही प्रकारच्या प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांचा समावेश करण्यात आला आहे. यासह या श्रेणीमध्ये प्रदूषित रासायनिक सांडपाणी व प्रदूषित रासायनिक घातक घनकचरा यांचा समावेश आहे. अर्थात रेड कॅटेगरीमध्ये येणारे केमिकलयुक्त कारखाने, रसायन प्रक्रियेचे कारखाने, धागा डाय करणारे कारखाने, रसायन घनपदार्थ तयार करणारे कारखाने, लोहनिर्मितीचे कारखाने, धोकादायक वायूंचे उत्सर्जन होणारे कारखाने, धोकादायक कचरा निर्माण होणारे उत्पादन कारखाने, तेल शुद्धीकरण कारखाने, सिमेंट कारखाने, साखर कारखाने, खत कारखाने, रंग आणि रंग-मध्यवर्ती उत्पादक आदींचा समावेश करण्यात आला आहे.

मनसे-शिवसेना ठाकरे एकत्र येणार ? काँग्रेससमोर नवा पेच!

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

राज्याच्या राजकीय पटावर नवे समीकरणं घडण्याची शक्यता व्यक्त होत असून त्याचा थेट परिणाम महापालिका निवडणुकांवर दिसणार आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले तर नेमकी कोणती परिस्थिती निर्माण होईल, हा प्रश्न काँग्रेससह सर्वच पक्षांना गोंधळात टाकतो आहे.

सध्या मनसे-शिवसेना ठाकरे युतीची चर्चा जोमात असून, मातोश्रीवर या संदर्भात बैठकीही झाल्या आहेत. काँग्रेस या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. राज्यातील काँग्रेस नेत्यांकडून युतीबाबत विविध मतप्रवाह दिसत आहेत. मात्र अंतिम निर्णय दिल्लीतील पक्षश्रेष्ठीच घेतील, असे संकेत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिले आहेत.

"मनसे आणि शिवसेना ठाकरे गट जर एकत्र आले, तर काँग्रेसची भूमिका काय असेल याबाबत दिल्लीतील नेत्यांशी चर्चा करूनच पुढील भूमिका ठरवली जाईल," असं वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं. येत्या महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काँग्रेसने कोणती दिशा घ्यावी, यावरही या चर्चेत अंतिम शिक्कामोर्तब होणार आहे.

राज्यातील विरोधी पक्षाचे समीकरण बदलण्याची शक्यता या चर्चेतून अधोरेखित होत असताना, काँग्रेसने आपल्या पत्त्यांचा कसा उपयोग करावा, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे खरोखरच एकत्र येतात का, आणि त्यानंतर काँग्रेस कुठल्या भूमिकेत राहते, याकडे सगळ्यांचे डोळे लागले आहेत.

भावाच्या लढ्यासाठी बहिणीचा न्यायालयीन रणसंग्राम!

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

राजकीय वाद, आरोप-प्रत्यारोप आणि न्यायालयीन संघर्ष यामध्ये आता एका बहिणीची धाव सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. राज्यातील गाजलेल्या प्रकरणात पोलिसांनी दिलेल्या क्लीनचिटवरून निर्माण झालेला वाद आता नव्या वळणावर पोहोचला आहे. नवाब मलिक यांना पोलिसांनी दिलेली क्लीनचिट आव्हान देण्यासाठी समीर वानखेडे यांची बहीण यास्मीन वानखेडे थेट न्यायालयात गेल्या आहेत. "ही चौकशी निष्पक्ष नाही," असा त्यांचा ठाम दावा आहे. यास्मीन यांच्या याचिकेत पोलिसांवरच गंभीर आरोप करण्यात आले असून, त्यांनी मलिक यांच्या आरोपांची दखल न घेता केवळ तर्क आणि राजकीय भूमिकांवर आधार घेत निर्णय दिल्याचा आरोप केला आहे.

त्यांनी मांडलेल्या युक्तिवादात मलिक यांचे अनेक ट्विट्स, मुलाखती आणि पत्रकार परिषदांचे उल्लेख केले गेले आहेत. या सर्वांमध्ये आपल्या कुटुंबाबाबत खोटे, बदनामीकारक वक्तव्य केल्याचा आरोप यास्मीन यांनी यापूर्वीच केला होता. त्यावरून न्यायालयाने पोलिसांना कलम २०२ अंतर्गत चौकशी करण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्यानंतर आलेल्या अहवालात मलिक यांच्याविरुद्ध दखलपात्र गुन्हा नाही, असं नमूद करून पोलिसांनी त्यांना क्लीनचिट दिली होती. आता मात्र या अहवालालाच आव्हान देत यास्मीन वानखेडे कोर्टात उतरल्या आहेत. "पोलिसांनी मलिक यांच्या वर्तनाचं समर्थन करण्याचा प्रयत्न केला, पण कायद्याच्या चौकटीतून हा निर्णय चुकीचा आहे," असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे या वादाचा पुढील टप्पा न्यायालयातच रंगणार असून, या संघर्षाचा शेवट कुठे होतो याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

आज का अंदाज

मंगळवार ९ सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

3	4	5	7
157	466	177	269
229	248	456	458
300	347	348	368
32	42	51	71
30	40	56	76
38	48	59	79

मुंबई बाजार

2	4	7	8
147	699	179	134
390	266	250	260
480	400	340	350
25	45	70	80
23	43	79	89
21	41	76	86

९ सप्टेंबर २०२५ सर्व बाजारांसाठी

21	51	83	93
24	54	86	96
27	57	80	90

सर्व बाजारांसाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज
0 8 9 7 6

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल. १०० टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034

टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून वेईकल्सच्या किमतीमधील कपातीची घोषणा ; कमी करण्यात आलेल्या जीएसटी दराचे संपूर्ण फायदे देणार

अमरावती, ८ सप्टेंबर : ग्राहक-केंद्रित लाभ आणि प्रत्येक टचपॉइण्टवर उत्साहवर्धक अनुभव देण्याप्रती आपल्या अविरत कटिबद्धतेशी बांधील राहत टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने आज घोषणा केली की, कंपनी ग्राहकांना नुकतेच जाहीर करण्यात आलेल्या जीएसटी दरामधील कपातीचे संपूर्ण फायदे देणार आहे. सुधारित किमती सप्टेंबर पासून लागू होतील.

ही घोषणा करत सेल्स-सर्विस-युज्ड कार बिझनेस अँड प्रॉफिट एन्हान्समेंटचे उपाध्यक्ष वरिंदर वाधवा म्हणाले, ''आम्ही या महत्त्वपूर्ण सुधारणेसाठी भारत सरकारचे मनापासून आभार व्यक्त करतो. यामुळे ग्राहकांसाठी किफायतशीरपणामध्ये वाढ झाली असून ऑटो क्षेत्रात एकूणच आत्मविश्वास देखील वाढला आहे. सणासुदीच्या काळापूर्वी आम्हाला अपेक्षा आहे की हा पुढाकार उत्तम गतीसोबत मागणीला देखील आणखी चालना देईल. पारदर्शक व ग्राहक-केंद्रित कंपनी म्हणून आम्हाला ग्राहकांना हे फायदे देण्याचा आनंद होत आहे. आम्ही जागतिक दर्जाचे गतीशीलता सोल्यूशन्स अधिक सहजसाध्य करण्याप्रती कटिबद्ध आहोत आणि अशा सुधारणांचे स्वागत करतो, जे मागणीला गती देतील, सर्वांसाठी गतीशीलता उपलब्ध करून देतील आणि ग्राहकांना आनंदित करतील, तसेच भारताच्या शाश्वत व सर्वसमावेशक विकासाप्रती योगदान देखील देतील.''

राशीभविष्य

मेष : आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. आज तुम्ही तुमच्या व्यवसायात काही बदल करू शकता, ज्यासाठी तुम्हाला लवकरच सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

वृषभ : आज सामाजिक आणि कौटुंबिक जीवनात संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. तुम्ही तुमच्या बोलण्याने लोकांवर छाप पाडू शकता. प्रवासाचे योग आहेत, जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरतात.

मिथुन : तुम्ही तुमच्या सहकाजयांशी मैत्रीपूर्ण वागलात तर येणाजया काळात त्यांचा तुम्हाला फायदा होईल. जर तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवले तर हळूहळू तुमची आर्थिक बाजू मजबूत होईल.

कर्क : आज तुम्ही बालपणीच्या मित्राला भेटाल, तुमच्या जुन्या आठवणी ताज्या होतील. आज, व्यवसायात नफा मिळवण्यासोबतच, तुम्ही तुमच्या खर्चाकडेही लक्ष दिले पाहिजे.

सिंह : आजचा दिवस ऊर्जा आणि उत्साहाने भरलेला असेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नेतृत्व करण्याची संधी मिळेल. तुमच्या कल्पनांना योग्य दिशा मिळेल. जुना मित्र अचानक भेटेल. ज्यामुळे आनंद होईल.

कन्या : आज आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. कामाच्या ताणामुळे थोडा थकवा जाणवू शकतो. आर्थिक व्यवहार करताना काळजी घ्या. कोणताही मोठा निर्णय घाईत घेऊ नका.

तूळ : आज तुम्ही व्यावसायिक संबंध मजबूत करण्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय घ्याल जेणेकरून तुमचा व्यवसाय चांगला चालेल. गुंतवणुकीच्या बाबतीत आर्थिक सल्लागाराची मदत घेऊ शकता.

वृश्चिक : कुटुंबासोबत आनंदी क्षण घालवाल. आर्थिकदृष्ट्या दिवस चांगला आहे, तुम्हाला अपेक्षित लाभ मिळू शकतो. अभ्यासात यश मिळेल. कुटुंबासोबत वेळ घालवल्यास शांतता मिळेल.

धनु : आज तुम्हाला तुमच्या व्यवसायात दुप्पट नफा होईल आणि कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. आज तुम्हाला वडीलधाजयांचे आशीर्वाद मिळतील ज्यामुळे तुमचे काम प्रगती करेल.

मकर : आज ऑफिसमध्ये, बॉस तुमच्या कामाची प्रशंसा करतील आणि कनिष्ठ विद्यार्थीही तुमच्याकडून काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करतील. आज कोणताही निर्णय घेण्यापूर्वी घरातील वडीलधाजयांचा सल्ला घ्या.

कुंभ : आज कामात यशस्वी व्हाल. तुमचे प्रयत्न तुम्हाला यश मिळवून देतील. आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस चांगला आहे. तुमच्या जोडीदारासोबतचे संबंध अधिक दृढ होतील. विद्यार्थ्यांसाठी दिवस शुभ आहे.

मीन : तुमच्या योजनांना योग्य दिशा मिळेल, ज्यामुळे त्या त्यांच्या ध्येयाकडे पुढे जातील. आज तुम्हाला काही नवीन लोक भेटतील जे तुमच्या कामात मदत करतील. आज वडीलधाजयांचा भरपूर पाठिंबा मिळेल.

शब्दकोडे क्रमांक २२१२



आडवे शब्द :-
१) जमिनीपासून मिळणारे सरकारचे उत्पन्न
६) संदेश
८) जिंकणारा
१०) संगीतातील एक राग
११) धक्का
१२) प्रजा
१३) मृत्यू
१५) नूतन
१७) धैर्य, हिंमत
१८) ठराविक पैसे
१९) दृढता, सोशिकपणा
२१) रसाळ
२३) पोते शिवण्याची सुई
२५) राबता, जाणेयेणे
२७) पराजय
२८) संगीतातील एक राग
२९) ओढा पण मनाचा
३०) बारदान
३१) मुसलमानांचा उपवासाचा महिना
३२) शपथ
३३) ढग
३६) कुराणातील वचने
३८) चामखीळ
४०) प्रसिद्धी, गप्पांचे आगर
४४) एक तारवाद्य
४६) कर्ज
४७) ताठा, गुर्मी, जोर
४८) ओझी वाहणारा
४९) सुसर
५०) कमीतकमी व जास्तीतजास्त
५३) आश्रय
५६) मोहरी
५७) पाणी वाहण्याची कातडी पिशवी
५८) बडबड
६०) बोटाच्या टोकावरील आवरण
६२) मणका
६३) दूध वा दुधाचे पदार्थ
६४) मडके
६५) पुरुष
६६) फुरसत
६७) लोटी
६८) विशेष
६९) नृत्य
७०) अंगारा, रक्षा
७१) पादत्राण
७२) टेहाळणी करणारा
७४) पृथ्वी
७६) दुर्गंधी येऊ लागलेला
७७) पागोट्याव बांधण्याचे रत्नजडित तुरा
७८) अहंकार

उभे शब्द :-
१) जलाशय, समुद्र
२) नेत्र
३) माझे
४) हत्या, खून
५) बारीक सारीक
६) आधार नसलेला
७) घराचा मागचा दरवाजा
८) वापर
९) आग्रा येथील ऐतिहासिक वास्तू
१४) पावसाचे साठवून ठेवलेले पाणी
१६) पराक्रमी
२२) दरवाजा
२४) महाराष्ट्राची देवता
२६) घोड्याची गाडी,
२८) मारणारा
२९) पाऊल
३०) गाईचे घर
३४) चंद्र,
३५) स्नानगृह
३७) हावरटपणा
३९) किरकोळ सामान
४०) कडक
४१) पत्र
४२) मवाळ धोरण
४३) आकाश
४५) खरकट्याचा ढीग
४८) नक्की, खात्रीने
५१) फक्त, केवळ
५२) संगीतातील एक घराणे
५४) हावरट,
५५) अवधान, लक्ष
५७) अनुमती
५९) जंगलात राहणारे प्राणी
६१) अफूचे बीज
६२) किंचित कडू चव
६३) मधुर
६४) गावातील जुनी वस्ती
६७) मोजणी करणारा
६८) मीठाची चव
७०) पोपट
७३) दुनिया
७५) मलई

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



महत्त्वाचे

युवकांचे आदर्श व्यक्तिमत्व केरूदादा चौधरी : आ. खोसकर

इगतपुरी । खंबाळे येथील युवकांचे आवडते व्यक्तिमत्व केरूदादा (गणेश) चौधरी यांनी वाढदिवसानिमित्त अनाथ आश्रमातील शेतकरी आत्महत्याग्रस्तांच्या मुलांना आर्थिक मदत करून सामाजिक आदर्श निर्माण केला आहे. याप्रसंगी आ. खोसकर यांनी समाजातील प्रत्येकाने गरजू व निराधारांसाठी हातभार लावला पाहिजे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. व्यासपीठावर माजी सभापती ज्ञानेश्वर लहाने, माजी जिप सदस्य गोरख बोडके, शिवसेना नेते निवृती जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आ. खोसकर यांनी चौधरींच्या कार्याचे कौतुक करताना त्यांना युवकांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्व संबोधले. विशेष म्हणजे वाढदिवसाचा खर्च संपूर्णपणे मित्रपरिवाराने उचलला.

जि.प. शाळा बारागाव पिंप्रीचा नाविन्यपूर्ण उपक्रम

बारागाव पिंप्री । जि.प. शाळा बारागाव पिंप्री येथे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवण्यासाठी एक नावीन्यपूर्ण आणि युनिक उपक्रम राबविण्यात आला आहे. मुख्याध्यापक नवनाथ हांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली व गोरक्ष सोनवणे यांच्या

संकल्पनेतून "विद्यार्थी निर्मित स्व-हजेरी बोर्ड" तयार करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची शाळेत येण्याची आवड वाढली असून, उपस्थितीत लक्षणीय वाढ झाली आहे. राजेंद्र पाटील, गोरक्ष काकड, रोहिणी पगार, मनीषा शेळके, अनिता बडदे यांनी उपक्रम यशस्वीपणे राबवला. घरातील रिकाम्या काडेपेट्यांचा उपयोग करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे फोटो त्या पेट्यांवर चिकटवण्यात आले. त्यावर वरच्या बाजूस P (हजर) व A (गैरहजर) अशी खूण करण्यात आली. विद्यार्थी रोज शाळेत आल्यानंतर फक्त बोटाच्या साहाय्याने आपली काडेपेटी सरकवून स्वतःची हजेरी नोंदवतात. या सर्जनशील पद्धतीमुळे विद्यार्थी अधिक जबाबदार बनले असून, हजेरीबाबत जागरूकता निर्माण झाली आहे.

ओझर येथे शरद जोशी जयंतीनिमित्त शेतकरी मेळावा

नाशिक । स्वर्गीय शेतकरी नेते शरद जोशी यांच्या जयंतीनिमित्त ओझर येथील बाजार समिती सभागृहात ३ सप्टेंबर रोजी नाशिक जिल्ह्यातील शेतकरी कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना माजी संपादक सकाळ उत्तम कांबळे यांनी शरद जोशी यांच्या आंदोलनातील अनुभव आणि योगदान अधोरेखित केले. फुले-आंबेडकरांच्या विचारसरणीवर आधारलेली जोशींची शेतकरी चळवळ ही देशातील

सर्वात व्यापक आणि अर्थवाही ठरली असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांचे प्रश्न केवळ जयंती-पुण्यतिथी साजरी करून सुटणार नसून, नव्या पिढीने संघर्षाच्या आंदोलनांत सक्रिय सहभाग घ्यावा, असेही त्यांनी प्रतिपादन केले. कांबळे यांनी प्रकल्पांसाठी जमिनी जाणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ मोबदला न देता, त्या प्रकल्पांच्या कंपन्यांत भागधारक करण्याची मागणी पुढे आणली पाहिजे, असे ठाम मत व्यक्त केले. तसेच फुले, शाहू, आंबेडकर आणि शिवाजी महाराज यांची संयुक्त जयंती करून जातीवादी विचारसरणीला आळा घालण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. शेतकरी संघटनेचे ट्रस्टी डॉ. शाम अष्टेकर यांनी १९७८ मधील कांद्याच्या प्रश्नापासून आजपर्यंतचे शेतकऱ्यांचे हाल अपरिवर्तित असल्याचे दुःख व्यक्त केले. सरकारे प्रामुख्याने ग्राहकांच्या मतदारसंख्येवर लक्ष केंद्रीत करतात, त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांना भाव मिळत नाही, अशी टीका त्यांनी केली. सध्या महाराष्ट्रात कांदा, कापूस, सोयाबीन पिकांना फटका बसत असून डाळी, तेलबिया, पामतेलाच्या आयातीमुळे शेतकरी हवालदिल होत आहेत, असे ते म्हणाले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी अर्जुन तात्या बोराडे होते. यावेळी देविदास पवार, संतू पाटील झांबरे, श्रीमती स्मिता गुरव, निर्मला जगझाप, रामनाथ ढिकले यांच्यासह शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सखाराम बाविस्कर यांचे निधन

नाशिक । गंगापूर रोडवरील नवशा

गणपतीजवळ वास्तव्यास असलेले शिंपी समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक सखाराम सदाशिव बाविसकर (९७) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नाशिकच्या अमरधाममध्ये(द्वारका) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. चांदशी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विजय बिरारी यांचे ते सासरे होत.

चांदवडला आवादा कंपनीचा मुजोरपणा; वन विभागाची परवानगी न घेता वृक्षतोड

महावितरण, सार्वजनिक बांधकाम, वनविभाग अनभिज्ञ, पर्यावरणाला हरताळ

(विजय काळे यांजकडून)

रेडगांव खुर्द । चांदवड-लासलगाव (विंचूर प्रकाशा महामार्ग) लगत वन विभागाची कोणतीही परवानगी न घेता आवादा कंपनीने सोलर वीज वाहिनीच्या कामाच्या नावाखाली बेकायदेशीर वृक्षतोड सुरू केली आहे. महामार्गलगत वृक्षतोड होत असताना महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, वनविभाग या सर्वांनी वृक्षतोडीबाबत आपण अनभिज्ञ असल्याचे सांगितल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. तसेच सर्वांनी एकमेकांकडे बोट दाखविल्याने ही मिलीजुली तर नाही ना? अशीही शंका येण्यास वाव मिळत आहे.

चांदवड तालुक्यातील गणूर या गावी आवादा कंपनीने सोलर प्लांट टाकला आहे. येथे सोलर वीजनिर्मिती करून ती चांदवड येथे महावितरणला विक्री होणार आहे. यासाठी आवादा कंपनीने निमगव्हाण ते चांदवड महामार्ग लगतच्या पूर्व बाजूने विद्युत लोखंडी पोल महामार्गाच्या नालीत उभे केले आहे. मात्र या सर्व नालीत मोठमोठे महाकाय वृक्ष डौलाने उभे आहे. मागील आठवड्यापासून या ठिकाणी विद्युत तारा ओढण्याचे काम सुरू असून या सर्व तारांखालील वृक्षांची बेकायदेशीर कत्तल सुरू आहे. फक्त वृक्षांचे सांगाडे शिल्लक ठेवले जात आहे. वृक्ष मुळासकट जरी तोडले जात नसले तरी भविष्यात विद्युत प्रवाहात बाधा येऊ नये यासाठी वारंवार या झाडांच्या फांद्या तोडाव्या लागणार आहे. त्यामुळे ही झाडे उभी राहून सुद्धा मृतच ठरणार आहे. त्यामुळे या परिसरातील पशुपक्षी प्राणी यांचे जीवन धोक्यात आले आहे. पर्यावरणाचीही मोठी हानी होणार असल्याने हा महामार्ग आता उघडाबोडका होणार आहे. ग्लोबल वार्मिंगचा समतोल बिघडत असल्याने जगभरात अनेक नैसर्गिक संकटे उभी राहत असताना चांदवडला महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, वनविभाग यांना कोणतेच सोयरी सुतक दिसत नाही. माहिती विचारल्यावर एकमेकांकडे बोट दाखवून उडवा उडवीचे उत्तरे देऊन वेळ मारून नेली जात आहे. मात्र जबाबदारी घ्यायला कोणीच तयार नाही हे विशेष. चांदवड तालुका हा आधीच अवर्षण प्रवण क्षेत्रात येत असल्याने सतत दुष्काळ, येथील तापमान उन्हाळ्यात ४५ अंशापर्यंत पोहोचते. मात्र विकासाच्या नावाखाली येथे महाकाय वृक्ष तोडली जाणार असल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होण्यास कोण जबाबदार? बाहेरील खाजगी कंपनीने सर्वच करायचे आहे, मग या कंपनीवर कुठल्याच विभागाचे नियंत्रण नाही का? तसेच ही कंपनी कुठल्या अटी शर्तींना अधीन राहून काम करणार आहे, याची माहिती अधिकाऱ्यांना नसल्याने या अधिकाऱ्यांच्या उत्तरात बरेच काही दडले असावे. अशी शंका येण्यास वाव मिळतो.

> चांदवड लासलगाव महामार्गालगच्या वृक्षतोडी संदर्भात वन विभागाकडे कोणत्याही संबंधित विभागाने किंवा कंपनी प्रतिनिधीने आजपर्यंत परवानगी मागितलेली नाही. जर आमच्याकडे एखाद्या विभागाने तक्रार केली तर त्या संदर्भात आम्ही कारवाई करू.
>
> **– विशाल कुटे, वनपरीक्षेत्र अधिकारी चांदवड**

> वृक्ष तोडण्यास आम्ही परवानगी देत नाही. आमच्या हद्दीत वृक्षतोड होत असेल तर आम्ही ती तात्काळ थांबवू. वृक्षतोडी संदर्भात संबंधित विभागांनी वन विभागाची परवानगी घ्यावी.
>
> **– दत्तात्रय शिरोडे, सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग चांदवड**

> वृक्षतोडीची परवानगी आवादा कंपनीनेच घ्यायची आहे. परवानगीशिवाय वृक्षतोड होत असेल तर ते चुकीचे आहे.
>
> **– तुषार सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता महावितरण, चांदवड**

> परवानगी घेतली असेल? कंपनीच्या वृक्षतोडीच्या संदर्भातील अटी शर्ती समोर नाही. विचारुन सांगतो.
>
> **– केशव काळूमाळी, कार्यकारी अभियंता, महावितरण चांदवड विभाग**

पावसाच्या सरी अंगावर झेलत गणरायाला भक्तीपूर्ण निरोप

नैवेद्या बिदरी यांजकडून

मनमाड । वाजत-गाजत,मोठ्या जल्लोश व भावपूर्ण वातावरणात मनमाडकरांनी लाडक्या गणरायाला निरोप दिला. नृत्य, फटाक्यांची आतषबाजी ढोलताशांचा गजर, लेझीम, मर्दानी खेळ व विविध लोककलांचा अविष्कार अशा थाटात पावसाच्या सरी अंगावर घेत मनमाडकरांनी दिवसभर व रात्री उशिरापर्यंत विविध मिरवणुकांतून आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देऊन पुढच्या वर्षी लवकर येण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले.

अभूतपूर्व उत्साही वातावरणात फटाक्यांच्या आतषबाजीत मनमाडकरनी श्रींना निरोप दतमंदिर रोजवळील नगर परिषदेच्या गणेशकुंडाजवळ घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळाच्या मूर्तीचे विसर्जन करण्यातआले. मनमाडचे आराध्य दैवत वेशातील श्री निलमणी सार्वजनिक गणेश मंदिर ट्रस्टच्या श्री गणेशाच्या पार्थिव ममूर्तींच्या पालखी मिरवणूक काढण्यात आली. डीजे व गुलालाला फाटा देत पुणेरी पद्धतीने पालखी मिरवणूक शहराचे खास आकर्षण आहे. बँड, ढोल - ताश्यांच्या गजर, पारंपरिक संबळ,मराठमोळं वाघ्या मुरळीचा गोंधळ अशा थाटात निघालेल्या मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. तसेच मनमाड- येवला रोड नजीक असलेल्या आयोध्या नगर येथील ज्ञानेश्वर युवक मित्र मंडळाच्या सदस्यांनी लेझीम पथकासह मर्दानी खेळांने मनमाडकरांचे लक्ष वेधले. शहरातील सर्वात जुन्या आणि मानाच्या आझाद मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीला सायंकाळी एकात्मता चौकातून प्रारंभ झाला. अनेक मिरवणुकात वाद्यांच्या तालावर महिलांनीही ठेका धरला. गणेशकुंडावर सकाळपासून विसर्जनासाठी उसळलेल्या गर्दीचे नियोजन वाहतूक पोलिसांनी केले. नगर परिषदेतर्फे हॅलोजन दिवे , निर्माल्य संकलन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदी सोयी करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक विजय करे आणि मुख्याधिकारी तथा प्रशासक शेषराव चौधरी यांच्या मार्गदर्शनखाली कर्मचारी या ठिकाणी लक्ष लेऊन होते. उपविभागीय पोलीस अधीक्षक बाजीराव महाजन, पोलीस निरीक्षक विजय करे, मुख्यधिकारी शेषराव चौधरी, माजी नगरध्यक्ष राजाभाऊ पगारे आदींसह मान्यवर लक्ष ठेवून होते. पोलीस प्रशासन आणि नगरपरिषदेच्या आव्हानाला शहरातील ८ मंडळांनी प्रतिसाद दिला. श्री गणरायाच्या मोठ्या मुर्त्या विसर्जन न करता मूर्ती दान केले.

यंदा शहरातील १०५ सार्वजनिक गणेश मंडळासह ७५० हून अधिक घरगुती गणेश मूर्तींचे विसर्जन गणेश कुंडासह उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावात करण्यात आले. दरम्यान मनमाड नगर परिषदेतर्फे कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली होती. तसेच शहरातील दोन ठिकाणी विहिरी देखील विसर्जनासाठी ताब्यात घेण्यात आल्या होत्या.

विंचूरमधील बजरंग मंडळाची भक्तीमय, शिस्तबद्ध वातावरणातील विसर्जन मिरवणूक

विंचूर । येथील जय बजरंग मंडळ आयोजित गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात, पारंपरिक व सांस्कृतिक वातावरणात संपन्न झाली. मंडळाने आयोजित केलेली ही मिरवणूक पाहण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो महिला-पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून वातावरण मंत्रमुग्ध केले. या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे माऊली दिंडी पथक सोहळा. तब्बल २०० हून अधिक विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत व टाळ-चिपळ्यांच्या गजरात सहभागी झाले होते. संत परंपरेची ओळख करून देणारा हा सोहळा उपस्थितांना खऱ्या अर्थाने अध्यात्मिक अनुभूती देणारा ठरला. त्याशिवाय संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या भिंती चालविण्याचा व रेड्यामुखी वेद बोलविण्याचा

देखावा विशेष लक्षवेधी ठरला. हा प्रात्यक्षिक सोहळा पाहून लोकांनी मोठ्या प्रमाणात दाद दिली. याशिवाय "श्री स्वामी समर्थ" महाराजांच्या लीलांचे सादरीकरण "आपले देवा महाराज परदेशी" आणि त्यांना साथ दिली "चोळप्पाच्या" भूमिकेत "आनंदा नागमोते" यांनी. त्यांच्या भावपूर्ण व उत्कट सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये श्रद्धेची भावना निर्माण झाली.विविध सांस्कृतिक व धार्मिक देखावे, टाळ-मृदंग, लेझीम, हलगी यांच्या गजरात ही मिरवणूक भव्यतेने पार पडली. मिरवणुकीत लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील लोकांनी आनंदाने सहभाग नोंदवला. दरम्यान, माऊली दिंडी सोहळ्याचे स्वागत करण्यासाठी मंडळाच्या वतीने आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार नागरिकांनी घराघरासमोर सडा-रांगोळ्या काढून स्वागत केले व मिरवणुकीला उत्साहाची भर घातली.जय बजरंग मंडळाने केलेल्या उत्तम व्यवस्थापनामुळे ही विसर्जन मिरवणूक शिस्तबद्ध, पारंपरिक व सांस्कृतिक रंगात साजरी झाली. या मिरवणुकीत सहभागी सर्व मंडळींनी "गणपती बाप्पा मोरया" च्या गजरात श्री गणेशाची विसर्जन यात्रा मोठ्या भक्तिभावात पार पाडली.

भाजप जिल्हा सरचिटणीसपदी लता राऊत यांची निवड

नाशिक । भाजप नाशिक जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव यांनी अखेर भाजपची कार्यकारिणी जाहीर केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ही कार्यकारिणी घोषित झाली.

त्यात त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हरसूलसारख्या आदिवासी भागातील लता राऊत यांची भाजप नाशिक जिल्हा सरचिटणीस पदी निवड झालेली आहे. त्यांनी भाजपची जिल्हा आदिवासी आघाडी उपाध्यक्ष दोन वेळा, आदिवासी आघाडी महाराष्ट्र प्रदेश सदस्य म्हणूनही काम केले आहे. राज्य परिषदेच्या सदस्य म्हणूनही दोन महिन्यांपूर्वी नियुक्ती झालेली आहे. लता राऊत यांची आदिवासी विकास भवन नाशिक च्या आढावा व नियोजन समितीच्या प्रशासकीय नियुक्ती सदस्यपदीही निवड झालेली होती. सर्व कार्यकर्त्यांना विश्वासाने सोबत घेऊन नाशिक विभागाचा सर्वांगीण विकासासाठी सर्वोतोपरीने प्रयत्न करणार असल्याचे यावेळी लता राऊत यांनी सांगितले.

राऊत यांचे भाजप त्र्यंबकेश्वर (मंडल) तालुकाअध्यक्ष सुयोग वाडेकर, भाजप हरसूल मंडल अध्यक्ष जयराम भुसारे, पुढारी वृत्तपत्राचे वार्ताहर मनोज वाजे, भाजप नेते कांतिलाल लोखंडे, अशोक भोये आदींनी अभिनंदन केले आहे.

महिला सक्षमीकरणासाठी ओझरला ११ सप्टेंबरपासून जपानुष्ठान सोहळा

निमित्त जगदमाऊली म्हाळसा माता व फुला माता पुण्यस्मरणार्थ

ओझर । जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या मातोश्री म्हाळसा माता तसेच उत्तराधिकारी जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या मातोश्री फुलामाता यांच्या पुण्यतिथी निमित्त महिला सक्षमीकरणासाठी ओझर येथे ११ ते १८ सप्टेंबर दरम्यान महिला जपानुष्ठान सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

ओझर येथील जगदगुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज आश्रमातील देवभूमी जनशांती धाम येथे शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत ११ ते १८ सप्टेंबर या कालावधीत मातोश्री म्हाळसा माता व मातोश्री फुलामाता यांच्या पुण्यतिथी निमित्त महिला सक्षमीकरणासाठी आठवडाभर भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. या सोहळ्यात खास महिला साधिकांसाठी जपानुष्ठान, अखंड नंदादीप, महायज्ञ, अभिषेक पूजन, हस्तलिखित नामजप, श्रमदान, रोज पहाटे ब्रह्ममुहूर्तावर नित्यनियम विधी, दिवसातून चार वेळा विधी-पाठांतर, भागवत वाचन, सत्संग, महाआरती आदी विविध आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांचा समावेश आहे.या सोहळ्या दरम्यान महिला सक्षमीकरणाचा संदेश देत, संपूर्ण आठवडाभर खास महिलांसाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.महिला मातांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

अन्याय व खोट्या गुन्ह्यांच्या घटनांचा वकील संघातर्फे निषेध

मनमाड । मनमाड वकील संघाच्या सदस्यांवर सातत्याने होणाऱ्या अन्याय व खोट्या गुन्ह्यांच्या घटनांमुळे आज वकील संघाची तातडीची बैठक पार पडली. ही बैठक संघाचे अध्यक्ष ॲड. किशोर सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

बैठकीत ॲड. यशश्री दंडगव्हाळ व ॲड. सुमित दंडगव्हाळ यांच्यावर घडलेल्या प्रकारामुळे संताप व्यक्त करण्यात आला. ॲड. यशश्री दंडगव्हाळ यांच्या राहत्या घरी त्यांच्या पक्षकार पूजा अक्षय पवार उर्फ पूजा सुधीर देवरे व तिच्या आईने त्रयस्थ व्यक्तीच्या चेतावणीवरून संध्याकाळच्या सुमारास घरात घुसून वाद निर्माण केला. शिवाय गळीच्छ शिवीगाळ व मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी मनमाड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच ॲड. नासिर पठाण हे पोलिस स्टेशनमध्ये नातेवाईकाच्या प्रकरणात समझोता करण्यासाठी गेले असता त्यांच्यावरही खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. या दोन्ही घटनांचा निषेध करण्यासाठी वकील संघाने एकमताने ठराव मंजूर केला.

कोणत्याही वकिलावर गुन्हा दाखल करण्यापूर्वी त्यांचा त्या प्रकरणाशी काहीही संबंध आहे की नाही, याची पूर्ण शहानिशा करूनच पुढील कारवाई करावी. संघाच्या निर्णयानुसार, वकील सदस्यांविरोधात खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या व्यक्तींच्या वतीने मनमाड वकील संघातील कोणताही सदस्य वकिली स्वीकारणार नाही. महाराष्ट्रात वकिलांसाठी 'ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट' तत्काळ लागू करण्यात यावा, अशी संघाची जोरदार मागणी आहे. जर अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडल्यास वकिलांना त्यांच्या न्यायहक्कासाठी रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल, असा स्पष्ट इशारा संघाने दिला आहे.

वकील संघाचे अध्यक्ष ॲड. किशोर सोनवणे, माजी अध्यक्ष ॲड. सुधाकर मोरे, सेक्रेटरी ॲड. शशिकांत व्यवहारे, उपाध्यक्ष ॲड. एस.पी. पाटील, ॲड. कासार, ॲड. दिलीप देसले, ॲड. किशोर चोरडिया यांच्यासह अनेक वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कॅलिडोस्कोप

प्राण्यांचं वॉर मेमोरियल

अनेक जवान आपल्या देशासाठी प्राणांचं बलिदान देतात. या शहीद जवानांचा प्रत्येकालाच अभिमान वाटतो. या जवानांच्या, त्यांच्या शौर्याच्या आठवणी वॉर मेमोरियलच्या रुपात जपून ठेवल्या जातात. या मेमोरियलमध्ये गेल्यावर आपल्या अंगावर रोमांच उभे राहतात. देशासाठी बरेच प्राणीही काम करत असतात. विशेषकरून श्वान देशसेवेचं कार्य करतात. बॉम्बशोधक पथकात या श्वानांची भर्ती केली जाते. त्यांची हुंगण्याची शक्यी जबरदस्त असते. १९९३ मध्ये जंजीर नावाच्या श्वानाने पोलिसांची बरीच मदत केली होती. या जंजीरमुळे बरीच स्फोटकं जप्त करण्यात आली. असे असंख्य श्वान आपलं काम इमानेइतबारे करत असतात. त्यांनाही आपला जीव गमवावा लागतो. तर अशा या श्वानांसाठीही खास वॉर मेमोरियल तयार केलं जात आहे. उत्तर प्रदेशमधल्या मेरठमध्ये हे वॉर मेमोरियल तयार करण्यात येत आहे. इथे ३०० श्वान, त्यांचे प्रशिक्षक, घोडे आणि खेचरांची नावं लिहिली जाणार आहेत. यानिमित्ताने त्यांच्या आठवणींना उजाळा मिळणार आहे. काही श्वानांनी काश्मीर तसंच इतर ठिकाणी दशहतवाद्यांना पकडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. कारगिल युद्धातही श्वानांनी आपले प्राण गमावले. या सर्व श्वानांची नाव इथे वाचता येणार आहेत. प्राण्यांच्या स्मृती जपणारं हे देशातलं पहिलंच वॉर मेमोरियल आहे.

शेतकऱ्याचा मुलगा अंबानींचा शेजारी !

मुंबईत असे अनेक उच्चभ्रू परिसर आहेत, जिथे शहरातील बड्या उद्योजकांपासून अगदी सेलिब्रिटी मंडळींपर्यंतचे बरेचजण वास्तव्यास असतात. अशीच एक व्यक्ती देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती अर्थात मुकेश अंबानी यांची शेजारी आहे. अंबानी यांच्या शेजारी असणाऱ्या या व्यक्तीचे टाटा उद्योगसमूहाशी एक खास नाते आहे. स्वर्गीय रतन टाटा यांच्या विश्वासूंपैकी एक असणाऱ्या एन. चंद्रशेखर यांच्यावर या समूहाची मोठी धुरा असून तेच अंबानी यांचे शेजारी आहेत.

चंद्रशेखर यांची कहाणी एखाद्या चित्रपटाच्या कथानकापेक्षा कमी नाही. तामिळनाडूतील एक लहानसं खेडं असणाऱ्या मोहनूरमध्ये एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. रतन टाटा यांच्या इतक्या जवळच्या व्यक्तीमध्ये आपल्या कुटुंबातील लेकाचा सहाभाग असेल याची त्यांच्या कुटुंबीयांना पुसटशी कल्पनाही नव्हती. कोईमतूरच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' इथून त्यांनी 'अप्लाईड सायन्स'मधून शिक्षण घेतले. 'एनआयटी' मधून त्यांनी 'एमसीए'चे शिक्षण पूर्ण केले. १९८७ पासून ते टाटा समूहात कार्यरत झाले. इंटर्न म्हणून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास आता संचालक आणि नंतर चेअरमनपदापर्यंत आला आहे. २००९ मध्ये

त्यांना 'टीसीएस'च्या 'सीईओ'पदी नियुक्त करण्यात आले. २०१७ पासून ते या समूहाचे चेअरमन आहेत.

एन. चंद्रशेखर मुंबईत वास्तव्यास असून त्यांचे घर मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया या निवासस्थानाशेजारीच आहे. २०२२ मध्ये त्यांनी मुंबईतील साऊथ टॉवर या इमारतीमध्ये एक आलिशान ड्युप्लेक्स घर खरेदी केलं. त्याची कमत आहे ९८ कोटी रुपये आहे. दक्षिण मुंबईमध्ये असणाऱ्या चंद्रशेखर यांच्या या निवासस्थानी अनेक सोयीसुविधा असून, सुरुवातीला त्यांनी हे घर पाच वर्षाच्या भाडेतत्त्वावर घेतलं होतं. त्यानंतर एक मोठी रक्कम मोजत त्यांनी हेच घर खरेदी केलं. दक्षिण मुंबईत बहुतांश बड्या उद्योजकांची निवासस्थानं आहेत. त्याच उच्चभ्रू भागात चंद्रशेखर यांचं निवासस्थान असून त्यांच्या घरामध्ये प्रायवेट लिफ्ट, उच्चस्तरिय सुरक्षाव्यवस्था, सी व्यू, क्लब हाऊस, वेलनेस सेंटर आणि लक्झरी कार पार्किंग अशा एक ना अनेक सुविधा आहेत.

चंद्रशेखर यांचा पगार?

टाटा उद्योग समूहात चेअरमनपदी असणाऱ्या एन चंद्रशेखर यांचा पगार दरवर्षी वाढत असतो. २०२१-२२ मध्ये त्यांचा पगार १०९ कोटी इतका होता. २०२३-२४ मध्ये तो १३५.३ कोटी रुपये झाला. या आर्थिक वर्षात त्यांचा पगार १५५ कोटी ८१ लाख रुपये इतका असल्याचं सांगण्यात येतं. भारतात सर्वाधिक पगार मिळणाऱ्या कॉर्पोरेट एक्झिक्युटीव्हमध्ये चंद्रशेखर यांच्या नावाचा समावेश होतो. त्यांच्या एकूण संपत्तीचा आकडासुद्धा मोठा असून हा आकडा ८५५ कोटी रुपयांच्या घरात असल्याचं म्हटलं जातं.

आपोआप चालतात वाहनं!

जगात अनेक रहस्यमयी ठिकाणे आहेत. भारतातदेखील असेत एक रहस्यमयी ठिकाण आहे. हे ठिकाण चमत्कारापेक्षा कमी नाही. जगभरातून हे ठिकाण पाहण्यासाठी लोक येथे येतात. येथे सुरु न करता आपोआप वाहने चालतात. या ठिकाणी विज्ञानही थबकते.

भारतातील हे रहस्यमयी ठिकाण सर्वात लोकप्रिय 'टुरिस्ट डेस्टिनेशन' आहे. या ठिकाणाचे नाव आहे लडाख. भारताच्या उत्तरेला असलेल्या लडाखमध्ये मॅग्नेटिक हिल नावाचे हे ठिकाण आहे. हे ठिकाण जगातील सर्वात विचित्र ठिकाणांपैकी एक आहे. एखादे वाहन न्यूट्रल गियरमध्ये असते, तेव्हा उतारावर खाली जाऊ लागते; परंतु या ठिकाणी असे होत नाही. येथे वाहने वरच्या दिशेने जाऊ लागतात, याला मिस्ट्री हिल कवा ग्रॅव्हिटी हिल असेही म्हणतात.

टेकडीमध्ये असलेल्या चुंबकीय गुरुत्वाकर्षणामुळे येथे वाहने आपोआप चालतात. या टेकडीवर एक विशेष चुंबकीय शक्ती आढळते. त्यामुळे वाहने वरच्या दिशेने खेचली जातात. यामुळेच जगभरातील शास्त्रज्ञ येथे संशोधन करण्यासाठी येतात. लडाखच्या स्थानिक लोकांच्या म हणण्यानुसार येथे एके काळी एक रस्ता होता जो थेट स्वर्गात जात असे. यामुळेच याला स्वर्गात जाणारा रस्ता असेही म्हणतात. या अद्भूत ठिकाणी भेट द्यायची असेल, तर लेह-कारगिल महामार्गावरून जाता येते. हे ठिकाण लेह शहरापासून सुमारे तीस किलोमीटर अंतरावर आहे. सधू नदीदेखील मॅग्नेटिक हिलजवळून वाहते. या परिसरात फिरताना अप्रतिम निसर्ग सौंदर्य पहायला मि ळते. येथे पिवळ्या रंगाच्या बोर्डवर लिहिलेले असते, की वाहन न्यूट्रलमध्ये ठेवा. वाहन न्यूट्रलमध्ये ठेवताच इंजिन सुरू न करता हळूहळू वरच्या दिशेने जाऊ लागतात.

फक्त देशाच्या मातीसाठी

प्रत्येकालाच आपल्या देशाचा अभिमान असतो. आपल्या देशातली माती, या मातीचा सुगंध हवाहवासा वाटतो. देशापासून लांब राहिलो तरी या मातीची एक ओढ लागलेली असते. आपण कधी एकदा आपल्या देशात जातोय, असं होऊन जातं. सैनिकांना तर आपल्या घराची, देशाची ओढ लागलेली असते. आपल्या मुलांना या मातीचं महत्त्व कळावं, असा त्यांचा प्रयत्न असतो. अमेरिकन सैनिकही याला अपवाद नाहीत. टोनी ट्रेकोनी या अमेरिकन सैनिकाला आपल्या बाळाचा जन्म आपल्या देशात व्हावा असं वाटत होतं. पण पत्नी गरोदर राहिली आणि त्याची बदली इटलीमधल्या पेडोवा इथे झाली. तो आपल्यासोबत पत्नीलाही घेऊन गेला. मधल्या काळात

आपली बदली अमेरिकेत होईल, असं त्याला वाटत होतं. पण नऊ महिने पूर्ण होत आले तरी कुठलीही हालचाल दिसेना. मग ट्रेकोनीने एक युक्ती लढवली. त्याने अमेरिकेतून इटलीला माती मागवली. टोनीने बाळाच्या जन्मावेळी ही माती पलंगाखाली लपवून ठेवली. त्याने टेक्सासला राहणाऱ्या आपल्या पालकांना माती पाठवायला सांगितली. त्यांनीही डब्यात भरून माती पाठवली. ही माती बोटीतून टोनीकडे पोहोचली. यासाठी २०० डॉलर्स इतका खर्च आला. आपल्या बाळाचा जन्म टेक्सासच्या मातीत व्हावा, ही इच्छा पूर्ण करण्यासाठी टोनीने अनोखी कल्पना लढवली. आपण देशात नसलो म्हणून काय झालं, देशाची माती तर इथे नक्कीच येऊ शकते, असा विचार त्याने केला. टोनीला मुलगा झाला. मुलगा थोडा मोठा झाल्यावर टोनीने त्याचे पाय या मातीत उमटवले. ही माती मिळवण्यासाठी आपण कोणतंही दिव्य केलं असतं, असं टोनी सांगतो.

सगळ्यात छोटं सोन्याचं नाणं

स्वीत्झरलँड या देशाने जगातलं सर्वात लहान आकाराचं सोन्याचं नाणं तयार केलं आहे. या नाण्याचा व्यास २.९६ मिलीमीटर आणि वजन ०.०६३ ग्रॅम इतकं आहे. या नाण्याचा आकार खूपच लहान आहे. त्यामुळे ते भगातूनच बघावं लागतं. या नाण्यावर जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईनची छबी आहे. १९५१ मध्ये आपला ७२ वा वाढदिवस साजऱ्या करणाऱ्या आईनस्टाईनचा जीभ बाहेर काढलेला एक फोटोट आहे. हा फोटो या नाण्यावर कोरण्यात आला आहे. स्वीत्झरलँडच्या राष्ट्रीय टाकसाळीत हे नाणं तयार करण्यात आलं आहे. हे नाणं ऑनलाईन मागवता येतं. हे नाणं खरेदी करण्यासाठी तब्बल १९९ फ्रँक खरेदी करावे लागतात. मात्र अशाप्रकारची फक्त ९९९ नाणीच तयार करण्यात आली आहेत. ग्राहकांना या नाण्यासोबत भगही दिलं जाईल. या भगातून हे नाणं नीट न्याहाळता येईल. यानिमित्ताने एक विश्वविक्रमच करण्यात आला आहे. आईनस्टाईनचा जन्म तत्कालीन दक्षिण जर्मनीमधल्या उल्म या शहरात झाला होता. पण त्यांनी आपल्या आयुष्यातला काही काळ स्वीत्झरलँडमध्येही घालवला होता. या देशाचं नागरिकत्वही स्वीकारलं होते. याच कारणामुळे स्वीझ सरकारने त्यांचा गौरव केला आहे.

नंबर प्लेटसाठी ४७ लाख रुपये!

भारतात आलिशान गाड्यांसह 'व्हीआयपी' नंबर प्लेटची ही क्रेज असलेला एक वर्ग आहे. देशातील सेलिब्रिटींसह अनेक बिझनेसमन आणि काही सामान्य व्यक्तीदेखील कार खरेदी केल्यावर त्याच्यासाठी 'व्हीआयपी' नंबर घेतात. महेंद्र सह धोनी, शाहरुख खान आणि मुकेश अंबानी सारख्या लोकप्रिय व्यक्तीच्या गाड्यांवर खास 'व्हीआयपी' नंबर प्लेट आहेत. लिटमस ७ कंपनीचे 'सीईओ' वेणु गोपालकृष्णन यांनी नुकताच आपल्या कार कलेक्शनमध्ये एका लक्झरी एसयूव्हीचा समावेश केला

आहे. त्यांनी जवळपास चार कोटी वीस लाख रुपये कमतीची मर्सिडीज बेंज जी ६३ एएमजी ही कार खरेदी केली आहे. ही कार जेवढी खास आहे, त्यापेक्षा जास्त खास असलेल्या त्याच्या नंबर प्लेटची चर्चा होत आहे. त्याच्या गाडीचा रजिस्ट्रेशन नंबर केएल ०७ डीजी ०००७ असा आहे. या खास नंबरसाठी वेणु यांनी ४७ लाख रुपये खर्च केले आहेत. त्यामुळे वेणु गोपालकृष्णन यांनी खरेदी केलेली ही नंबर प्लेट देशातील सर्वात महागडी नंबर प्लेट ठरली आहे.

युट्युबरची कोट्यवधींची कमाई!

युट्यूबर आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर पूरव झा अनेकदा चर्चेत असतो. मजबूत फॅन फॉलोइंग असलेला हा इन्फ्लुएंसर दरमहा करोडो रुपये कमवतो. आज लोक त्याच्या कंटेंटमुळे त्याला खूप पसंत करत आहेत.

पूरव झा यांचा जन्म ११ ऑगस्ट २००२ रोजी बिहारमधील मधुबनी येथे झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षी तो त्याच्या पालकांसह दिल्लीला आला. त्याने दिल्लीतूनच त्याचे शालेय शिक्षण पूर्ण केले. २०२० मध्ये त्याने पदवी मिळवली. त्यानंतर, त्याने कॉम `डी व्हिडीओद्वारे लोकांचे मनोरंजन करून लोकांच्या हृदयात स्थान निर्माण केले. आज २३ वर्षीय पूरव हा युट्यूबर आणि 'सोशल मीडिया' इन्फ्लुएंसर संबंधित सदस्यांची संख्या एक लाखांहून अधिक आहे. सबस्क्रायबरची संख्या लक्षात घेतल्यास त्याचे मासिक उत्पन्न २.६ कोटींहून अधिक आहे.

काही काळापूर्वी तो करण जोहरच्या 'शो द ट्रेटर्स'मध्ये दिसला

म्हणून लोकांमध्ये लोकप्रिय बनला आहे. त्याची प्रतिभा पाहून चाहत्यांनी त्याला 'सोशल मीडिया'वर 'ह्युमन एआय' हे नाव दिले आहे.

पूरव 'सोशल मीडिया'वर ट्रेंड होणाऱ्या लोकांच्या व्यक्तिमत्त्वाची खूप चांगली कॉपी करतो. त्यामुळे लोकांनी त्याला 'ह्युमन एआय'चा टॅग दिला आहे. पूरवचे इंस्टाग्राम आणि युट्यूबवर प्रचंड फॅन फॉलोइंग आहे. त्याला इंस्टाग्रामवर ७० लाख लोक फॉलो करतात आणि त्याच्या रील्सवरही प्रेम ाचा वर्षाव करतात. यासोबतच त्याचे युट्यूबवर ५० लाख सबस्क्राइबर्स आहेत. ते इंस्टाग्राम हँडलवर स्वतःचे चॅनल चालवतात. त्यांच्या चॅनलशी होता. चाहत्यांना त्यांचा गेम प्लॅन आणि ऑन-स्क्रीन प्रेझेन्स खूप आवडला हातो. तथापि, तो या शोचा विजेता बनू शकला नाही. लवकरच तो सलमान खानच्या वादग्रस्त शो 'बिग बॉस १९' मध्ये देखील दिसू शकतो. तथापि, निर्मात्यांनी कवा स्वतः युट्यूबरने याची पुष्टी केलेली नाही. याशिवाय तो 'इश्क नेक्स्ट डोअर' आणि 'कॅम्पस डायरीज'सह अनेक वेब सिरीजमध्ये दिसला आहे.

सायबर गुन्हेगारीचं जमताडा कनेक्शन

फक्त एक फोन कॉल... आणि तुमचे सगळे पैसे गायब होऊ शकतात. देशभरात अनेक ठिकाणी सायबर गुन्हे घडतात. ग्राहकांच्या बँक खात्यातले पैसे काही क्षणात गायब होतात. हे पैसे कुठे गेले याचा अजिबात थांग लागत नाही. सायबर गुन्हेगार अगदी शिताफीने सगळी रक्कम हातोहात गायब करतात. झारखंडम धला जमताडा नावाचा जिल्हा या सायबर गुन्हेगारीचं केंद्र मानला जातो. जमताडा म्हणजे सापांचं निवास्थान. इथे बॉक्साइटच्या खाणीही आहेत. एके काळी इथल्या लोकांची दोन वेळच्या जेवणाचीही पंचाईत होती. लोकांकडे सायकली कवा मोटारसायकली असायच्या, पण आता परिस्थिती बदलली आहे. इथल्या लोकांची मोठाली घरं आहेत. अनेकांच्या दारांपुढे गाड्या उभ्या आहेत. सायबर गुन्हेगारीमुळे हे शक्य झाल्याचं लोकांचं म्हणणं आहे. सायबर गुन्ह्याच्या तक्रारी आल्या की सर्वात आधी जमताडाचं नाव समोर येतं. पोलीस अधिकारीही जमताडामध्ये चौकशीसाठी येतात. पण सायबर गुन्ह्यांमध्ये फारसं काहीच हाती लागत नाही. बँकेच्या खात्यांमधून गायब करण्यात आलेला हा पैसा नेमका कुठे जातो हे कोणालाच कळत नाही. जमताडाम धले सायबर गुन्हेगार पोहोचलेले आहेत. त्यांनी सेलिब्रिटी,

उद्योगपतींनाही सोडलेलं नाही. त्यामुळे सायबर गुन्हेगारीचं हे जमताडा कनेक्शन जबरदस्तच म्हणावं लागेल.

'इथे' लग्नासाठी मुलींच्या उड्या!

'गाव' हा शब्द कानावर पडताच आपल्या डोळ्यांसमोर कच्ची घरे, विहिरी, हिरवीगार शेतं, मेहनती शेतकरी, विहिरीवर पाणी भरणाऱ्या महिला, नदीवर कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिला आणि कच्च्या रस्त्यांची चित्रे येतात. आजही अनेक गावांमध्ये वीज, पाणी, पक्के रस्ते, चांगली शाळा कवा मोठे रुग्णालय यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे; पण भारतात एक असे गाव आहे, जे मोठमोठ्या शहरांनाही लाजवेल. हे भारतातील सर्वात श्रीमंत गाव आहे, जिथे जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध आहेत.

हे गाव गुजरातमधील माधापार आहे. ते केवळ भारतातच नव्हे, तर जगातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून ओळखले जाते. या गावाची एकूण लोकसंख्या सुमारे ९२ हजार म्हणजेच जवळपास एक लाख आहे. येथे सात हजार सहाशे घरे आहेत. विशेष म्हणजे या गावात एक-दोन नव्हे, तर बँकांच्या १७ शाखा

आहेत. माधापार गावाची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत आहे. गावकऱ्यांनी या बँकांमध्ये पाच हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा केली आहे. एवढी मोठी रक्कम मोठमोठ्या शहरांमधील बँकांमध्येही क्वचितच जमा होते. या गावात राहणारी प्रत्येक व्यक्ती करोडपती आहे. या गावातील मुलांशी लग्न करण्यासाठी इतर गावातील मुली अक्षरश: उतावळ्या असतात असे म्हटले जाते.

माधापारमधील अनेक कुटुंबे व्यवसाय आणि रोजगारासाठी परदेशात स्थायिक झाली आहेत. अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, आफ्रिका आणि आखाती देशांमध्ये त्यांचे व्यवसाय यशस्वीपणे चालतात; पण हे प्रवासी भारतीय आपले गाव विसरलेले नाही. ते दरमहा आपल्या कुटुंबांना मोठ्या रकमा पाठवतात आणि गावाच्या विकासातही महत्त्वपूर्ण योगदान देतात. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कार्यांसाठी ते मोठ्या प्रमाणात मदत करतात. गावाला आधुनिक बनवण्यात या लोकांचा मोठा वाटा आहे. माधापार गाव बाराव्या शतकात स्थापन झाले. म्हणजेच या गावाला आठशे वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. कच्छच्या मिस्त्री समुदायाने या गावाची पायाभरणी केली. या समुदायाने केवळ गुजरातमध्येच नव्हे, तर संपूर्ण भारतात अनेक नक्षीकाम असलेली मंदिरे आणि ऐतिहासिक इमारती बांधल्या. कालांतराने या गावात पंजाबी, गुजराती, बंगाली, तमिळ, मराठी, काश्मिरी अशा विविध सम ुदायांचे लोक एकत्र आले. आज हे गाव वैविध्यपूर्ण संस्कृतीचे प्रतीक आहे.

माधापारमध्ये शाळा, महाविद्यालये, बँका, आरोग्य केंद्रे, उद्याने, रस्ते आणि अशा सुविधा आहेत, ज्या कोणत्याही मोठ्या शहराला लाजवतील. या गावातील रहिवाशांचे जीवनशैली आणि सुविधा शहरांपेक्षाही बऱ्याच बाबतीत उत्कृष्ट आहेत. यामुळे भारताची खरी ताकद गावांमध्ये आहे, हा संदेश ते देत आहेत.

सेंसेक्स-निफ्टी किरकोळ वाढीसह बंद

मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्सची दमदार कामगिरी

मुंबई, दि. ८ प्रतिनिधी

भारतीय सेंसेक्स-निफ्टी आज इंट्राडे वाढ कायम ठेवण्यात अपयशी ठरले आणि अस्थिर (व्होलाटाईल) व्यापार सत्रात किरकोळ वाढीसह बंद झाले. निफ्टी २४,७५० च्या वर टिकून राहिला. यात ऑटो, मेटल, तेल व वायू आणि पीएसयू बँकांचा सर्वाधिक वाटा होता. चांगल्या सुरुवातीनंतर बेंचमार्क निर्देशांकांमध्ये वेग आला आणि निफ्टी दिवसातील उच्चांक २४,८८५.५० वर पोहोचला. मात्र शेवटच्या तासात झालेल्या नफावसुलीमुळे बहुतांश वाढ नाहीशी झाली आणि निफ्टी दिवसाच्या नीचांकी पातळीच्या जवळ बंद झाला.

व्यापार सत्राच्या शेवटी सेंसेक्स ७६.५४ अंकांनी किंवा ०.०९ टक्क्यांनी वाढून ८०,७८७.३० वर तर निफ्टी ३२.१५ अंकांनी किंवा ०.१३ टक्क्यांनी वाढून २४,७७३.१५ वर बंद झाला. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांमध्ये ०.५-०.५ टक्क्यांची वाढ दिसून आली.

निफ्टीवर टाटा मोटर्स, जेएसडब्ल्यू स्टील, आयशर मोटर्स, एमअँडएम आणि बजाज ऑटो हे आजचे टॉप गेनर ठरले. तर ट्रेंट, एसबीआय लाइफ इन्शुरन्स, एशियन पेंट्स, टीसीएस, टेक महिंद्रा हे निफ्टीवरील टॉप लूजर ठरले.

सेक्टोरल फ्रंटवर निफ्टी ऑटो निर्देशांकाने दिवसातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केली. याशिवाय, बँक ऑफ अमेरिका सिक्युरिटीजने ऑटो क्षेत्रासाठी बुलिश अहवाल प्रसिद्ध केला असून त्यामुळे या क्षेत्राविषयी गुंतवणूकदारांचा दृष्टिकोन अधिक मजबूत झाला.

सेन्सेक्स 80,787

निफ्टी 24,773

इतर सेक्टोरल निर्देशांकांमध्ये निफ्टी पीएसयू बँक ०.५२ टक्क्यांनी वाढला. निफ्टी मेटल ०.३८ टक्क्यांनी वाढला. निफ्टी रिअल्टी आणि निफ्टी इन्फ्रा अनुक्रमे ०.४४ टक्के आणि ०.१५ टक्क्यांनी किंचित वाढीसह बंद झाले. निफ्टी मीडिया देखील ०.२० टक्के वर बंद झाला. गुंतवणूकदारांचे लक्ष आता भारत आणि अमेरिकेच्या महागाईच्या आकडेवारीवर केंद्रीत आहे.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ८ सप्टेंबर रोजी वाढून ४५२.८० लाख कोटी रुपये झाले, जे मागील व्यापार दिनी म्हणजेच शुक्रवारी ५ सप्टेंबरला ४५१.४४ लाख कोटी रुपये होते. या प्रकारे बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज सुमारे १.३६ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर गुंतवणूकदारांच्या संपत्तीत जवळपास १.३६ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

बीएसई सेंसेक्समधील ३० पैकी १४ समभाग आज हिरव्या चिन्हात म्हणजेच वाढीसह बंद झाले. यात टाटा मोटर्सच्या समभागात ३.९७ टक्क्यांची सर्वाधिक वाढ झाली. त्यानंतर महिंद्रा अँड महिंद्रा, मारुती सुझुकी, अदाणी पोर्ट्स आणि टाटा स्टील हे समभाग ०.७२ टक्क्यांपासून ते ३.९६ टक्क्यांपर्यंतच्या वाढीसह बंद झाले.

आत्मदहनाचा प्रयत्न, खोटे आरोप करणे ही मानसिक क्रूरताच

हायकोर्टाने पतीला मंजूर केला घटस्फोट

जबलपूर, दि. ८ वृत्तसंस्था

"पती आणि पत्नी यांच्यातील सामान्य वाद हे क्रूरता ठरत नाहीत; परंतु आत्मदहनासारखी आणि खोट्या आरोपांसारखी गंभीर कृत्ये मानसिक क्रूरतेच्या मर्यादेपलीकडची आहेत. पत्नीने वारंवार केलेले आत्मदहनाचे प्रयत्न आणि त्यानंतर पतीच्या कुटुंबावर केलेले खोटे आरोप यामुळे भीती आणि मानसिक त्रासाचे वातावरण निर्माण झाले. या कारणास्तव, विवाह संबंध संपुष्टात आणणे योग्य ठरले," असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत नुकतेच मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या जबलपूर खंडपीठाने पतीला घटस्फोट मंजूर केला.

२९ एप्रिल २००३ रोजी विवाहबद्ध झालेल्या दांपत्याला एक मुलगी आहे. पतीने आरोप केला की, विवाहानंतर पत्नीच्या वागणुकीत मोठा बदल झाला. तिने दोनदा आत्मदहनाचा प्रयत्न केला. पहिल्यांदा तिने स्वतःच्या कपड्यांना आग लावली, तर दुसऱ्यांदा रॉकेल ओतून गंभीररीत्या भाजून घेतले. तसेच कोणत्याही योग्य कारणाशिवाय ती घर सोडून माहेरी राहण्यास गेली.तर पत्नीने आरोप केला की, पती, सासू, दीर आणि जाऊ यांनी तिच्यावर रॉकेल टाकून जाळण्याचा प्रयत्न केला. तसेच भाजल्यामुळे तिचा चेहरा विद्रूप झाल्यामुळेच पतीला घटस्फोट हवा आहे, असेही तिने कनिष्ठ न्यायालयात सांगितले. कनिष्ठ न्यायालयाने पतीने दाखल केलेली घटस्फोट याचिका फेटाळली होती. या निर्णयाविरोधात पतीने मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या जबलपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती.

पतीच्या याचिकेवर न्यायमूर्ती विशाल धागट आणि न्यायमूर्ती अनुराधा शुक्ला यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने स्पष्ट केले की, पत्नीने वारंवार केलेले आत्मदहनाचे प्रयत्न आणि त्यानंतर पतीच्या कुटुंबावर केलेले खोटे आरोप यामुळे भीती आणि मानसिक त्रासाचे वातावरण निर्माण झाले. या कारणास्तव, विवाह संबंध संपुष्टात आणणे योग्य ठरले. यावेळी खंडपीठाने 'समर घोष विरुद्ध जया घोष' (२००७) या सर्वोच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचा संदर्भ देत नमूद केले की, सामान्य वैवाहिक वाद हे क्रूरता ठरत नाहीत; परंतु आत्मदहनासारखी आणि खोट्या आरोपांसारखी गंभीर कृत्ये मानसिक क्रूरतेच्या मर्यादेपलीकडची आहेत.

भारताविरोधात झेलेन्स्कींचा अमेरिकेला पाठिंबा

किव्ह, दि. ८ वृत्तसंस्था

जगभरातील नेत्यांकडून रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यासाठी जगभरातील दिग्गज नेते एकमेकांशी चर्चा करत आहेत. यादरम्यान युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी केलेले एक वक्तव्य चर्चेत आले आहे. ज्यामध्ये त्यांनी भारतासह रशियाबरोबर व्यापार सुरू ठेवणाऱ्या देशांवर टॅरिफ लादण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. यावेळी त्यांनी "राष्ट्राध्यक्ष (ट्रम्प) यांना हे युद्ध संपवायचे आहे," असे आपल्याला वाटते असेही झेलेन्स्की म्हणाले आहेत.

"माझ्या मते, रशियाबरोबर व्यापार सुरू ठेवणाऱ्या देशांवर टॅरिफ लादण्याची कल्पना योग्य आहे," एबीसी न्यूजच्या रविवारी प्रक्षेपित झालेल्या मुलाखतीत बोलताना झेलेन्स्की असे म्हणाले आहेत.

भारत आणि अमेरिका यांच्यात टॅरिफच्या आणि रशियन तेल खरेदी या मुद्द्यावर व्यापारी संबंध तणावाचे बनले आहेत. अमेरिकेने वारंवार चिंता व्यक्त केली आहे की रशियन तेल विक्रीतून मिळणारे पैसा हा रशिया युक्रेनमधील युद्धात वापरत आहे. यावर भारताने स्पष्ट केले आहे की त्यांची खरेदी ही आर्थिक आणि व्यावसायिक बाबींवर आधारित आहे.

दुसरीकडे ट्रम्प यांनी सांगितले की युक्रेनमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर ते रशियावर दुसऱ्या पातळीवरील आणखी निर्बंध लादण्याची तयारी करत आहेत. मात्र त्यांनी यामध्ये कोणत्या गोष्टींचा समावेश असेल याबद्दलचा तपशील दिलेला नाही.

पालिका बँकेच्या निवडणूक निकालाचा वाद!

9 सप्टेंबरला को-ऑपरेटिव्ह न्यायालयात सुनावणी!

मुंबई, दि. ८ प्रतिनिधी

पालिकेच्या दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड संचालक मंडळ निवडणुकीच्या निकालात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला होता. मतमोजणी दरम्यान उपनिबंधक व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी निकालात अनियमितता, गैरव्यवहार केल्याचा आरोप जय सहकार पॅनेलने केला होता. त्या विरोधात त्यांनी को ऑपरेटिव्ह न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याची अंतिम सुनावणी ९ सप्टेंबरला होणार आहे. या सुनवणीकडे पालिकेच्या कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दि म्युनिसिपल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड संचालक मंडळ निवडणुक २१ ऑगस्टला संपन्न झाली. मागील दहा वर्षे वर्चस्व असलेल्या जय सहकार पॅनलचे १९ पैकी ६ उमेदवार निवडून आले होते तर सहकार पॅनेलचे १३ उमेदवार विजयी झाले. मतमोजणी दरम्यान वारंवार आक्षेप घेऊनही उपनिबंधक व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. फेर मतमोजणीची मागणी करूनही नाकारण्यात आली. त्यामुळे त्यांनी उपनिबंधक व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण करून पत्रकार परिषदेत को ऑपरेटिव्ह न्यायालयात दाद मागणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार त्यांनी को ऑपरेटिव्ह न्यायालयात धाव घेतली असून त्याची अंतिम सुनावणी ९ सप्टेंबरला होणार आहे. या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले असून फेरमतमोजणीची मागणी मान्य केल्यास विद्यमान विजयी संचालकांची डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये चकमक

एका दहशतवाद्याचा खात्मा

कुलगाम, दि. ८ वृत्तसंस्था

कुलगाम जिल्ह्यातील गुड्डर वनक्षेत्रात सोमवारी झालेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला, तर तीन जवान जखमी झाले. जम्मू-काश्मीर पोलिसांनी गुप्त माहिती दिल्यानंतर लष्कराकडून ही कारवाई सुरू झाली, त्यानंतर लष्कर, जम्मू-काश्मीर पोलिस आणि सीआरपीएफ यांनी संयुक्त शोध मोहीम राबवली.

भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सने 'एक्स' वरील पोस्टमध्ये सांगितले की, "सावध सैनिकांनी संशयास्पद हालचाल पाहिली आणि त्यांना आव्हान दिल्यावर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून जोरदार गोळीबार झाला. यात एक दहशतवादी ठार झाला असून एक अधिकारी जखमी झाले आहेत. अजूनही मोहीम सुरू आहे." सुरक्षा अधिकाऱ्यांनी सांगितले की, परिसरात अजूनही दोन ते तीन दहशतवादी लपलेले असू शकतात. अतिरिक्त सैन्य दल तैनात करण्यात आले असून चकमक अजूनही सुरू आहे.

लाल किल्ल्यावरून १ कोटी रुपयांचा कलश चोरणारा पकडला गेला

नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था

दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यासमोरील पार्कमध्ये जैन समुदायाच्या धार्मिक कार्यक्रमातून चोरी झालेल्या १ कोटींच्या कलशाचं रहस्य उकलण्यात पोलिसांना यश आलं आहे. गुन्हे शाखेने या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक केली आहे. आरोपीचं नाव ब्रजभूषण असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याला उत्तर प्रदेशातील हापूर येथून पकडण्यात आलं आहे. ब्रजभूषण दिल्लीत ड्रायव्हर म्हणून काम करतो. चोरीच्या वेळी त्याने धोती-कुर्ता घालून पुजारीचा वेश धारण केला होता. पोलिसांच्या चौकशीत एक धक्कादायक खुलासा झाला आहे. आरोपीने सांगितलं की, एका नव्हे, तर तीन कलशांची चोरी झाली होती. पोलिसांनी आतापर्यंत एक कलश जप्त केला आहे. इतर दोन आरोपी आणि उरलेले दोन कलश शोधण्यासाठी गुन्हे शाखा तपास करत आहे.

आयुर्वेद आणि पंचकर्म चिकित्सा

आपला भारत देश हा एक प्राचीन देश आहे आपली प्राचीन पारंपरिक संस्कृती जशी आहे, तितकीच वैचारिकता देखील आहे. आयुर्वेदामध्ये देखील जगाच्या तुलनेत किंबहुना जगापेक्षा हि अग्रेसर आहे. कारण आपल्या देशातील ऋषीमुनींनी हजारो वर्षा पूर्वी वृक्ष,जडीबुटी,फळ,फुल अशा रानावनातील नैर्सगिक पाल्यापासून आणि फळांपासून प्रभावी अशी उपचार पद्धती विकसित केली. याच आयुर्वेदाने शारीरिक आणि मानसिक विकारांवर उत्तम अशी रामबाण उपचार पद्धती शोधून काढली ज्या उपचार पद्धतीला आज जगाने स्वीकारलेले आहे. कोणत्याही प्रकारच्या आजाराचा केवळ इलाज करण्यापेक्षा त्या आजाराचे शरीरातून समूळ उच्चाटन करणे म्हणजेच आयुर्वेदिक उपचार पद्धती. याच आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा महत्वाचा भाग म्हणजे पंचकर्म चिकित्सा. अनेक प्रकारच्या शारीरिक व्याधींवर अशा प्रकारची पंचकर्म चिकित्सा हि एक प्रभावशाली उपचार पद्धती मानली गेली आहे. हि पंचकर्म उपचार पद्धती म्हणजे नेमकी कोणती उपचार पद्धती?याच विषयाच्या अनुषंगाने वैद्य चेतन गुल्हाने यांच्याशी केलेली बातचीत.

हॅलो डॉक्टर

1]पंचकर्म म्हणजे काय?आणि आयुर्वेदामध्ये पंचकर्माला किती महत्व आहे?

आयुर्वेद हि भारताची एक प्राचीन पारंपरिक उपचार पद्धती आहे. आयुर्वेदाचे सिद्धांत हे आजच्या आधुनिक काळात देखील तितकेच उपयुक्त ठरतात. रुग्णाला बरे करण्यासाठी खनिज स्वरूपात औषधांचा उपचार केला जातो त्याला शमन चिकीत्सा म्हणतात. आपल्या शरीरात जे दोष असतात त्याचे मुळापासून उच्चटन करणे आणि ते शरीराच्या बाहेर काढणे याला शोधन चिकित्सा पद्धती म्हणतात. एखादी व्याधी पुन्हा उद्भवू नये म्हणून जे उपचार केले जातात ते म्हणजे आयुर्वेद उपचार. त्यालाच पंचकर्म म्हणतात. पंचकर्मामध्ये ५ कर्म असतात,विरेचन,बस्त,रक्त मोशन,वमन आणि नात्स्य चिकित्सा असे पाच प्रकार आहेत .

2] एखादी आजारी व्यक्ती आणि निरोगी व्यक्ती अशा दोघांनाही पंचकर्म उपचार पद्धती उपयुक्त ठरते का?

आयुर्वेदाचे प्रयोजन हे भिन्न प्रकृतीच्या सर्वांसाठीच आहे. संस्कृतमध्ये एक श्लोक आहे 'स्वस्थस्य स्वस्थ रक्षणम,आतुरस्य विकार प्रथमाम' निरोगी व्यक्तीचे स्वास्थ्य हे ठीक असलं

तरी त्याच्या शरीराचे संरक्षण करण्यासाठी आणि आजारी व्यक्तीच्या शरीरातील दोषच निराकरण करण्याचं काम पंचकर्म करत. पंचकर्मामुळे निरोगी व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्याच आणि त्याला शारीरिक आणि मानसिक बळ देण्याचं काम पंचकर्म करते. आपले शरीर हे रस,रक्त,मांस ,मेद,अस्मि,शुक्र अशा सात धातूंनी भरलेलं असत. त्यामुळेच शरीर शुद्ध करण्याचं महत्वाचं काम पंचकर्म चिकित्से द्वारे केले जाते. शरीरातील व्याधी ब्रेकडाऊन करण्याचं कार्य पंचकर्म करते.

लोकारोग्य

3]पंचकर्म चिकित्सा हि उपचार पद्धती कुणी करावी आणि कुणी करू नये असा काही नियम आहे का?

एखादि व्यक्ती निरोगी असेल किंवा कुणी एखाद्या दुर्धर आजाराने पीडित असेल अशी कुणीही व्यक्ती पंचकर्म चिकित्सा करू शकते. बहुदोष म्हणजेच आपल्या शरीरात जे टॉक्सिन असते ते प्रमाणापेक्षा जास्त वाढते तेंव्हा बहुदोष उत्पन्न होतो आणि तो जेंव्हा अनेक ऍलोपॅथिक औषधांनी नियंत्रणात येत नाही तेंव्हा त्याला पंचकर्म चिकित्सा उपयुक्त ठरते. मधुमेह,उच्च रक्त दाब,किडनीचे विकार,केस गळणे,निद्रानाश अशा दुर्धर आजारांमध्ये पंचकर्म चिकित्सा खूपच उपयुक्त ठरते.

4]पंचकर्मातील महत्वाच्या वमन ,विरेचन आणि बस्ती या उपचार पद्धती बद्दल थोडक्यात काय सांगाल?

पंचकर्मातील एक महत्वाचे कर्म म्हणजेच वमन. यामध्ये थिरयोटिक ओमेटिंग अर्थात उलट्या करून शरीरातील दोष बाहेर टाकले जातात. मदनकट,सैंधव,आणि मधाच्या गोळ्या खायला देऊन शरीरातील दोष बाहेर काढले जातात. याला १ ते १२ तासांचा कालावधी तर कधी १० दिवस देखील लागतात. विरेचन या कर्मात विविध औषधी देऊन शरीरातील दोष पक्वाशयात आणले जातात आणि गुदद्वाराद्वारे बाहेर काढले जातात. पिंपळ,त्रिफळा अशा गोळ्यांचा यामध्ये औषध म्हणून वापर करतात. पित्ताशयाच्या विकारावर हे कर्म उपयोगी आहे. बस्ती या कर्म प्रकारात मेडिकेअर ऑइल किंवा औषध गुद्वाराद्वारे देतात. आयुर्वेदातील हि एक उत्तम उपचार पद्धती आहे .स्पायनल कॉर्ड,पक्षाघाताचा आजारावर बस्ती उपचार पद्धती एक रामबाण इलाज आहे.

5]पंचकर्म उपचार पद्धतीचे फायदे काय आहेत?

पंचकर्म उपचार पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे शारीरिक आणि मानसिक बळ प्राप्त होते. आपला त्वचेचा रंग उजळतो. आपली श्रवनशक्ती,ध्यान,दृष्टी वाढते आणि आपल्या शरीरात जे सात धातू आहेत ते उत्तम पद्धतीने तयार होतात. शरीरामध्ये सूक्ष्म चॅनेल्स तयार होतात ज्यामुळे शरीर प्रक्रिया सुरळीत चालते असे पंचकर्माचे अनेक फायदे आहेत.

भारतीय शोध फॉर्म्युलेशनला यशस्वी केस प्रत्यारोपण थेरपी म्हणून मान्यता

केस पुनर्संचयित विज्ञानासाठी एक महत्त्वपूर्ण झेप घेत, QR678 Neo®, पुढील पिढीतील, पेटंट केलेले, भारतीय-विकसित बायोमिमेटिक पेप्टाइड फॉर्म्युलेशन, जर्नल ऑफ कॉस्मेटिक अँड लेसर थेरपीमध्ये प्रकाशित झालेल्या केस प्रत्यारोपण शस्त्रक्रियेवरील जागतिक अभ्यासाद्वारे वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित केले गेले आहे. प्रगत केस गळती असलेल्या ११२ पुरुषांचा समावेश असलेल्या या आंतरराष्ट्रीय चाचणीचे नेतृत्व भारत, अमेरिका आणि मलेशियातील तज्ञांनी केले होते आणि पुष्टी करते की QR678 Neo® पारंपारिक प्रत्यारोपण पद्धतींपेक्षा ४३% चांगले ग्राफ्ट जगणे, पूर्ण पुनर्वृद्धी आणि केसांची गुणवत्ता सुधारते.

जनआरोग्य

QR678 Neo® ही भारतात विकसित आणि वैद्यकीयदृष्ट्या चाचणी केलेली पेटंट केलेली पेप्टाइड थेरपी आहे आणि आता युनायटेड स्टेट्समध्ये देखील पेटंट केलेली आहे. ५० वर्षांच्या वयापर्यंत ८५% पुरुष आणि ६० वर्षांच्या वयापर्यंत ५०% महिलांमध्ये अँड्रोजेनेटिक अलोपेसियाचा परिणाम होत असल्याने, विश्वासार्ह आणि प्रभावी प्रत्यारोपणाच्या निकालांची गरज कधीही इतकी वाढली नाही. कोल्ड सलाईनसारखे काढलेले केसांचे कूप साठवण्याचे पारंपारिक माध्यम केवळ तात्पुरते जतन करतात आणि जैविक क्रियाकलापांचा अभाव ठेवतात, ज्यामुळे बहुतेकदा ग्राफ्ट्सना नुकसान होण्याची शक्यता असते. अशा सहाय्यक पदार्थांप्रमाणे सलाईन किंवा पीआरपीसह जे केसांच्या कूपांना फक्त तात्पुरता आधार देतात, QR678 Neo® प्रत्यारोपणाच्या संपूर्ण प्रक्रियेत सक्रिय जैविक भूमिका बजावते.

शस्त्रक्रियेपूर्वी, दरम्यान आणि नंतर तीन टप्प्यात दिले जाणारे हे उपचार टाळूचे पोषण करते, ग्राफ्टचे संरक्षण करते आणि शस्त्रक्रियेनंतरच्या पुनर्प्राप्तीस समर्थन देते. बायोमिमेटिक पेप्टाइड्सच्या मालकीच्या मिश्रणासह शरीराच्या नैसर्गिक वाढीच्या घटकांचे अनुकरण करून, ते एक पुनरुत्पादक वातावरण तयार करते जे फॉलिकल जगण्याची प्रक्रिया सुधारते, बरे होण्यास गती देते आणि पुन्हा वाढलेल्या केसांची घनता आणि गुणवत्ता वाढवते.

मोहरीचे औषधी महत्व

आरोग्यम् धनसंपदा

मोहरी हे प्रत्येक भारतीय घरात आढळणारे मुख्य अन्न आहे, जे अनेक पदार्थांची चव वाढवण्यासाठी किंवा विविध प्रकारचे पदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाते. मोहरी काळ्या, पांढऱ्या आणि हलक्या तपकिरी रंगात येतात. प्रत्येकाची चव वेगळी असते. मोहरीच्या दाण्यामध्ये अनेक पोषक घटक असतात. या लहान बियांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे असतात. ते कॅल्शियम, सेलेनियम, लोह, फॉस्फरस, मॅग्नेशियम आणि मॅंगनीज सारख्या खनिजांनी समृद्ध आहेत. याव्यतिरिक्त, त्यात बी जीवनसत्त्वे तसेच प्रथिने आणि फायबर असतात.मोहरीचे अनेक फायदे आहेत. त्यामध्ये फायटोन्यूट्रिएंट्स आणि अँटिऑक्सिडंट्स असतात जे तुमच्या शरीराला कर्करोगापासून वाचवतात. ते त्यांच्या आरोग्य फायद्यांसाठी ओळखले जातात कारण ते कमी कॅलरी आणि भरपूर पोषण आहेत. त्यात अनेक बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि जंतुनाशक गुणधर्म आहेत.मोहरीच्या दाण्यांमध्ये ग्लुकोसिनोलेट्स आणि मायरोसिनेज सारखे संयुगे असतात. जे शरीरात कर्करोगास कारणीभूत असलेल्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करतात. ह्युमन अँड एक्सपेरिमेंटल टॉक्सिकोलॉजी जर्नलमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासानुसार, या लहान बियांमध्ये केमोप्रिव्हेंटिव्ह क्षमता असू शकते आणि ते कार्सिनोजेनच्या प्रभावापासून संरक्षण करतात.जर तुम्हाला डोकेदुखी किंवा मायग्रेनची समस्या असेल तर त्याच्या उपचारासाठी मोहरीचे दाणे देखील प्रभावी आहेत. या बियांमध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते जे आपल्या मज्जासंस्थेला आराम देते आणि आपल्या शरीराच्या कोणत्याही भागामध्ये वेदना किंवा तणावापासून आराम देते.मोहरी ही तुमच्या पचनसंस्थेसाठी उत्तम अन्न आहे. जर तुम्ही अपचनाच्या समस्येने त्रस्त असाल तर मोहरीच्या दाण्याने त्यापासून सुटका मिळू शकते. या बियांमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते. ज्यामुळे आतड्यांची हालचाल सुधारण्यास मदत होते आणि शरीराची पचनशक्ती वाढते. त्यामुळे बद्धकोष्ठता, गॅस आणि अपचनाचा त्रास होत नाही.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

कॅलिफोर्नियात भारतीय तरुणाची हत्या

सार्वजनिक ठिकाणी लघवी करणाऱ्यास रोखल्याने झाडल्या गोळ्या

कॅलिफोर्निया, दि. ८ वृत्तसंस्था

अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे कपिल (२६) या भारतीय तरुणाची शनिवारी (६ सप्टेंबर) गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. या घटनेने कॅलिफोर्नियासह अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांना मोठा धक्का बसला आहे. एका इसमाला सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करण्यापासून रोखल्यामुळे कपिलची हत्या करण्यात आल्याचं पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आलं आहे. कपिल हा मूळचा हरियाणातील जींद जिल्ह्यातील बराह गावचा रहिवासी होता.

कपिल हा कॅलिफोर्नियामध्ये सुरक्षा रक्षक म्हणून काम करत होता. तो जींद जिल्ह्यातील बराह या गावातील ईश्वर यांचा मुलगा होता. त्याच्या हत्येबद्दल माहिती देताना बराह गावचे सरपंच सुरेशकुमार गौतम यांनी सागितलं की "कपिलने ड्युटीवर असताना एका व्यक्तीला सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करण्यापासून रोखलं होतं. त्याच रागातून त्या व्यक्तीने कपिलवर गोळ्या झाडल्या. गोळीबारानंतर कपिलचा जागीत मृत्यू झाला."

कपिलचे वडील ईश्वर व त्यांचं कुटुंब शेती करून उदरनिर्वाह करत आहे. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाकीची असल्यामुळे कपिलने पैसे कमावण्यासाठी अमेरिकेची वाट धरली होती. सव्वादोन वर्षांपूर्वी तो अमेरिकेला गेला होता.

टीओआयच्या रिपोर्टनुसार कपिलने २०२२ मध्ये तथाकथित डंकी मार्गने पनामा जंगल पार करून, मेक्सिकोच्या सीमेवरील भिंत ओलांडून अमेरिकेत प्रवेश केला होता. यासाठी त्याच्या कुटुंबाने तब्बल ४५ लाख रुपये खर्च केले होते. अमेरिकेत गेल्यावर कपिलला सुरुवातीला अटक झाली होती. परंतु, कायदेशीर कारवाईनंतर त्याची सुटका झाली आणि त्यानंतर तो तिथेच स्थायिक झाला.

मेहुल चोक्सीला जेलमध्ये स्वच्छ पाणी अन् टॉयलेट देणार

भारताने बेल्जियमला दिली १४ सुविधांची यादी

नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था

केंद्रीय गृह मंत्रालयाने बेल्जियम सरकारला एका पत्राद्वारे मेहुल चोक्सीला ताब्यात घेण्यासाठी औपचारिक आश्वासने दिली आहेत. जर चोक्सीला भारतात आणले तर त्याला अमानुष वागणूक दिली जाणार नाही. त्याशिवाय त्याला मेडिकलसह १४ सुविधा पुरवल्या जातील असं भारताने बेल्जियमला सांगितले आहे.

गृह मंत्रालयाने सांगितले आहे की, मेहुल चोक्सीला मुंबईच्या आर्थर रोड जेलमधील बॅरेक नंबर १२ मध्ये ठेवले जाईल. या कोठडीत ६ लोकांच्या राहण्याची क्षमता आहे. पत्र पाठवेपर्यंत बॅरेकमधील २ कोठडी रिकामी करण्यात आली होती. पळपुटा उद्योगपती मेहुल चोक्सीवर पंजाब नॅशनल बँकेत १३ हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. काही दिवसांपूर्वी मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक करण्यात आली. भारतीय तपास यंत्रणेच्या प्रत्यार्पणाच्या आवाहनावर १२ एप्रिलला चोक्सीला अटक झाली. या प्रकरणात तो आणि त्याचा भाचा नीरव मोदी प्रमुख आरोपी आहेत.

गर्दीपासून वेगळी असलेली १२ नंबरची कोठडी, २० बाय १५ ची जेलमध्ये स्वतंत्र कोठडी, कोठडीमध्ये अटॅच टॉयलेट आणि बाथरूम, ३ वेळचे जेवण, स्वच्छ पाणी, झोपण्यासाठी कापसाची उशी, चादर आणि अंथरूण, कोर्टाच्या ऑर्डरवर मेटल अथवा लाकडाचा बेड, सीलिंग फॅन आणि लाईट, २४ तास सीसीटीव्ही, ताज्या हवेसाठी खुले अंगण, योग, मेडिटेशन आणि लायब्रेरी, मनोरंजनासाठी बॅडमिंटन, बुद्धिबळ आणि कॅरम, २४ तास आरोग्य सुविधा, आपत्कालीन परिस्थितीत जे.जे हॉस्पिटलला सुविधा, कोर्टाच्या ऑर्डरवर घरातील जेवणाची परवानगी, अशा सुविधांची यादी आहे.

त्याशिवाय जेलच्या कोठडीत ग्रीलच्या खिडक्या, वेंटिलेटर आणि सीलिंग फॅन असेल. मुंबईत जास्त उष्णता नसते, त्यासाठी कोठडीत एसी सुविधा नाही. मुंबई जेलमध्ये दररोज साफसफाई केली जाते, स्वच्छतेकडे लक्ष दिले जाते. नियमित सफाई, पेस्ट कंट्रोल, महापालिकेकडून पाणी पुरवठा केला जातो. कोठडीत अंघोळ करण्याचीही सुविधा आहे. डॉक्टरांच्या सांगण्यांनुसार विशेष आहाराची व्यवस्था केली जाईल. २४ तास आरोग्य सुविधेत ६ मेडिकल अधिकारी, नर्स, फार्मासिस्ट आणि लॅबोरेटरीची व्यवस्था असेल. जेलमध्ये ICU सह २० बेडचे रुग्णालय आहे. आपत्कालीन परिस्थिती जवळच जे.जे रुग्णालय आहे. जेलमधील कैदी खासगी मेडिकल सुविधाही घेऊ शकतात.

दरम्यान, बऱ्याच काळापासून भारतीय तपास यंत्रणा चोक्सीचा शोध घेत होत्या. मेहुल चोक्सी २०२१ च्या अखेरीस अँटिग्वामधून पळून गेला होता, त्यानंतर भारतीय तपास यंत्रणा दोन महिने बेल्जियमच्या एजन्सींच्या संपर्कात होत्या. चोक्सी सध्या बेल्जियममध्ये तुरुंगात आहे. बेल्जियम पोलिसांनी मुंबई न्यायालयाने जारी केलेल्या दोन अटक वॉरंटच्या आधारे चोक्सीला ताब्यात घेतले. हे वॉरंट २३ मे २०१८ आणि १५ जून २०२१ रोजी जारी करण्यात आले होते.

हरभजन सिंगने पूरग्रस्तांसाठी दिल्या ११ बोटी, ३ रूग्णवाहिका

चंदिगड, दि. ८ वृत्तसंस्था

भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंग याने पंजाबमधीलपूरग्रस्तांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. हरभजन हा आम आदमी पक्षाचा (आप) राज्यसभेचा खासदार आहे. हरभजनने मदतकार्यासाठी बोटी आणि रुग्णवाहिका पुरवल्या आहेत आणि निधी उभारून त्यांनी पूरग्रस्तांना मदत केली आहे. हरभजनने त्याच्या खासदार निधीतून आठ स्टीमर बोटी मंजूर केल्या आहेत. तसेच स्वतःच्या पैशातून आणखी तीन बोटी दिल्या आहेत.

या प्रकरणाची माहिती असलेल्या सूत्रांनी सांगितले की, हरभजनने ११ स्टीमर बोटी दिल्या आहेत. प्रत्येक बोटीची किंमत सुमारे ४.५० ते ५.५० लाख रुपये आहे. याशिवाय, हरभजनने गंभीर रुग्णांना जवळच्या रुग्णालयात नेण्यासाठी तीन रुग्णवाहिका देखील खरेदी केल्या आहेत. हरभजन सिंगने त्याच्या मित्रमंडळी आणि ओळखीच्या लोकांकडूनही मदत मागितली. त्याच